पारिजात प्रकाशन

# र ज : क ण

— रघुवीर सामंत

१०

दिवाळी १८६३

मधुसूदन वालावलकर यांनीं
'पारिजात प्रकाशन'
७ मॅथ्यू रोड, मुंबई ४
येथें प्रसिद्ध केलें.

(सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन)

मूल्य १॥ रुपया

पहिलीं २० व शेवटचीं ६५ ते १३७ पृष्ठें श्री. जगन्नाथ द. सातोस्कर यांनीं, सागर साहित्य छापखाना, त्रिभुवन रोड, मुंबई ४. व मधलीं २१ ते ६४ पृष्ठें श्री. ब्रह्मानंद सु. नाडकर्णी यांनीं, बकुल आर्ट प्रिं. प्रेस, बनाम हॉल लेन, मुंबई ४, येथें छापलीं आहेत.

प्रिय,

बाळकृष्ण,

वासुदेव

व

गोविंद

यांस—

## श्री. रघुवीर सामंत, बी. ए., बी. टी.

### यांचीं प्रकाशित पुस्तकें

१ हृदय ( लघुकथा व शब्दचित्रें )
२ वाळूंतील पाउलें ( अभिनव लघुकथा )
३ सुरंगीची वेणी ( रुपांतरित लघुकथा )
४ प्रवासांतील सोबती ( कादंबरी )
५ अभ्रपटल ( कादंबरी )
६ आकाशगंगा ( कादंबरी )
७ पणत्या ( लघुनिबंध )
८ आजचीं गाणीं ( कविता )
९ मासलेवाईक प्राणी ( अभिनव स्वभावचित्रें )
१० तारांगण ( चित्रबंध संग्रह )
११ रजःकण ( संकीर्ण )

### छपाईस तयार

१२ काहूर ( कादंबरी ) छापत आहे.
१३ आम्हाला जगायचं आहे ( कादंबरी )

### कल्पित

१४ जिवंत माणूस ( 'विनोदगंभीर' कादंबरी )
१५ झुंज ( कादंबरी )

चिमूट १ ली

# मोजणी — मापणी.

माणसाच्या मनांत मोजणी मापणीची कल्पना किती शतकां–पूर्वी डोकावली असेल बरं ? मी कांहीं संशोधन केलें आहे असें नाहीं. पण एकाच प्रकारचा अनुभव मात्र मला पावलोपावलीं आला आहे; तो असा कीं रुपया खोटा निघाला, तर आपल्याला अगदीं सोळा आणे दुःख होतें. 'बँक हॉलीडे' रविवारीं आला, तर आपलें दोन पौंड वजन घटावयास तरी कांहीं हरकत नाहीं. विकत घेतल्यापासून चार आठ दिवसांत नवें धोतर विरलें तर आपण व्यवहारज्ञानास मूर्ख ठरलों या दुःखाबरोबरच तीन चार रुपये अगदीं हातोहात नाहींसे झाल्याचेंच दुःख अधिक तीव्र असतें!—आणि 'पाचावर धारण', 'एकादशीच्या घरीं शिवरात्र', 'ढीगभर बोलणें' 'शिंपलीभर पाण्यांत जीव देणें', 'दुष्काळांतील तेरावा महिना' वगैरे अनेक प्रकारच्या वाक्प्रचारांवरूनही आपणांला हेंच दिसून येतें कीं मोजणीमापणीशिवाय माणसाला मुळीं चैनच पडत नाहीं!

आणि नाहींतरी, हिशेब म्हटला कीं माणसाच्या मनांत तुंबळ युद्ध सुरूं झाल्यावांचून रहात नाहीं. सगळेच लोक कांहीं माझ्या-सारखे नसतात. दिडकीच्या मिरच्या कोथिंबिरीच्या काड्यापासून तों मुंबईतील रहात्या जागेच्या भाड्यापर्यंत साऱ्या लहानमोठ्या गोष्टींची कांटेकोर नोंद, आपल्या वहींत टिपून ठेवल्याशिवाय कांहीं महाभागांना तर चैनच पडत नाहीं!—त्यांतहि पुन्हां एखाद्या दिडकीची चूक आढळली तर ती बरोबर शोधून काढावयास ते रजेचे दोन दोन दिवस देखील घालवायला कमी करत नाहींत!—ती एकदां सांपडली तरच त्यांना बिचाऱ्यांना शांत झोंप पडते! आणि ही त्यांची चिकाटी, त्यांची कांटेकोर दृष्टि माझ्यासारख्या अगदीं गैरहिशेबी माणसालाही अनेकदां मोहवते!

मागें मी कॉलेजांत असतांना असलं अस्सल असामान्य असिधाराव्रत अगदीं कसोशीनें पाळलं होतं!—रोजच्या आहार-निद्रेप्रमाणेंच माझ्या आयुष्याच्या या कालखंडांत मी नियमानें हिशेब लिहित असें!—पण मनुष्यस्वभावाला औषध कुठलें? माझा जन्मजात विसराळू स्वभाव माझा वेळोवेळीं दावा साधे!—अगदीं एका दिवसांत केलेल्या खर्चाचाहि तपशील मला त्याच दिवशीं संध्याकाळीं आठवत नसे!—आतां जरुरींतून नवीन शोध उत्पन्न होतात म्हणतात; तसं मात्र हिशेबाच्या बाबतींत माझं झालं खरं!

एका सुंदर प्रातःकाळीं असाच हिशेब लिहित होतों मी!—आणि त्या बाबतींत मी असाच गोंधळलों. होतों!... इतक्यांत 'किरकोळ' नांवाचा एक छोटासा पण बहुरूपी शब्द माझ्या डोक्यांत एकाएकीं अवतीर्ण झाला. क्षणाचाहि विलंब न करतां मी तो तांतडीनें तसाच झटकन् माझ्या वहींत उतरला! पण मग आश्चर्याची गोष्ट अशी कीं एकदा असा प्रवेश मिळालेला हा शब्द त्यानंतर माझ्या



वहींत अगदीं राजरोसपणें हिंडू फिरूं लागला!—कांहीं दिवसांनीं तर तो दिवसांतून दोन तीनदांहि उपस्थित होऊं लागला. सुरवातीस बिचाऱ्याची ऐपत आण्या दीड आण्याचीच होती! पण पुढें पुढें मात्र त्याची श्रीमंती भराभर वाढत गेली! आणि मग मग तर तो शब्द आपल्या खिशांतून अगदीं सहज लीलेनें दीड दीड रुपयाच्या थैल्याही सोडूं लागला!—

त्या महिन्याच्या शेवटीं मीं झोपण्यापूर्वीं पाहिलं; डावी उजवी तर अगदीं तंतोतंत जुळली होती!—आणि ती तशी दक्षतेनें संभाळतां आल्याचं मला अननुभूत समाधान वाटत होतं! त्या आनंदामुळें मी त्या दिवशीं एकदोनवेळां माझ्या मित्रमंडळींत या गोष्टीचा आभिमानपूर्वक उल्लेखही केला होता!—

पण मग दुसऱ्या तारखेला धोब्याकडे टाकावयास मी माझे कपडे बाहेर काढले, तेव्हां प्रथम माझी छाती एकदम दडपल्यासारखी झाली! कारण, एका कोटाच्या बारक्या खिशांत पांच रुपयांची नोट, दुसऱ्याच्या मोठ्या खिशांत दहा रुपये, तिसऱ्याच्या रुमालाच्या खिशांत रुपयाची मोड अशी एकंदर पंधरा रुपये बारा आणे नऊ पैंची गल्लत कपड्यांतून काढलेल्या वस्तूंत सामील झाली होती! चाळीस पन्नास रुपयांचा सारा हिशेब!. वहींत तर अगदीं पैन् पै तंतोतंत जुळलेला! काय भुताटकी झाली होती नकळे! आकस्मित हातीं आलेल्या 'स्वर्गीय देण्याचं' तें कोडं मला प्रथम कांही केल्या उकलेचना!—

पण मग त्यामुळेंच त्या दिवशीं विचाराअंतीं मला पटलं, कीं, 'हिशेब ठेवणें' ही एक अगदीं 'किरकोळ' बाब आहे! शहाण्या माणसानें त्या फंदांत पडण्यांत तसा कांहीं एक अर्थ नाहीं!—

तथापि सगळ्यांचाच हिशेब कांहीं माझ्यासारखा नसतो!—

कारण सगळे धंदे तर मोजणीमापणीवरच चालतात !

दिडकी दिडकीच्या पुड्या देणारें किराण्या मालाचें दुकान ! पण तें सुध्दा उभें राहातें, वाढतें, मोजणीमापणीच्या हिशेबांतच! कॉंट्रॅक्टर लोक दगडामातींत सांपडणारे पैसे खातात म्हणतात तें देखील आंकडे मोडीवरच ! "शंभर ब्रास खड्डा खणला, शंभर ब्रास माती उपसली मातीचे शंभर ब्रास मारले, व शेवटीं शंभर ब्रास माती गाडीभाडें देऊन एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणीं हालवली !" अशा तऱ्हेची कल्पनेंतल्या कल्पनेंत मापणी करून कागदावर १–२–६ कलम वार मोजणी करून, एकाच लहानशा खड्ड्यांतील मातीचा, लाखानें पैसा तयार करणें त्यांना नाहींतर कसं शक्य झालं असतं ? 'जपानी मिल्क पावडर'चे किंवा तानसाच्या नळकट पाण्याचे बंगले बांधण्याचं नवलपूर्ण वर्तमान घडवून आणणं दुधवाल्यांना शक्य झालं नसतं. दहा हजार मैलांवरील लढाईचा गरीब तटस्थ देशांतील सामान्य माणसांच्या अन्नसामुग्रीवर एकाएकीं परीणाम झालेला आढळला नसता. मारवाड्यांनीं किंवा पठाणांनीं आपले जिवंत पैसे अनोळखी व मरतुकड्या मजुरांच्या ताब्यांत दिले नसते !... —आणि मोजणीमापणी नसती तर 'खड्डूकोळशाची पूड+कापूर+कांहीं' असल्या फॉर्म्युल्यावर टुथपावडरच्या डब्या किंवा 'निवडुंगफळें+ साखर+जाहिरात' या फॉर्म्युल्यावर औषधाच्या बाटल्या तरी कशा भरल्या गेल्या असत्या ? एखादा म्हातारा बाप आपल्या मुलाला 'चिकटविण्या' साठीं एखाद्या कल्लेदार मिशांच्या मारक्या म्हशी- प्रमाणें कथली चष्म्यावरून पाहणाऱ्या हेडक्लार्ककडे कोणत्या आधारावर गेला असता ? आणि त्या हेडक्लार्कनें तरी त्याला कसं आपल्या ऑफिसांत चिकटविलं असतं ? टेबलावरच्या गोंदानें ! !—

तेव्हां मोजणीमापणी म्हणजेच माणसाचं जगांतलं जीवन !—



असल्या विचारांची डोक्यांत आंकडेमोड होऊं लागली म्हणून मी 'मोठ्यांचें पापी साम्राज्य' सोडून—'बालपणींचा काळ सुखाचा किती मजेचा तो अमुचा' आठवूं लागलों !—कवींनीं सर्रास नियमा- नेंच ठरविलेलीं सारीं 'निष्पाप बालकें' माझ्यापुढें उभीं राहिलीं. मीहि एकदां निष्पाप बालक असल्याची मला जाणीव झाली. आणि तसं सिंहावलोकन करून हिशेबाच्या बाबतींतील माझा निष्पापपणा मी सहज हुडकूं लागलों. पण केवढा धक्का बसला मला ! विचारांत मला स्पष्टपणें आढळलं कीं, अगदीं लहान होतों तेव्हांहि ही हिशेबी दृष्टी मला दाद लागूं न देतां माझ्या मनांत दबा धरून बसली होती — नानाप्रकारचे खेळ खेळत होती !—

एकदां दिवाळीच्या दिवसांत, माझ्या मोठ्या बहिणीच्या घरीं, तिनें मला तळतां तळतां दिलेली एक करंजी, मी माझ्या चिमुकल्या उजव्या हातांत घेतली व डावा हात लाडुकपणें पुढें केला. ते दोन करंज्यांचें भांडवल घेऊन ओटीवर एकटेंच खेळत बसल्यावर माझ्या एकदम लक्षांत आलं कीं माझ्याकडे एकच करंजी आहे !. दुसरी कोठें दिसेना म्हणून मी रडूं लागलों. माझ्या बिचाऱ्या बहिणीनें ताटांतील आणखी एक करंजी माझ्या दुसऱ्या हातांत देऊन 'झाल्याना आतां पुन्हां दोन ?' या प्रश्नार्थक निर्णयानें माझी समजूत केली. तिची पाठ वळते न वळते तोंच माझ्या डोक्यांत एकदम एक हिशेबी कल्पना आली, "माझी पहिली करंजी असती तर आतां तीन झाल्या असत्या !"... त्या कल्पनेनें हृदय भरून येऊन मी निष्पापपणें रडूं लागलों. तिनें दिलेल्या एका नव्या करंजीनें माझा सूर थांबला. पण तिच्या आंतबाहेर नव्यानव्या करंज्यांसह अशा तीनचार खेपा होऊनही, माझ्या हिशेबी डोक्याचे चाळे थांबेनात — शेवटीं जेव्हां 'सहा आहेत त्या सात झाल्या असत्या !' असें (तितक्याच निष्पापपणें) रडत मी तिला सांगूं लागलों, तेव्हां तिचें धाबें दणाणलें !

ती चिडली;... क्षणभर विचार करीत थांबली. नंतर एकदम माझ्या बरोबरच निष्पाप चेहऱ्यानें हरवलेली करंजी शोधावयास तिनें सुरवात केली.–आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे एका मिनिटाच्या आंत ती हरवलेली करंजी जवळच कोठें तरी पडलेली तिला एकदम सांपडली. ती पाहून व हातांत घेऊन माझें गाणें व हिशेब दोन्ही लागलीच थांबलीं. (त्याच प्रसंगाचा आतां शांत डोक्यानें विचार केल्यावर मला मुलें निष्पाप असतात व मोठीं माणसें लबाड असतात याची खात्री वाटूं लागली आहे. कारण माझ्या बहिणीला सांपडलेली करंजी, हरवलीहि नव्हती व तिला ती सांपडलीहि नव्हती !)

त्यानंतरचा महत्वाचा कालखंड लंगोटी व जानवें हीं अंगवस्त्रे घेऊन ब्राह्मणत्व मिळविल्यानंतरचा ! छोट्या ब्राह्मणाला तशी बाजारांत फारशी किंमत नसते ! त्यांतून मोठ्या माणसांचा मोठ्या माणसांविषयींचा पक्षपात जगप्रसिद्धच आहे. पण त्यांचाहि कधीं कधीं नाइलाज होणें साहजिकच असतें. अशा वेळीं पंगत किंवा संख्या भरण्यासाठीं छोट्यांचेंहि ब्राह्मणत्व त्यांना कबूल करावें लागतें. छोटा असो मोठा असो ब्राह्मणाला भोजनाइतकीच दक्षणा प्रिय असते. पण मग आमच्या ब्राह्मणत्वाचा हिशेब मोठ्या माणसांबरोबरीनें करून, दक्षणेच्यावेळीं मात्र मोठयांच्या वयाचा हिशेब जमेस धरून त्यांना तेवढे चार आणे व आम्हाला तांब्याची झिजलेली शिवराई देण्याचा त्या पुण्य मिळविणाऱ्या मोठया लोकांचा विश्वासघातकी दुजाभाव पाहून मला त्यावेळीं मनस्वी राग येई त्यांचा ! पण अन्यायाची चीड आली तरी उपयोग काय ? ‘ सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडित:’ हें सुभाषित त्यावेळीं पाठ नसूनहि तसें वागण्यावाचून आम्हा छोट्या ‘ब्राह्मणमंडळींना’ आमचें ब्राह्मणत्व जगविण्यासाठीं तरी गत्यंतरच नव्हतें. ‘ वस्तूपेक्षां पैशांत प्रचंड शक्ती असते ’ हें महत्तत्वही यामुळेंच हळूं हळूं स्पष्ट होऊं लागलें मला !–



परंतु अरेरे ! जेथें निष्पाप हरणें स्वच्छंदानें वागडत असतात तेथेंच दुष्ट पारधी आपलीं जाळीं बांधून ठेवतात. आमचं छोट्या ब्राह्मणांचं जेवण झालें कीं अशाच पारध्यांच्या जातीची कांहीं फंडगुंड मंडळी नेहमीं कोणत्या तरी फंडाला देण्यासाठीं आमचा पैसापैसा जमा करूं लागत. दुसऱ्यांच्या पैशावर ह्यांना अशा उडया मारायला काय ? त्या ‘ गुंडमंडळीं’च्या आवेशयुक्त मायावी भाषेनें आमच्यातील कांहीं शेळपट, जाळ्यांत सांपडून एकदम समाजसत्तावादी बनत ! मला मात्र त्यांत भांडवलशाहीच पूर्णपणें दिसून येई. आणि म्हणूनच तसल्या व्याख्यानबाजीच्या किंवा प्रत्यक्ष हल्ल्याच्या वेळींहि मी माझ्या मालकीची दिडकी माझ्या चिमुकल्या हातून कधीच सोडीत नसे !––

याचा अर्थ कद्रू माणसाप्रमाणें पै पैसा आणारुपया करीत मी संपत्तीमागें लागलों होतों असा नाहीं. माझ्या दृष्टीनें तरी त्या पैशाची प्रचंड शक्ती एवढी होती कीं एक पैसा म्हणजे सहा चाक्या, तीन खारका, एक शिसपेन्शील, साधासा पतंग अगर दोन गोळ्या...पुढें पुढें आवडीनिवडी व धोरणें बदलत गेल्यावर दोन ट्रामचीं तिकिटें, एखादा सिनेमाचा ‘शो’,...आणि आतां कोणी जेवायला घालून वर दक्षणा दिली तर विचार डोकावतो, “चला एक पाकीट सुटलं !.”

लोकाच्या हिशेबीपणामुळें आपल्या विचारध्येयांनाही बरीच चालना मिळते. या दक्षणेच्या बाबतींत माझं तसंच झालं. काळाप्रमाणें आम्ही मोठे झालों तरी आमच्यावर एकदां बसलेला ब्राम्हणत्वाचा शिक्का कायम राहिला. इराणी – मुसलमान – पारशी आदी यवनांच्या भ्रष्टाकारामुळें आमचें ब्राम्हणत्व वास्तविक संपुष्टांत येत होतें तरी अजूनहि आमच्या ब्राम्हणत्वाच्या तिकिटीवर आम्ही दुसऱ्यांकडून पैसे घेऊन पुख्खा सोडावयास जात असूं !–वयाबरोबर आमच्या दक्षणेचा बाजारभाव वाढला असला तरी दुजाभाव व

विषमता अजून जगांत कायम असल्याचें आढळे. कारण "एक जावई=पांच ब्राह्मण=(अर्थात) १। रु. दक्षणा" असल्या आमच्या मावशीच्या पुण्याईच्या कोष्टकांतील हिशेबी लबाडी व खाजगी व्यवस्था पुढें पुढें माझ्या पूर्णपणें लक्ष्यांत येत गेली. आणि मग एके दिवशीं माझ्या हिशेबी वृत्तीनें एका प्रबळ विचाराला जन्म दिला— "छे बुवा!—आपण आतां केव्हां कोणाचे जावई होणार???"

ह्या हिशेबी वृत्तीचा कांहीं मुलांच्या मनांत मात्र उगीचच गोंधळ झाल्याचं आढळतं!

कांहीं वर्षांपूर्वी आमच्या शेजाऱ्यांनीं मोठ्या हौसेनें राहाण्या-साठीं घर बांधलं! त्यांच्या कॉंट्रॅक्टरचा अंदाज १२ हजारांचा पण तो शेवटीं १५ हजारांवर गेला! कॉंट्रॅक्टरकडे कुरकुरत आमचे दादासाहेब म्हणत होते, "अहो, पंधरा हजार म्हणजे काय झालं हो?"

नुकताच इंग्रजी शाळेंत दाखल झालेला त्यांचा धाकटा मुलगा जवळ उभा होता. त्यालाहि त्याच्या वडिलांचें तें विधान पटकन् तंतोतंत पटलें! त्याला एकदम 'स्फूर्ति' आल्यासारखें झालें; आणि मला विश्वासांत घेऊन तो हळूच म्हणाला, "...अबब! पंधरा हजार! पंधरा हजारांचें पेपरमिंठ घेतलं असतं तर किती आलं असतं? नाहीं हो?"

मला त्या उद्गारामुळें एकदम येणारें हंसू मी आंतल्या आंत दाबून त्याला लागलींच म्हणालों, "खरंच! खूपच आलं असतं! पण तें ठेवायला पंधरा हजारांचीं चार नवीन घरं बांधावीं लागलीं असतीं नाहीं कां तुझ्या दादांना? एकदमच सारं पेपरमिंठ खाऊन टाकण्याची तर तुझी कल्पना नव्हती ना?—"

तसं पाहिलं तर या लहान मुलांचंच कशाला पाहिजे?—मोठीं



माणसंही असल्या हिशेबानें एक तर स्वतःच्या मनांत समाधान मानून घेतात किंवा दुःख करून घेतात!—

'एका उमद्या तरुणानें चालत जगाचा प्रवास केला; पांच वर्षांत तो ५८९७ मैल चालला' हा त्याचा छापून आलेला विक्रम, दिडशेंहून अधिक रुपयांवर रेल्वेंत कामावर असलेल्या आमच्या एका लांबच्या नातलगाला मी कौतुकानें वाचून दाखवितांच ते एकदम त्राग्यानें चवताळून मला म्हणाले, "नकोरे त्याचं मोठं हें ऽ सांगूस!...त्याना नी तुम्हाला नसतात उद्योग!... आम्हीं काय कमी चालतों? कमी धांवतों? कमी प्रवास करतों, तुम्हांला वाटतं?— अरे आतांपर्यंतचा सारा हिशेब तुला सांगितला तर मीसुध्दां सुमारें २२,६०० मैल चाललोंय; दीड हजार मैल तरी धांवलों असेन!— आणि या घटकेपर्यंत मी आयुष्यांत सहा लाख मैलांहून अधिक प्रवास केला आहे! समजलास?—"

दादासाहेबांच्या बाळूनें केलेल्या पेपरमिंटसारख्या गोड विधानावर मी जितका हंसलों तितकाच त्यांच्या लांब पल्लेदार विधानावरही हंसलों! हसतां हसतां मला त्यांचा हिशेब समजला; माझें आश्चर्यहि ओसरलें! कारण ते रोज स्टेशनपासून तों स्टेशनपर्यंत तीन मैल चालत जात असत! रोज गाडी पकडायला शेवटचा फर्लांग दीड फर्लांगभर त्यांना बहुतेक दुडक्या चालीनें धांवावें लागे; व ते 'कल्याण-फास्ट डेली-पॅसेंजर' असल्यामुळें रोज त्यांचा जाऊन येऊन कमीत कमी पासष्ट सत्तर मैल प्रवास होत असे! त्यांत दरवर्षी रेल्वेकंपनीकडून मिळणाऱ्या फुकट पी. टी. ऑर्डरीची पुन्हां भर!... आणि ऑफिसमध्यें असल्या हिशेबाचेंच ते काम करीत.

मात्र या हिशेबी वृत्तीनें सुख मिळविणाऱ्या मंडळींपेक्षा हिशेब करून दुःख करणारी मंडळीच आपल्या भोंवतीं जास्त आढळतील आपल्याला, मला वाटतं!—

परवां एका गृहस्थाकडे गेलों असतांना तो अगदीं विषण्ण चेहरा करून हळहळत मला म्हणाला, " पंचवीस वर्षे आम्हीं मुंबईत रहातों. जवळ जवळ अकरा हजार रुपये भाडं भरलं हो! गांवीं स्वतःचा एक बंगला झाला असता बघा!"– आतां यांना गांवीं राहून पगार कोणी दिला असता हा प्रश्न अगदीं ओठापर्यंत येऊनहि तो विचारण्याचें मी विचारपूर्वक टाळलें!

नेहमीं हातांत ' गोल्डफ्लेक 'चा सिगारेटचा डबा घेऊन सिगारेट ओढत सगळीकडे फिरणारा माझ्या माहितीचा एक व्यापारी प्रतिनिधी त्या दिवशीं एखाद्या तत्वेवेत्त्याप्रमाणें विचारी मनःस्थितींत शिरून मला म्हणाला, " हें व्यसन फार वाईट बघा. मी आतांपर्यंत जवळ जवळ सहा हजार रुपये जाळले! ते शिल्लक टाकले असते तर—— ?" पण मला तर वाटतं तसं कधीं झालंच नसतं! आणि अशक्य गोष्ट शक्य झालीच असती तर मग त्यानें शिल्लक टाकलेले ते सारे पैसे नंतर एकाच दिवशीं बसून जाळले असते!

असाच विचार करूं लागलों तर आपल्याला आपल्या आयुष्याचाही असा मोजून मापून आढावा घ्यावासें वाटेल. आणि मग एखादा कर्मठ ब्राह्मण आपण संध्येच्या वेळीं आतांपर्यंत किती ग्यालन पाणी भुरकलें तें सांगेल; किंवा निरनिराळ्या श्रावणांच्या वेळीं मिळून आपल्या पोटांत किती टोपल्या शेण अगर किती हंडे गोमुत्र गेलें व त्यामुळें चित्रगुप्तानें आपल्या नांवें किती पिंप पुण्य नोंदून ठेवलें त्याची तो अगदीं कांटेकोर बेरीज देऊं शकेल. आणि त्याच हिशेबी दृष्टीनें रोज बोकड कापणारा कसाई, दिवसाला चार दोन पेशंट आपल्या औषधानें मारणारा डॉक्टर, अट्टल खुनी दरोडेखोर व सारखीं युद्धें करीत असलेलीं राष्ट्रें, यांनीं गम्मत म्हणून आढावा घेतला तर मग त्यांची त्यांनाच कधींतरी खात्रीनें भोंवळ येईल मला वाटतं!—



अशा दृष्टीनें मोजणी मापणीची पहाणी केली कीं माझी तर छाती अगदीं दडपते, भयंकर दुःखहि होतें!– जगांत पहिल्या प्रथम मोजणी मापणी करणारा मनुष्य आज याक्षणीं जिवंत असता तर ... पण त्या नीच माणसानेंच जगाला एक नवीन कुत्सित दृष्टी दिली एवढं खरं! त्यामुळेंच वेलीवर फुलणारीं फुलें हंसतांना पाहून आनंदणारा मनुष्य तीं खुडून मोजून परडींत टाकूं लागला. ' पशूंपेक्षां आपण पुष्कळ शहाणे आहोंत; आपल्यालाच देवानें अधिक बुध्दि दिली आहे.' असें तो विनाकारण बेडरपणें ओरडून सांगूं लागला. 'या वर्षी आमच्या राष्ट्रानें पन्नास लाख बॉंब गोळे तयार केले!..' 'आमच्या तोफेची फेंक १०० मैलांपर्यंत पोहोंचते!' किंवा ' आमच्या विमानांनीं बिनधोकपणें आजच्या दिवसांत शत्रूंच्या हजारा हजारांच्या पांच फलटणी जमीनदोस्त केल्या!!!...' असल्या शेंकडों वल्गना हजारों मैलांवरून रेडिओ लाख्खो लोकांपुढें बोबलूं लागला; एका देवावरून लोक तेहत्तीस कोटी देवांच्या हिशेबावर आले!

मोजणी मापणीला दुसरीहि बाजू आहे. पण तिकडे मात्र माणसाची दृष्टी शेवटीं जाते!—

एका माणसाच्या सुखापेक्षां हजारों माणसांचं सुख जास्त चांगलं हें त्याला समजत नाहीं. एकाच्या नांवें बँकेंत शीरसलामत पडलेले किंवा रिझर्व्ह बँकेकडे धाव घेणारे शेकडों हजार रुपये लाख्खो कर्तबगार होतकरू लोकांच्या हातीं गेले तर कोट्यावधी लोकांचें पोट भरेल,...याची त्याला जाणीव होत नाहीं!—एका राष्ट्राचें अनेक देशांवर राज्य चालण्याऐवजीं साऱ्या राष्ट्रांचें साऱ्या राष्ट्रांवर राज्य चालावें ही कल्पना माणसाला रुचणार नाहीं!... किंवा—

पण या मोजणी–मापणीविषयीं आणखी हजारों शहाणेवेडे विचार या एकाच क्षणीं डोक्यांत येऊन जात असले तरी या एका

लेखाची मोजणी–मापणी करण्याची आतां वेळ आली आहे!– कारण संपादकांच्या इच्छेप्रमाणें एक दिवसांत हा लेख त्यांच्या हातांत द्याव-याचा!.. आणि (त्यांच्या हिशेबी दृष्टीनें, रोख पैसे मिळणाऱ्या जाहि-रातीसाठीं जागा रहावी म्हणून) त्यांनीं मला फक्त आठ कॉलमाची मर्यादा घातली आहे; तेव्हां माझी खूप इच्छा असली तरी यापुढें एक शब्द देखील लिहिणें, मला शक्य नाहीं!—

चिमूट २ री

# पढवलेले पोपट

एका नवख्या लेखकाच्या कांहीं बाबतींत सदोष पण एकंदरींत पाहतां नाविन्यपूर्ण आणि सुंदर अशा पुस्तकांवर एका गाजलेल्या टीका-कारानें लिहिलेला अभिप्राय माझ्या परवां वाचण्यांत आला.

तें पुस्तक मी आधीं वाचलें होतें म्हणून बरें! आणि त्या टिका-काराची–माझी वाङ्मयीन ओळख असल्यामुळें मला त्याची वृत्तिाहि ठाऊक होती. नाहींतर आजच्या घाईच्या युगांमध्यें घाईघाईंत वाचलेल्या टीकालेखांवरच आपण मूळ कलाकृतीची किंमत करीत असतो; तेव्हां त्या पुस्तकाविषयीं माझा नक्कीच भयंकर गैरसमज झाला असता! त्या नवख्या लेखकाबाबत माझ्या हातून अक्षम्य अन्यायहि झाला असता कदाचित्....

या समीक्षकब्रुवांनीं त्या लेखकाच्या भाषेकडे पाहून त्याविषयीं लिहितांना आपल्या भाषेचेंच अवडंबर माजवलें होतें! त्या पुस्तकांच्या अंतरंगांतील गुणदोष दाखवतांना प्रत्यक्ष त्या पुस्तकाविषयीं कांहीं न लिहितां, आपण स्वतः वाचलेल्या इंग्रजी पुस्तकांचा व त्यांच्या गुणदोषांचाच

आढावा घेतला होता! (कदाचित् तसल्या पुस्तकांचीहि त्याची ओळख त्या पुस्तकांविषयींच्या दुसऱ्या पुस्तकांवरूनच त्याला झाली असावी!) परीक्षणविषय झालेल्या त्या पुस्तकाच्या लेखकाचीं मतें त्यानें आपल्या टीकालेखांत मांडण्याऐवजीं किंवा त्यांच्या योग्य स्पष्टीकरणाऐवजीं त्यानें आपलीच तऱ्हेवाईक आत्यंतिक मतें मांडलीं होतीं! व त्यांचेंच शेवटीं परीक्षण केलें होतें. अर्थातच आपल्या समर्थनार्थ इंग्रजी उधृतांचा अगर त्यांच्या बोजड अनुवादांचा लेखाच्या शिरोभागापासून तों शेवटापर्यंत, त्यानें खूपच चिवडा केला होता.

थोडक्यांत, त्या टीकाविषय असलेल्या पुस्तकांत काय आहे हें न सांगतां, आपल्या मनांत काय आहे याचा आविष्कार त्यानें केला होता! समोर आहे त्या मजकुरांत काय नसावें, व असलेलें कोणतें चांगलें ह्याचा प्रतवार करण्याऐवजीं, काय असावें याची लांबलचक यादी देऊन, तें सर्व नाहीं म्हणून, 'एका शब्दांत म्हणायचें तर तें दरिद्री कसें आहे,' ह्याचाच आवेशयुक्त पुकार त्यानें केला होता.

मग तेवढ्यानेंही त्यांचें समाधान न होऊनच कीं काय, हें सारें न्यारें खंडन–समर्थन सबंध लेखांत होण्याचीहि वाट न पहातां त्यानें अगदीं सुरवातीसच त्या पुस्तकाच्या नांवाला उद्देशून लिहिलें होतें– "हा कालचाही नव्हे व महाराष्ट्रहि नव्हे!– मात्र या पुस्तकानें कालच्याच काय पण आजच्याही महाराष्ट्राची बदनामी तेवढी झाली आहे!—"

दुसऱ्याची बदनामी झाली किंवा त्यांवर कोणी प्राणांतक प्रहार केला, तर त्याच्या सुखदुःखाशीं किंचितहि सबंध नसलेल्या त्रयस्थ माणसाला अकारण का होईना आनंदच वाटत असतो! या सत्य गोष्टीचा कोणाला अनुभव नाहीं?... छापलेलें तेवढें खरें, ही सामान्य माणसाची वृत्तीच असते. आणि ती सामान्य माणसाची भूमिकाच मुख्यतः लक्षांत घेऊन या विद्वान् टीकाकारानें त्या लेखनाच्या प्रसिद्धीनें आपल्या टीकालेखांत एक ओजस्वी भर मात्र टाकली होती.



आमचे तात्या त्या दिवशीं अपेक्षेप्रमाणें धांवतच आले; त्यांना आनंदाच्या अगदीं उकळ्यावर उकळ्या फुटत होत्या! मोठ्या उत्साहानें पूर्वींच माझ्या वाचनांत आलेला तो अंक त्यांनीं माझ्यापुढें धरला; आणि नेहमीच्या त्यांच्या खोंचक पद्धतीप्रमाणें हंसत हंसत ते मला म्हणाले, "का कशी उडवली आहे तुमच्या त्या 'कालच्या महाराष्ट्र'वाल्याची... त्या टीकाकर––यांनीं?.. तो बेटा, पुन्हां कधीं वर मान करणार नाहीं बघा! असेच सोनारानें चांगले कान टोंचले पाहिजेत. अहो, जो उठतो तो लेखणी हातांत धरतो हल्लीं—"

बाकी कांहीं नसलें तरी मला तात्यांचें शेवटचें वाक्य मात्र पटकन् पटलें!– हल्लीं जो उठतो तो लेखणी हातांत धरतो!– हो, खरेंच तें!

आणि म्हणूनच खऱ्या टीकाकाराची भूमिका किंचिन्मात्रही न समजतां या आमच्या टीकाकारानें, त्या नवीन लेखकाचा, आपल्या मोठेपणासाठीं अनावश्यक विद्वत्तेनें भरलेला टीकालेख लिहून, सपशेल मुडदा पाडला होता!... जणूं काय, नवीन उत्साही लेखकांचे मुडदे पाडायचे हा मुडदेफराशीचा धंदा म्हणजेच टीकाकाराची भूमिका!–

आपल्याला समजत नाहीं तें सुंदर, गहन, उत्कृष्ट, अशी सामान्य माणसाची दृष्टिच असते; त्यामुळें, आमच्या तात्यांसारखा एखादा, तो तसला लेख चावला न चावला करूनही, त्याला उत्कृष्ट ठरवतो व त्या टीकाकाराच्या वरवर दिसणाऱ्या पांडित्याचा सासुरवास स्वतःच्या मनाला करून घेतो!– दुसऱ्याच्या लिखाणालाहि लावतो! ओघानेंच असल्या बोलघेवड्या आधुनिक मल्लिनाथांचा उथळपणा अविचारी माणसांच्या दृष्टींतून पटकन् सुटतो.

पण नीट विचार केला तर–असल्या बेफाट 'टीकागीरां'चे इतिकर्तव्य – मामुली, मुळमुळीत स्तुतिपाठक टीका लिहिणाऱ्या त्यांच्या दुसऱ्या जातीच्या टीकाकारांच्या कामगिरी इतकेंच घातुक असतें; अगदी निरुपयोगी असतें!

कारण हे पढवलेले पोपट आपल्या वाचनाच्या मर्यादित जगांत खुर्ची टेबलाजवळ बसूनच वावरतात. केवळ आपल्या पूर्वग्रहांच्या कसोटीवरच प्रत्येक नवीजुनी कलाकृती घासून तिचा कीस पाडतात. आणि कलावंताच्या गुणदोषांचें सहानुभूतिपूर्ण व यथार्थ आविष्करण करण्याऐवजीं स्वतःच्या पांडित्याचीच फुकटी जाहिरात करतात. आणि म्हणूनच, असल्या टिकाकारांना जगांत स्वतंत्रपणें, चांगलें असें कांहींच दिसत नाहीं. त्यांच्या दृष्टीला कोणी 'महाराष्ट्राचा जॉनसन' दिसेल; कोणी 'हिंदुस्तानाचा शॉ'वाटेल, कोणाच्या काव्याच्या चोपड्याची ते 'उमरखय्याम'शीं तुलना करतील; कुणाची नाटकें पाहून त्यांच्यात त्यांना 'इब्सेन'चा नवा संचार आढळेल!

पण ही यादी लांबण्याइतकें आतां माझेंच पांडित्य शिल्लक राहिलेलें नाहीं व त्याची मला जरुरीहि वाटत नाहीं!–

दुसरी गंमत अशी कीं या अहंमन्य पंडित टिकाकारांच्या कोशांत मुख्यत· दोनच महत्वाचे शब्दसमूह असतात. एक 'अतीव सुंदर... अद्वीतीय' आणि दुसरा 'टुक्कार भिक्कार'! हे शब्दहि इंग्रजी शब्दांवरूनच सुचणारी मराठी आवृत्ती असते!– त्यांतींल दुसऱ्या शब्दासमूहाचाच उपयोग बहुधा ते करत असतात. आणि ज्या ज्या वेळीं ते चुकून पहिल्या वाटेला वळतात, त्यावेळीं, त्यांच्या तसल्या समर्थनावर आपला विश्वासहि बसणें अगदीं अशक्य असतें! कारण, त्यांच्या त्या उरल्या शब्दांचा त्यांनीं त्या घटकेपर्यंत वेळी अवेळीं केलेला उपयोग आत्यंतिक व विकृत स्वरुपाचा झाल्याचा आपल्याला अगदीं अस्सल पूर्ण अनुभवच असतो आधींचा.

तरी या दोन शब्दांतच खामावणाऱ्या त्यांच्या अखेरच्या निर्णयाच्या समर्थनासाठीं त्यांच्या खिशांत देशी–विदेशी, जुनी–नवी, अशी ग्रंथकारांचीं विष्णुसहस्त्रनामें चलनी नाण्यांसारखीं तयार असतात. आणि उताऱ्यांचीं भेंडोळीं, उधृतांच्या ठिणग्या, वगैरे अनेक प्रकारचा माल-



मसाला तर जादुगाराच्या पोतडीप्रमाणेंच, त्यांच्या अभ्यासजड मनाच्या पोतडींतून केव्हांहीं निघूं शकतो. अर्थात म्हणूनच, हरिभाऊ, वरेरकर, फडके, खांडेकर, अशीं सरळ नांवें न घेतां त्यांचें 'इंग्रजी–कारण' करून त्यांची ते बदनामी करतात!–

'वर्ग' 'घन' करण्याची प्रथा अजून कोणी पाडल्याचें माझ्या तरी आढळांत नाहीं. तरी पण कोणी कोणी पुढलाच पल्ला गांठून "शेक्सपीअर + कालिदास=...." अशा प्रकारचीं समिकरणें मात्र मांडतात. जणूं काय लॉगटेबल घेऊन आवर्तदशांशचिन्हांपर्यंत बेरजावजाबाक्या करूनच हे असल्या समिकरणांपर्यंत आले असावेत असा कोणालाही क्षणभर भास व्हावा!...

पण अशा उधृतबाज पंडितांना प्रत्यक्ष जीवनाचें चित्र मात्र कधींच नीट समजत नाहीं!– कारण, त्यांचा प्रत्यक्ष जीवनाशीं संबंधच फार थोडा येत असतो. या पोपटांची शिदोरी त्यांच्या पिंजऱ्यांतलि जगांत बांधून ठेवलेली असते. आणि त्यामुळेंच, त्यांच्या गुरूंनीं पढविलेले तेच तेच शब्द, तींच तींच वाक्यें, त्यांच्या तोंडून 'विठु ऽ पोपटा' प्रमाणें बाहेर पडत असतात! पोपटाला ज्याप्रमाणें त्याला येते तेवढीच भाषा खरी वाटते, त्याचप्रमाणें ह्यांना ठाऊक आहे, ह्यांना पटते, तेवढीच कला, तीच उत्कृष्ट कलेची गमकें, असें त्यांना वाटत असतें. प्रत्यक्ष जगांत भरलेलें ज्ञान पुस्तकांच्या चौकटींत चार नामवंत विलायती लोकांनीं भरून दिल्याशिवाय, या तांत्रिकांच्या अतीव सामान्य बुद्धीला तें पचवण्याची किंवा तें आकलन करण्याची मुळींच ताकदच नसते!–

आणि अशा तऱ्हेनें परावर्तित किरणांचीच ज्यांच्या दृष्टीला नेहमीं संवय झालेली असते, त्यांना प्रत्यक्ष प्रकाशकिरण पहातांच भोंवळ येते; त्यांचे डोळे दिपून जातात; त्यांच्यापुढें अंधार दाटतो! यांत आश्चर्य कसलं! अर्थात्च जगांतील प्रत्यक्ष जीवनाविषयींच्या त्या त्यांच्या दारुण अंधारांत, त्यांच्याच मर्यादित कृत्रीम जगांतील पुस्तकी काजवे चमकतात!

फिरफिरून त्यांना भुरळ घालतात! आणि मग आपल्याच अंधारांचे जगावर दिमाखानें परिवर्तन करण्याचें एक नवलपूर्ण वर्तमान घडवून आणण्याचें मात्र त्यांना श्रेय मिळतें!—

असल्या विद्वत्ताजड शब्दशूरांना प्रत्यक्ष अनुभवाची, प्रत्यक्ष जगांतील सौंदर्याची, जरा देखील कल्पना नसते; हें अक्षरशः खरें आहे!— त्या ज्ञानी लोकांच्या अज्ञानाला अमर्यादा कक्षा असतात. त्यांना हजारों मैलांवरील घडामोडी समजतात. पण शेजारच्या गांवांतील किंबहुना आपल्याच गावांतील चार ढोबळ गोष्टीही सांगणें अशक्य वाटतें! ते हजारों वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या चारदोन परकीय कलवंतांचीं नांवें पटापट घेतील; त्यांच्या कलाकृतींची धडाधड माहिती सांगतील! त्यांचीं वाक्यैंच्या वाक्यें समक्ष माणसाच्या तोंडावर फडाफड फेकतील!,.. पण ज्या भाषेंत ते बोलतात, लिहितात, तिच्यांतील त्यांच्या भोंवतीं जिवंत फिरणाऱ्या मरतुकड्या गरीब बिचाऱ्या कलावंतांची, त्यांच्या रक्तानें लिहिलेल्या कलाकृतींची, त्यांच्या ओजस्वी विचारांची, या अहंमन्य पंडितांना असलीच तर अगदीं तुटपुंजी माहिती असतें! त्यांना माहित असलेल्या परकीय कलावतांचा, परकीय भाषेचा, परकीय विचारांचा, ते हां हां ह्मणतां आपल्या भाषेंत पुरस्कार व पुकार करून मोठेपणा सिद्ध करतील पण चोरबाजारांतील जुन्या वस्तूंच्या दुकानाप्रमाणें असल्या गोष्टींनींच त्यांचें लेखन भरलेलें असल्यामुळें, बाल्यावस्थेंत असलेल्या पण प्रगतिप्रत धडपडणाऱ्या आपल्या भाषेविषयीं, तिच्या संस्कृतीविषयीं, तिच्यांतील कलावंतांविषयीं त्यांच्या मनांत केवळ अनादर तेवढाच शिल्लक राहिलेला असतो!

हे असले जाडे विद्वान हटकून बक्षिसेंहिं मिळवतात! पण मग त्याला कारणें;... त्यांची सामान्य बुद्धी; नाकासमोर चालायची आवड, शब्दब्रंबाळ व मर्यादित कक्षा, हींच होत!— आणि दुसरें म्हणजे त्यांचे हे 'ज्ञान' त्यांच्यासारख्या 'ज्ञानी' मणसांनाच कायतें समजण्यासारखें असतें! शिक्षणानें मनुष्य शहाणा होण्यापेक्षां मूर्ख व आंधळाच जास्त होतो; म्हणूनच असेल कदाचित्—त्यांच्या सारख्याच मूर्ख, आंधळ्या, 'ज्ञानी' माणसांना त्यांची खरी किंमत कळते!— त्या उलट, इतर जीं खरोखरच अज्ञानी माणसें असतात, तीं स्वतंत्र बुद्ध्यभिभावीं त्यांना मोठे म्हणूं लागतात!... मग अशा जमान्यांत त्यांच्यावर पांडित्याचा शिक्कामोर्तबहि बसावयास काय वेळ?



असल्या या पंडित मंडळींना एकाद्या बाबतींत त्यांचे मत विचारलें तर ते भराभर पन्नास माणसें व त्यांची शंभर वाक्यें तोंडावर फेंकून विचारणाऱ्या माणसाला एका क्षणात दिपवून टाकतील! पण मग तो तितकाच शांत डोक्याचा, धीरगंभीर वृत्तीचा व खंबीर मनाचा असला, आणि त्यानें तें सारें शांतपणें ऐकून पुढें हळूच विचारलें, "कबूल हो! हीं झालीं त्यांचीं मतें! 'युवर मास्टर्स! व्हाइस' पण आतां आपलं मत सांगा कीं!"

ते चपापतील, गोंधळतील, अडखळतील! पण कांहीं बोलणार मात्र नाहींत. यदा कदाचित् पुन्हां धीर करून बोललेच तर बोलण्यापूर्वी प्रथम रागावतील व मग रागांतच त्याला म्हणतील, "तुम्हाला कांहीं अक्कलच नाहीं!— तुम्ही तें हें ऽऽ वाचिलं नाहींत वाटतं. ऽ याविषयीं तो हा—..."

पण वस्तुस्थिती मात्र अशी असते, कीं त्यांनाच स्वतंत्र अशी कांहीं अक्कल नसते. ते पुस्तक वाचतात त्यापेक्षांहीं जास्त पुस्तकांविषयींचीं पुस्तकें वाचतात. आणि त्यामुळें त्यांचीं डोकीं उधृतांनीं व उधृतांतून निवडलेल्या उधृतांनींच खचून भरलेलीं असतात. त्यांचीं प्रत्यक्ष इंद्रियें, प्रत्यक्ष आकलनशक्ति व प्रत्यक्ष भावनांचा झरा ज्या ठिकाणीं असतो तें हृदय, हीं सारीं साधनें,... केव्हांच अर्धमेलीं पाऊणमेलीं होऊन राहिलेलीं असतात! त्यामुळें त्यांना प्रत्यक्ष जगाकडे चौफेर दृष्टि टाकणें अशक्य असते. प्रत्यक्ष जीवनांतील प्रत्यक्ष जोर त्यांच्या निर्बल मनाला हजारों 'व्होल्टेज'चा विजेचा धक्का देतो!—

त्यांच्या मर्यादित ज्ञानाला एक अगदीं साधी गोष्ट कळत नाहीं, कीं प्रत्यक्ष जगांत,...जीवनांत...ज्ञानाचें जेवढें अखंड अमर्याद भांडा

भरलेलं असतें तेवढें त्यांच्या जादुगाराची पोतडी झालेल्या किंवा कद्रु माणसाची पैशाची थैली झालेल्या मनांत नी (त्यांच्या घरांत स्वतःची लायब्ररी असलीच तर तिच्यांतील) पुस्तकांतही भरलेलें नसतें....

एवढयाचमुळें मला तर वाटतें असल्या विद्वानांच्या लेखनांतील उधृतें, आधार, व अफाट शब्दबंबाळ काढून टाकले तर खालीं बाकी काय राहील या विषयीं विचार करणें फार गोंधळाचें होईल!

इंग्रजी शाळेच्या खालच्या वर्गातील एखाद्या मुलानें शाळेंतील निबंध–पुस्तकांत, स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या वातावरणांतील विषयावर, घाबरत घाबरत लिहिलेल्या व जीवनाच्या जिवंत पायावर उभारलेल्या निबंधापेक्षांही या पंडिताचें लिखाण खात्रीनें हिणकस ठरेल! कारण त्या मुलांच्या लिखाणांत दंभ तरी नसतो; पांडित्य औषधालाहि सांपडत नाहीं! सगळें जग मूर्ख व आपण शहाणें ही तरी निदान त्याची भूमिका नसते आपल्या मर्यादित ज्ञानाची तर त्या बिचाऱ्याला जास्तीतजास्त कल्पना असते; आणि त्यामुळेंच त्याचें लिखाण खऱ्या सामान्य माणसांना समजण्यासारखें नवजीवनानें भरलेलें असतें!

या उलट वरील विद्वानांचें पांडित्य, ज्ञान सारेंच दांभिक व उसनें असते!– त्यामुळें तें फक्त त्यांच्यासारख्याच चारदोन पंडिताना समजतें!... ओघानेंच जगाच्या हिताच्या दृष्टीनें तें वाङ्मय निरोपयोगी व अजागलस्तनवत् असते.

आणि असल्या निर्जीव वाङ्मयाचे हे पंडित लेखकहि जिवंत असून मेल्यासारखे असतात!–

---

चिमूट तिसरी

# "शुकशुक" मंडळी!

आपल्याच तंद्रींत गुंग होऊन आपण मुंबईच्या एखाद्या हमरस्त्यानें जात असतांना, कोणीतरी कोणालातरी हांक मारण्यासाठीं "शुऽऽक् शुऽऽक्" करावें! इतर हजार माणसांप्रमाणेंच आपण चारी बाजूंस चौकसपणें पाहूं लागतों!

त्या गाढवाला एकच खात्रीचें समाधान, कीं त्याला पाहिजे असलेला मनुष्यहि त्या हजारांत असतो—आणि केवळ त्या आनंदांत दंग असल्यामुळें इतर ९९९ लोकांच्या गैरसोईची, सुखदुःखाची, त्याला किंचितही पर्वा वाटत नसते.

त्याला त्याची दखलगिरीच नसते! पण ह्या इतर लोकांचे हाल मात्र कुत्राहि खात नाहीं! 'कोणी संकेत केला,' हें असें सभोंवार पहात असतांना, समोरून येणारें बसचें धूड अगदीं मुंगीसारखें वाटतें; एखादी बाई विजेच्या खांबासारखी भासते; पायाखालचें केळीचें साल अदृश्य स्वरूप धारण करतें; कंडक्टरनें दिलेले खोटे चार आणे आपण तसेंच खिशांत कोंबतों! आणि अशाच अनेक इतर घडामोडी व त्यांवर आधारलेल्या भयंकर घडामोडी घडून येतात.

त्या एकाच मिनिटांत, धांवत्या चित्रपटाप्रमाणें चाललेल्या जगाच्या साऱ्या हालचाली फिल्म तुटल्याप्रमाणें आपल्यापुरत्या तरी बंद पडतात.

दोन्हीं, आपण त्या ९९९ लोकांत असलों तर आपल्याला भयंकर संताप येतो,.. त्या " शुऽऽक् शुऽऽक् " करणाऱ्या माणसाचा! त्याला खाऊं कीं गिळूं असें वाटतें !.. त्याच्या त्या आपल्या दृष्टीनें अकारण झालेल्या शुकशुकाटामुळें आपल्या दृष्टीपुढें त्या गजबजलेल्या रस्त्यांत चारी बाजूंस एकसारखा शुकशुकाट ऐकूं येतो,.. दिसतोहि ! मग तीच बदमाश व्यक्ती,.. ' किंगकाँग ' प्रमाणें त्या शून्यवत् वाटणाऱ्या जगांत एकटीच हंसत उभी आहे असा क्षणभर भास होतो !—

मला तरी, अशा वेळीं, कुठेंतरी वाचलेली एक कल्पना, सारखी मंडावून सोडते ! आणि त्या नाविन्यपूर्ण पिसाट कल्पनेचा या ' नराधमा ' च्या बाबतींत लागलीच उपयोग करावा असें मला फार फार वाटतें.

अहिंसा व शांतता दोन्ही मला आवडतात. पण तरीहि वाटतें, असे चारदोन ' शुक् शुक् ' करणारे लोक तसेंच अचानक पकडावेत आणि त्यांची एक अगदीं न्यारी वासलात लावावी !

आपल्या खेड्यांतील घरामागें मोठी आंबराई असावी; त्याला मे महिन्यांत खूपसे आंबे आलेले असावेत; आणि कावळे आपल्या ' आकाशांतील बापाचा ' माल म्हणून त्या फळांची नासाडी करित असावेत !...म्हणजे आपण काय करतों ? आपली बंदूक घेतों, काडतुसें काढतों व त्यांतील दोनचार कावळे आपण त्या बंदुकीनें खालीं पाडतों ! मग ते बांबूच्या उंच काठीवर आंबराईंत ठिकठिकाणीं उलटे टांगूनहि ठेवतों !

नाक्यानाक्यावरून उगाच ' शुकशुकाट ' करणाऱ्या असल्या शांतताभंगी लोकांच्या बाबतींत देखील हीच पिसाट कल्पना माझ्या डोक्यांत अनेकदां येते !—

आतां, ही कल्पना मूर्त स्वरूपांत आणण्याची कांहीं माझ्यांत ताकद नाहीं, ही गोष्ट खरी ! पण निदान केवळ त्या कल्पनेनें तरी त्या क्षणीं माझा राग अर्धा अधिक निवतो !



' भविष्य काळांत कांहींतरी चांगल्या गोष्टी होणार आहेत ! ' या कल्पनेच्या आशेवरच, चालू विकट परिस्थितींतून आपण आपलें कमकुवत तारूं पुढें ढकलीत असतो... नाहीं कां ?

पण मग या शुकशुकाट करणाऱ्या लोकांपैकीं कांहींबद्दल तरी मला अकारण सहानुभूति देखील वाटते.

समजा, एखाद्या माणसाची पुष्कळ वर्षें आपल्याला भेटच होत नाहीं, आणि तो आपल्या डोळ्यांदेखत एका अजस्र बसमध्यें चढून पुन्हां अफाट मुंबापुरीच्या पोटांत नाहींसा होत आहे...

किंवा समजा, घरांत आपलं प्रिय माणूस अत्यवस्थ आजारी आहे. अगदीं जन्ममृत्यूचा प्रसंग आहे ! आणि दुसऱ्या कांहीं 'व्हिजिट'ला गेलेले डॉक्टर दवाखान्यांत न सांपडल्यामुळें, ' पुढील दोन तासांपर्यंत आतां घरांत काय होणार ?' असा विचार करीत खिन्न मनानें आपण परत घराकडे चाललों आहोंत !–तोंच, समोरून त्यांचीच मोटार एका व्हिजिटहून दुसऱ्या व्हिजिटला जावयास निघालेली आपणास दिसली.....

किंवा–असेच कांहीं आणीबाणीचे प्रसंग आले,...तर ?...

असल्या मनःस्थितींत कोणी असला शुकशुकाट केला,–नव्हे, जोरानें टाळ्या वाजवल्या–तरी त्याचें मला कांहीं वाटणार नाहीं ! अशा वेळीं, माणुसकीच्या अलिखित नियमांप्रमाणें त्या व्यक्तीच्या मोठ्या थोरल्या दुःखांतच मघां म्हटलेल्या ९९९ लोकांच्या हालांचा मी तरी समावेश करूं शकेन !

पण ह्या शुकशुकाट करणाऱ्यांच्या जातींत वर म्हटलेल्या असल्या प्रकारचे फक्त हजारीं एकदोनच सांपडतात ! बाकीचे, त्यांना उद्योगधंदा नसतो म्हणून किंवा त्यांची कातडी आणि मनोवृत्ति बोथट असल्यामुळेंच, गमतीनें या फंदांत पडतात. त्यांना स्वतःला तसा कांहीं त्यांतून महत्त्वाचा लभ्यांश नसतो; पण इतर हजारों माणसांचीं मात्र ते नाहक गैरसोय करतात !...

अशा उपऱ्या,स्वार्थी लोकांची " काव काव " पाहूनच, मला त्यांच्यांत आणि कावळ्यांत साम्य दिसतें ! आणि ओघानेंच, कावळ्यांचा कठोर उपाय त्यांच्याकरितांहि योजावा असें प्रामाणिकपणें वाटतें !—

आजच मला हें सारें आठवण्याचें कारण, दुपारीं मी गिरगांवां-तून जातांना असाच एक 'शुकशुकाट' झाला; अशींच हजार माणसें त्या दिशेनें पाहूं लागलीं; नेहमींप्रमाणेंच, मीहि त्या हजारांतला एक होतों; पण नेहमींप्रमाणें त्या ९९९ त मात्र माझा समावेश झालेला नव्हता; मी हजारावा मनुष्य होतों!

" शुकशुक " करणारी ती स्वारी एकदांची सांपडली. ती मलाच खुणावून बोलावत होती—चेहरा अगदींच नेहमींचा नव्हता! तरी ओळ-खीचाच दिसला;... पण कोण तें नक्की समजेना.

इतक्या ठिकाणीं राहिलेला व इतक्या गांवीं भटकलेला मनुष्य मी ! मग नेहमीच्या माहितींत नसलेल्या या व्यक्तीला मी तरी कां ओळखावें ?

खरंच, पण अशा वेळीं नेहमींच मोठा प्रश्न पडतो !

आपण त्या व्यक्तीला ओळखलेलें नाहीं असें दाखवून त्याला उगीच दुखवण्याची आपली इच्छा नसते; वास्तविक, असा चमत्कारिक प्रसंग कोणावरच ओढूं नये, म्हणून आपल्या रस्त्यानें निमूट जाण्याची खबरदारी, त्यानेंहि आपल्याप्रमाणें प्रथमच घ्यावयास पाहिजे असते ! पण तसें झालें नाहीं—त्या उपद्यापी प्राण्याला हांक मारण्याची दुर्बुद्धि झाली–तर मग मात्र आपल्या मनाची तारांबळ फारच केंविल्वाणी होते.

प्रथम आपण त्याचें नांव लक्षांत आणूं पाहतों; तें जमलें नाहीं म्हणजे आपल्या ओळखीच्या इतर माणसांशीं त्याचा बादरायण कां होईना, संबंध लावूं पाहतों. आणि तेंहि जमलें नाहीं म्हणजे मात्र क्षणभर आपण जास्तच घोंटाळतों !

याची आपली केव्हांतरी–दोन काटक्यांप्रमाणें–पूर्वीं एकदां जगांत गांठ पडली होती याची तर आपल्याला पूर्ण खात्री असते !–पण कोठें ?... आणि कधीं ? गोंधळून आपण आपल्या आयुष्यांतील विविध वातावरणां-तील कोणत्या तरी एकामध्यें त्याला गोंवण्याचा अटोकाट प्रयत्न करतों-!



तेंहि शेवटीं हुकतें न हुकतें आहे तोंच स्वारी हंसत हंसत प्रत्यक्षच आपल्या समोर ठाकलेली असते ! !

आपल्या सर्वांगाला—नाहीं तरी सर्व मनाला—कांपरें सुटतें त्यावेळीं ! आणि मग ? आपण कृत्रिम हंसून म्हणतो, " कसं काय ? ठीक ?? केव्हां आलां ??? "

पण हा प्रकार फारच धोक्याचा असतो पहा !—कारण तो त्या गांवांतलाच असला तर त्याच्या कुठूनहि येण्याचा प्रश्न नसतो. जो जिवंत समोर फिरत असतो तो जगांत एकदां खात्रीनें आलेलाच असतो ! आणि त्याच वेळीं नसला तर त्यानंतर केव्हांतरी तो या गांवींहि आलेला असतोच !

किंवा तसा मूर्खपणा अगर त्याचा राग पदरीं घेण्याऐवजीं, आधींच सावधगिरीनें, आपण त्याला अगदीं सरळ, खूऽप व्यापक व मोघम प्रश्न विचारतों, " काय, दोस्त ? ठीक ? कशी काय मंडळी ? "

मात्र अशा वेळीं आपलें मन, आपली दृष्टी, सारें कांहीं जागरूक व चिकित्सक ठेवावें लागतें. 'ता वरून ताकभात' जाणण्याची आपल्याला अगदीं परमावधी करावी लागते; आपल्या माहितीच्या प्रत्येक गांवांतील दोनचार व्यक्ति तरी अशावेळीं आपल्या आठवणींत असणें अपरिहार्य असतें; त्यांतील कोणत्या व्यक्तींचा याच्या बोलण्यांत संबंध येतो, यावर पुढील अनुमानें व साऱ्या इमारती अवलंबून असतात ! कारण एकदां अशी 'हायूपॉथेसिस' ठरली कीं मग पुढली प्रमेयें मांडावयास फार सुलभ जातें !

पण त्याहिपेक्षां चमत्कारिक परिस्थिती उत्पन्न होते, ती एकदम रोकठोक प्रश्न विचारणारे लोक पुढें आल्यावर !—अर्थात् त्यांचाच बेडरपणा आपल्याला भोंवतो ! ते जरा अहंगंड असतात आणि म्हणून आपल्याला रोकठोकच सवाल टाकतात " काय ओळखलं ? "

(आतां ओळखणार काय ? त्याचें कपाळ ?? तिथं लेबलहि नसतं !)

मग मात्र आपल्याला स्पष्टपणें कबूल करावं लागत, " नाहीं; कोण आपण ? "

तो वेडर नसून चुकलेला असला तर त्याचा चेहरा लगेच भांबा-वतो व मग तो चांचरत म्हणतो " हूँ! मला वाटलं आमचे ते अं... दामले ! प्लीज एक्स्क्यूज ! "

अशा वेळीं त्यानंतर लगबगीनें तो दूर जात असतांना मात्र आपण आपल्याशींच हंसतो. त्यांत दोन अर्थ असतात ! एक आपल्यावरचें एक भयंकर गंडांतर टळलें; आणि तेंसुद्धां पुन्हां त्याच्याच चुकीमुळें, अगदीं परस्पर टळलें.

पण आजचा हा माझ्यासाठीं रस्त्यांत शुकशुकाट करणारा प्राणी त्या कोणत्याच प्रकारांतला नव्हता.

त्याच्या त्यानंतरच्या रोकठोक सवालाला मी उत्तर दिलें-( कारण मला दुसरें गत्यंतरच नव्हतें )—" नाहीं ! आपल्याला नाहीं ओळ-खलं मी. "

त्यानें माझ्याकडे पुन्हां जोरानें डोळे रोखून प्रश्नाच्या सुरवातीलाच जोर देऊन विचारलें, " मलाऽऽओळखलें नाहीं ? "

मी पुन्हां शक्य तितक्या विनयाच्या आवाजांत घुटमळत आर्ज-वानें त्याला म्हणालों, "नाऽऽहींऽ ! आपलं नांव ?...?..."

त्यांवर तो मला पुढें जास्त बोलूं न देतां अगदीं तीव्र दृष्टीनें माझ्याकडे पहात म्हणाला " बस्स, आतां जास्त नको ! नाहींच ओळ खायचेत तुम्हीं मला ! "

आणि मी त्याचें कांहीं सांत्वन करणार त्यापूर्वीच अगदीं रागानें पाय आपटीत त्यानें तोंड फिरवलें व फिरतां फिरतां, फिरून माझ्याकडे एक तिरस्काराचा दृष्टीक्षेप टाकून तो भरभर चालत निघूनहि गेला.

तो गेल्यावर प्रथम क्षणभर मला तर अगदीं वेड लागल्यासारखें झालें ! त्यांत मी चुकलों होतों कीं तो ? मला कांहींच समजेना; त्याच्या भावना मात्र मी दुखावल्या होत्या एवढं खरं; पण त्याला माझा इलाज होता काय ?

तरी थोडें पुढें चालून गेल्यावर मग मला वाटलें, " त्याचीच ती



चूक ! प्रश्न कोणाला आणि कसा विचारावा ही एक जगांतील फार मोठी कला आहे ! "

नाहींतर हा असा कल्पना नसतांना घोंटाळा ठरलेला !

नाहीं ती बातमी उगीच कोणाला तरी सांगणारे जसे लोक अस-तात तसेच अगदीं नकोत ते प्रश्न वाटेल त्याला विचारणारे लोकही जगांत फार असतात.

म्हणूनच मला वाटतें, प्रश्न विचारण्याचें हें शास्त्र खरोखर फार गहन आहे. ते सान्यांनाच साधत नाहीं. त्यामुळें पुष्कळ वेळां ते स्वतः दुःखी होतात ते होतातच, आणि अनेकदां दुसऱ्यांनाहि दुःखी करतात !

जातां जातां माझ्या अनुभवाच्या चार गोष्टी येथें सांगणें मला जरूर वाटतें—" हल्लीं काय करतां ? " " या बरोबरच्या कोण ? " "मुलें बाळें, सध्यां किती आहेत ? " " तुमच्या वडिलांची प्रकृती कशी आहे ? " " सध्यां आपणाला पगार किती ? " "आपण राहतां कुठें ?" " या जागेचं भाडं किती ? " " माझं पुस्तक वाचलंत कां ? " " तुमचं हें घड्याळ किती रुपयांचं आहे ? " " आपण हल्लीं जरा रोडावलेले दिसतां; कां हो ?" " गेल्या वर्षी खटपट चालली होती ते तुमच्या बहि-णीचें लग्न झालं कां ?"—असले प्रश्न कोणी कोणाला कधींहि विचारूं नयेत !—

कारण, असलेले संबंध एका क्षणांत तुटण्याची त्यांत फार भीति असते !

कारण पहा—' खाणें पिणें झोंपणें, ' यापलीकडे कांहीं कर-ण्याची त्यांची सध्यांची परिस्थितीच नसली तर नेहमीच्या ' चालू ' नात्यांच्या ठोकताळ्यांत त्या ' बरोबरच्यां'चा कांहीं संबंध लावण्यासारखा नसलाच तर? लोकांच्या मुलांबाळांचीं आपल्याला तरी कां उगीच चिंता? त्यांच्या वडिलांची प्रकृती कशी आहे हें त्यांच्या वडिलांच्याच असण्या-नसण्यावर अवलंबून नसतं कां ? सध्यांच्या काळांत पगार सांगण्या-सारखा असतोच कां पण ? तुम्ही घरीं येऊं नये अशी त्यांची इच्छा

असली तरीहि त्यांनीं आपल्या खुराड्याचा तपशील तुम्हाला कां सांगावा? तुमचं पुस्तक सर्वांनीं गीतेसारखं वाचावें असे तुम्हीं तरी कोण मोठे! घड्याळाचे मेक,-जाती-अनेक असल्यामुळें रुपया दोन रुपयांपासूनहि घड्याळें मिळतात हा साधा अनुभव नाहीं कां? समोरचे गृहस्थ आपण प्रत्यक्ष पाहाण्यापूर्वी अधिक रोडावलेले असले तर?...तसेंच शेवटच्या प्रश्नाचें!—हल्लींच्या काळांत लग्नें होण्यापेक्षां मोडतातच जास्त! आणि झालें असतें त्याच्या बहिणीचें लग्न तर पत्रिका आलीच असती कीं! यदाकदाचित् तो चुकला असला तर त्याचा फिरून उच्चार करण्याचें तरी आपल्याला काय कारण?

तेव्हां असल्या प्रश्नांच्या लॉटऱ्या कोणी स्वप्नांतसुद्धां लावूं नयेत!—मी तरी तसं करीत नाहीं बुवा!!

तीच गोष्ट प्रश्न विचारतेवेळच्या दृष्टीची! ती कशी अगदीं व्यापक असावी. एखादा कॉलेज स्टुडंट भेटला तर त्याला सरळ प्रश्न विचारावा "यंदा सिनियरला आहांत वाटतं?"–त्याला जरूर वाटली तर तोच आपल्या टप्प्या टप्प्याच्या प्रश्नांनीं खालीं येत शेवटीं प्रिव्हियसमध्यें असल्याचें जाहीर करतों; आणि आपल्या पदरीं कसलंच पाप येत नाहीं!—

हा एक नमुना प्रश्न लक्षांत ठेवलांत म्हणजे तुम्हाला पुढें आलेल्या कोणत्याहि परिस्थितींत खालीलप्रमाणें असेच योग्य, व्यापक व सूचक प्रश्न (मनांत पूर्ण संशय ठेवूनहि) विचारतां येतील– "आपण एम्. ए. कोणत्या सालीं पास झालांत?" "अस्सं अस्सं! तुम्ही त्या शाळेंत हेडमास्तर आहांत वाटतं?" "हा सिक्स व्हॉल्व्ह फिलीप कां हो?" "म्हणजे रोज बसनें जातां वाटतं ऑफिसला?" "आपल्या पत्नी ग्रॅज्युएट असतील?"

कोणाची कोणाशी ओळख करून देतांनाहि अशीच खबरदारी घ्यावी लागते! "हे चांद्याला सब-पोस्ट-मास्तर आहेत" "यांची बायको चांगली गाते!" "यांचं गेल्यावर्षी लग्न झालं आहे आणि आतां



यांना एक मुलगाहि झालेला आहे!" "ज्यांच्याकडून परवां तुम्हीं सूट-केस विकत घेतलीत, त्यांचें हे चुलत चुलत बंधू!" वगैरे प्रकारें कोणाचीच माहिती सांगू नये!–त्यापेक्षां 'हे माझे भाऊ' 'हे माझे स्नेही! असला अगदीं प्रत्यक्ष संबंध दर्शवून ओळख करून देण्याची जरूरी सिद्ध करावी.

पुन्हां अगदीं जरूर तरच त्यांची खुद्द ओळख करून द्यावी; पण मग अशा वेळीं नेहमीं अतिशयोक्ति वापरावी. ते नुसते क्लार्क असले तर ते 'जी. पी. ओ.' तील ऑडिट डिपार्टमेन्टमध्यें हेडक्लार्क आहेत असे सांगावें. कॉलेजांत नुसते डेमॉन्स्ट्रेटर असले तर "हे माझे स्नेही प्रोफेसर राजबिंडे!" असे म्हणावें. एखाद्याचा इन्शुअरन्स एजन्सी घेण्याचा नुसता विचार असला तरी "हे 'सेन्ट परसेंन्ट इन्शुअरन्स कंपनी'चे कर्नाटकमधील सोल एजंट अमुक अमुक." असं बेधडक सांगावं!!..

थोडक्यांत, असलें खोटें बोलणें किंवा अतिशयोक्ति करणें अंतीं अतिशय पुण्यप्रद असतें. खोल विचार केला तर त्यांत कोणाचेंच नुकसान होत नसतें. आणि कोणावरहि चमत्कारिक स्थितींत पडण्याची पाळी येत नाहीं!

समाजांत वावरावयाचं तर नेहमीं ही प्रश्नोत्तराची कला प्रथम अवगत करावी. लढाईतील तरवारीच्या वाराइतकीच ती संरक्षक अगर चढाऊ पद्धतीनें आजच्या काळांत वापरतां येते!—

एक मात्र–आपले विचार, आपलें सर्व मनोगत, कोणत्या तरी भाषेंतच–आपल्याला चांगल्या येणाऱ्या भाषेंत–व्यक्त करावेत. सुरवातीप्रमाणें 'शुकशुकाट' सहसा करूं नये!–थिएटरमध्यें बसल्याप्रमाणें रस्त्यांत टाळ्या तर कधींच वाजवूं नयेत. कारण रस्त्यांतून निष्पापपणें रंगून जाणाऱ्या हजारों लोकांच्या मनांतील रंगभूमीवर त्यांचा भयंकर प्रतिध्वनि होतोः आणि त्यामुळें मोठा हलकल्लोळ माजण्याचा फार संभव असतो!!

चिमूट चौथी

एक आकाश-नाटिका

# "ही तरी पसंत ?"

[ रस्त्याची गजबज, ट्रमचा आवाज, मोटरचा भोंगा; रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांचे आवाज; वरील आवाज मोठा होतो; लांबून मागल्या हॉटेलांतील ' संगीत ' ललकारी-" दोन इसम सहा आणे. " पैसे टाकल्याचा आवाज. सूक्ष्म कुजबुज; पायऱ्या उतरल्याचा आवाज, पत्रविक्या पोऱ्याचे " संध्याकाळ " ' ईव्हिनींग फायनल ' वगैरे आवाज. " वेण्या ! " " दत्ताला हार घ्या " असले इतर कांहीं आवाज. ]

**एक आवाजः**—काय संपादक, आतां कुठच्या बाजूला जायचं ? कसली ॲपॉइंटमेंट तर नाहीं ना ?

**संपादकः**—छे, छे, चला कीं,...असेच जाऊं;.. करेलवाडीवरून चौपाटीवर !–बसूं थोडा वेळ गप्पा मारीत...

**प. आवाजः**—( खांद्यावर थाप मारून ) हो,...नाहींतर तुम्हां साहित्यकांची एक ना दोन सतरा लफडीं असायचीं—

**संपादकः**—( किंचित् हसून ) हो हो ! लफडीं तर ? वाऽरे !—मन्या, कां लेका आम्हां मराठी दरिद्री लेखकांची अशी टिंगल करतोस ?



आमची नी एखाद्या मृदुंगाची स्थिती सारखीच ! कोणीही नि कसंही बडवावं त्याला...

**मन्याः**—ते रे कां संपादक ? तुम्ही तर समाजाचे पुढारी !—तुमच्या हातांत म्हणजे लॅकोऽ सगळ्या समाजाचीच शेंडी असते कीं !

**संपादकः**—हो हो तर !– निदान लेखकाची तरी असतेच!– असंच तुम्हाला वाटत असेल...नाहीं कां ?

**मन्याः**—मग काय खोटं की काय तें ? त्यांचे लेख छापायचे, नी त्यांचीं तोंडें काळीं करावयाचीं ( हसतात; कांही वेळ दोघे चालत जातात. )

**मन्याः**—( सौम्य हंसत ) पण कांहीं म्हण संपादक ! तुम्ही लोक मोठ्या फुशारक्या नि एवढ्या उच्च वाङ्मयसेवेच्या गप्पा मारतां ! पदरमोड करायला पहातां ! पण कायरे, तुमचा फोटो कधीं छापलेला नाहीं दिसत !–मघाचा तो ' निर्भीड'च्या अंकांतला फोटो पाहिलास का त्या लेखकाचा, आर्टपेपरवर छापलेला ?

**संपादकः**— कुठला म्हणतोस तूं ?—

**मन्याः**—वाः ! बोटाची घडी गालावर ठेउन नी हातांत तें फाऊंटनपेन घेऊन आकाशाकडे पहात बसलेला तो कवी—- ' मीनाक्ष ' नाहीं का नांव त्याचं ?–कसा पण झोकांत होता फोटो ?

( मन्या व संपादक हंसतात; संपादकांच्या हास्याचा आवाज मोठा येतो. )

**मन्याः**—कां ? खवचटपणें हसायला काय झालं ? आपला कधीं पाहिला होतात फोटो तुम्ही ? खरंच पण, काय रे संपादक ? खरंच का फर्डा लेखक आहे तो एवढा ?—काय करतो तरी काय ? कविता पाडतो, नाटक रंगवतो,... सांच्यांत घालून कादंबऱ्यांचीं जाळीं विणतो,....कीं—

**संपादकः**—पण करायच्या आहेत काय तुम्हांला या चांभार चवकशा ?– तुम्ही लेखकहि नाहीं नी संपादकहि नाहीं—

**मन्याः**—पण वाचक तर आहोंत ना आम्ही ?—

**संपादकः**—( हंसून ) हो हो !–संशयच आहे मला—नि असलांतच वाचक, तर फुकटे !–बहुतेक माझ्याच मासिकाचे तेवढे...

**मन्याः**—वा राव, हा शालजोडींतला वाटतं ! चला ! एकदम बंद करा तुमचं भिकार मासिक पुढल्या महिन्यापासून, आमच्याकडे फुकट पाठवायंच !—( दोघेही हंसतात )

**मन्याः**—( कुतूहलानें ) ते असो रे संपादक ! पण खरंच विचारतों, मला मोठं कुतूहल वाटतंय् — त्या मघांच्या फोटोचं !—कोण आहे तरी कोण तो ?—बडा लेखक आहे का ?—तुमच्या साहित्याच्या प्रांतात तसा फारसा शिरकाव नाहीं आमचा, म्हणून विचारतों !

**संपादकः**— ( खेळकरपणें ) मसालेवाले, पेंटर, टाइपरायटर–चुकलं नाहीं का ? टायपिस्ट– असल्या फोटोसह जाहीराती नाहीं का पाहिल्यास वर्तमानपत्रांत तूं ? नेहमीं येतात—

**मन्याः** — ( गोंधळून ) बरं मग, त्याचं काय ?—

**संपादकः**— ( किंचित् हंसून ) त्याचं काय, काय ? अरे, त्यांतलाच हाहि एक फोटो ‘ मीनाक्ष’चा !

**मन्याः**— ( किंचित हंसून ) ते जाऊं द्या हो. पण तो आहे कोण तें तर सांगाल, राव...

**संपादकः**— तो प्राणी एक कवि आहे—

**मन्याः**—तें समजलं !- पण तुमची त्याची ओळख ?—

**संपादक** — पुष्कळ !– दोनदां आमच्या कचेरींत पुडकीं घेऊन आले होते राजश्री...

**मन्याः**— कसलीं कवितांचीं ?—

**संपादकः**— हे हं— नाहीं तर कसलीं आणणार, रद्दीचीं ?—

**मन्याः**—आतां आम्हाला काय माहीत रे तुमच्या साहित्यिकांच्या भानगडी ??–बरं मग ? पुढं काय झालं ??—

**संपादकः**— अरे, मासिकाच्या कचेरींत कवि आल्यावर मग काय



व्हायचं असतं आणखी ?– पण तुम्हीं तर बोवा फारच खोदकाम सुरूं केलं आहे आज, मन्याबापू.!—

**मन्याः**—मग तुमचं काय बिघडलं त्यांत ?—सांगा ना सारी गंमत आम्हांला !—

**संपाः** —(हंसून) छे छे ! नको ! तो एक मोठा ब्रह्मघोटाळा आहे, भय्या ! असं रस्त्यांतून जातां जातां नको उगीच—वेड्या, भोंवती उघडे कान फिरत असतात—फट् म्हणतां ब्रह्महत्त्या–व्हायची उगीच एखाद्या वेळीं !– आणि मग रस्त्यांत व्हायचा नाहीं तो ब्रह्मघोंटाळा—

**मन्याः**—(किंचित् हंसून) अरे छोड देव यार ! तुम्ही पण उगीचच आव आणतांहां नाहीं तो !—लेकोऽ जन्म जातो तुमचा टवाळ्यांत !—मला तर एकएकदां वाटतं, तुम्हां लोकांची दृष्टींच बिघडली आहे जगाकडे पहाण्याची—ते बघा, समोरच लोंबकळतांना दिसताहेत त्या आर. एन्. शिंद्यांचे हिरवेनिळे डोळे !—शिरा आंत नि चष्मा बदला तुमचा प्रथम—

**संपादकः**—हं राव !...जाहिरातीचे एजंट आहांत कीं काय तुम्ही ?...

(दोघेही हसतात)

**मन्यांः**—पण असा विषय डावलूं नका ! काय तें सरळ सांगा आम्हांला !– हं !—उगीच रस्त्याचा बाऊ कशाला करतां !—सांगा ती गंमत !—रडकथा-तर रडकथा—चालेल आम्हाला !

**संपादकः**— बरं बुवा !—

**मन्याः**—पण ब्रह्मघोंटाळा कसा म्हणता त्या ‘मीनाक्ष’ कवीचा ?

**संपादकः**—अहो, त्या दिवशीं तो दुसऱ्यांदा आला बाड घेऊन नी म्हणाला—‘ हा माझा फोटो, हा मी–नी या माझ्या कविता !–आपल्याला पुन्हां कांहीं नव्या कविता दाखवायला आलों आहे—’

**मन्याः**—भले !–मग ? तुम्ही काय केलंत ?—

**संपादकः** – अरे करणार काय ? जीव मुठींत धरून संपादकीय

मोडक्या खुर्चीत बसलों त्याच्यासमोर ! तो एकामागून एक काढत होता कविता —

**मन्याः**—( आश्चर्यानें ) नी तुम्ही त्या ऐकत होतां निमूटपणें ?—बऱ्या बुवा तुम्हाला कविता आवडतात...

**संपादकः**—छे, छे ! अहो, मी काय ऐकतोय् ?–तो घसा साफ करतांच, मी म्हणालों 'माफ करा, मी कवितेंच रसग्रहण मनांतल्या मनांत वाचूनच करतों ! ' तेव्हां कुठं टळलं तें गंडांतर—

**मन्याः**—सुटलांत !—बरं मग पुढं ?

**संपादकः**—बाडांतून एकामागून एक कविता बाहेर पडून माझ्या हातांत येत होत्या–मी त्या चाळत होतों—

**मन्याः**—पण मग यांत ब्रह्मघोंटाळा कुठं आला ?—

**संपादकः**—(किंचित् हंसून) अहो, त्या कविता म्हणजेच ब्रह्मघोंटाळा होता–काय नव्हतं त्यांत ?-कृष्ण-राधा-मुरली-तो-ती-तें-सत्-चित्-आनंद-! बस्स ! ठार झालों मी–जीवाचा गोळा झाला माझ्या ! नी मग मी स्वतःच जीवानिशी ब्रह्मांडांत विलीन झालों...

**मन्याः**—(हंसून) हं हं,.. हाच होय तुमचा ब्रह्मघोंटाळा ?—

( संपादक किंचित् हंसतात )

**मन्याः**—मग शेवटीं सौदा पटला कीं नाहीं तुमचा ?—त्याचा फोटो—त्याची कविता...

**संपादकः**—अहो थांबा—तेंच सांगतोंय् !—तो असा माझ्यासमोर बसला होता—त्याच्या डाव्या बाजूचीं सगळीं बाडं माझ्या हातांतून त्याच्या उजव्या बाजूला जाऊन पडलीं होतीं ! हा असा ढीग झाला होता त्यांच्या छातीपर्यंत...

**मन्याः**—(मध्येंच) हं, महाशय ! संभाळा—हातानें नका सांगू—आत्तांऽमाझ्या डोळ्यांत गेलं असतं बोट....

**संपादकः**—थांबा होऽ ! गमतीची गोष्ट तर पुढेंच आहे.



**मन्याः**—( हंसून )—बरं बरं सांगा–पुढं काय झालं ?

**संपादकः**—पुढं काय होणार ? सारं बाड संपल्यावर किंचित् कावरा बावरा चेहरा करून त्यानं आपल्या आंतल्या खिशांत हात घातला–

**मन्याः**—पिस्तुल बिस्तुल काढलन् कीं काय रागानें ?—

**संपादकः**—छे हो, एक चिठोरं बाहेर काढलंन्; त्यावरही तसल्याच बायकी हस्ताक्षराची एक कविता होती ! तिचं नांव होतं 'ब्रम्हघोटाळा'...मुक्तछंद होता...एक एक शब्दाची एक ओळ होती; मात्र खालीं 'मीनाक्ष' या शब्दांत एक काना व एक वेलांटी यांचीं पेन्सीलीनें भर घालून त्यानें तिथं ' मीनाक्षी ' तयार केली होती एक !

**मन्याः**—हँऽ ! मजाच आहे कीं !

**संपादकः**—हो ना ! सांगतों काय तर ? म्हणाला, " सकाळीं आंघोळ करतां करतां कल्पना सुचली ! जेवतांना गुणगुणली, दीड दोन तासां पूर्वीच संपविली नी हा येथें आलों थेट तुमच्याकडे ! "—

**मन्याः**—हा तिचा इतिहास नी परिचय वाटतं ? तो विसरला की काय त्या पेन्सिलीच्या खुणा ? नी ती ' मीनाक्षी ' ? ?

**संपादकः**—हं–मला ती समोर दिसतच होती !–तत्काळ तिच्या मागला ब्रम्हघोंटाळाहि स्पष्ट झाला होता !....आणि त्याचवेळीं त्यानें एकदम मला रोकठोक प्रश्न केला—' पहा बरं !....ही तरी पसंत आहे का—तुम्हाला ? लागलीच सांगा हं ! ही तरी तुम्हाला पसंत आहे का ? '–आणि—

( बोलतां बोलतां संपादक मध्येंच एकदम अडखळतात; मन्याबापूचा आवाज ऐकूं येत नाहीं–क्षणभर अगदींच शांतता–रस्त्याची गजबज जरा मोठी येते आणि मग )—

**मन्याः**—( हळूंच कुजबुजून ) अरे काय हें संपादक ? लेका–केव्यानें हातवारे करीत हातास ?—

**संपादकः**— तरी मी सांगत होतों रस्त्यानें भानगड नको ही.

( रस्त्याची गजबज )

**मन्याः**—सत्–चित–आनंद !–भले ! तुमच्या ‘ मीनाक्षी’ कवीचा ब्रम्ह-घोटाळा सांगतांना वर्णनाच्या ऐन रंगांत आलांत–नी प्रत्यक्ष ब्रह्मघोटाळाच तयार केलांत की भर गिरगांवांत—

**संपादकः**— ( घाबरल्या आवजांत ) पण पाहिलं कायेर तिनं ?–अगदीं मी हात पुढें करायला नी ती समोर यायला एक गांठ पडली !

**मन्याः**— हो ना !.... नि माझ्याकडे पाहून तूं तर तोंडानें म्हणत होतास, ‘ लागलीच सांगा... ही तरी तुम्हाला पसंत आहे कां ? ’

**संपादकः**— च च च !– काय गोंधळ रे हा ?... ऐकूं गेलं असेल नाहीं त्यांना ?....

**मन्याः**— चांगला मोठ्यानें बोंबलत होतास कीं.... तें जोडपं जवळनच जात होतं तेव्हां...

**संपादयः**—( घाबरून ) मग आतां रे, मन्या ?–तीं काय करताहेत बघ जरा मागें वळून...

**मन्याः**— ती शेपटेवाली गोल पातळाची तरुणी थांबली आहे नी आपल्या प्रियकराशीं कसल्या गुजगोष्टी करीत आहे, मागें बोटं दाखवून ! ( किंचित शांतता.... ) संपादक, आतां हळूंहळूं पावलें उचला पुढं !...मागें अगदीं नका बघूं.......हें बघा, समर्थ वॉचच्या घड्याळांत साडेसात तर होऊन गेले आहेत... ब्लॅक आउटच्या काळोखांत नाहीं येणार त्यांच्या लक्ष्यांत !...कदाचित् तसंच भानगड न होतां पुढं सटकतां येईल....

( गपचूप थोडें चालल्याचा आवाज... )

**संपादकः**— ( कुजबुजून ) अरे मन्या, अजून तीं दोघे थांबलीच आहेत ! नि दोघेंहि आतां तोंडें फिरवून आपल्याच बाजूला पाहात आहेत, मांगलवाडीच्या ट्रॅम नाक्याजवळून...

**मन्याः**— ( अजीजीनें ) माझे आईऽ ! आतां गपचूप पुढें चाला पाहूं तुम्ही !–मागें कशाला पुन्हां पुन्हां वळून पहातां आहां...

**संपादकः**—( चालतां चालतां ) पण काय लेकाची नाहीं ती ब्याद



उपस्थित झाली रे ?...आपल्याला आतां मवालीच समजणार तीं दोघें !... भर गिरगांवांत मारामारीचाच प्रसंग आहे हा म्हणायचा !

**मन्याः**—( चालतां चालतां ) हो...नि मग माझ्या मघाचा इच्छे-प्रमाणें माझ्यासकट तुमचा फोटोहि उद्यां छापून यायचा मोका आहे हा...

**संपादकः**––बरं बरं...पुरें झालं तुझं शहाणपण !...तुला सुचतोय् चावटपणा ! गपचूप झप झप पाय उचल आपला !––

**मन्याः**––चला की ! माझं कुठं काय म्हणणं आहे ?—

( तेवढ्यांतच मागून आवाज....“ शुक् शुक् ”––पुन्हा दोनदां “शुक् शुक् ” )

**संपादकः**—( दचकून )...बापरे...मन्याऽ भरली किरे कंभक्ति !—

**मन्याः**––कायहो, संपादक ?...तीं दोघें तर उभीं राहून आपल्यालाच हातानें जवळ येण्यास खुणावत आहेत कीं...

**संपादकः**—( निश्वास टाकून ) झालं !...कांहीं कारण नसतांना जुंपणार आतां !–वास्तविक हा आहे, नुसता समजुतीचा घोटाळा !.... आतां रे मन्या ?...

**मन्याः**––आतां काय ?...गपचूप अबाउट टर्न !...काय व्हायचं असेल तें होईल !...ती त्याची स्फूर्तिदेवता त्याला सांगणार ना !...नि अर्थात-तच तो जवानमर्द हिम्मतबहाद्दर नि सारे बघे लोक बायकांवरच विश्वास ठेवणार ! अगदीं मारामारी करणार आपल्याशीं ?...‘मीनाक्ष’चा इतिहास सांगणार थोडाच आपण त्यानां ?

**संपादकः**—( आंबट शब्दांत ) वाईट वाटतंय् तें इतकंच...कीं कांही कारण नसताना...नुसत्या गैरसमजानें शोभा होणार आहे चार मंडळींत आतां आपली...

**मन्याः**—( संतापी आवाजांत ) तें कांहीं नाहीं, संपादक ! चला तुम्ही !... अगदीं सरळ त्यांच्यासमोर जाऊन उभे राहूं या ! अहो, तो काय काडीपहिलवान् करणार आहे आपलं !...आम्हीही कांही मवाली

नव्हत !...आम्हालाहि घरीं आयाबहिणी आहेत....आम्हालाहि सभ्य-पणा कशाशी खातात तें समजतं !...

( पुन्हा थोड्या जवळून--' शुक् शुक् ' आवाज; मोठ्यामोठ्यानें टाळ्या ! )

**संपादकः**--चल मन्या, आतां तर गत्यंतरच नाहीं !—तो पुन्हां आपल्याला खुणावीत आहे नि हांकाहि मारीत आहे !—

**मन्याः**--आपल्या बाजूनेंच चालत येताहेत तीं...चलाच तुम्ही संपादक !...मी घेतों पाहून...( दोघेही चालतात )

**संपादकः**--ती आपल्याला नि आपण त्यांना जणुं सामोरेच जाताहोंत ! जणूं काय समोरासमोर बंदुकी रोखून पूर्वीचं इतिहासकाळांतलं द्वंद्वच सुरूं झालं आहे हें, मन्या !—

(रस्त्याची सूक्ष्म गजबज; दोघेही दोन्ही बाजूनें येत असल्याचा पावलांचा आवाज; मन्या व संपादक यांचे दीर्घ निश्वास. )

**संपादकः**— ( संकोची आवाजांत कुजबुजून ) काय बोलणार तूं त्यांच्या बरोबर, मन्या ?...नि कसं समर्थन करणार आहेस आपलं !—

**मन्याः**— तें त्याच्या रुबाबावर अवलंबून आहे !- त्याच्या प्रश्नांना अगदीं ठोशास ठोसा अशीं उत्तरं देणार मी !-तो नरम तर मी नरम; त्याची हुशारी दिसली तर मीहि सुनावणार त्याला !-मी होतों पुढें, तुम्ही रहा थोडे मागें...बरं का संपादक ?

(जवळ येणाऱ्या जोडप्याची कुजबूज; दोघेंहि समोर येतात)

**नवा आवाजः**— कां हो, आपल्या तंद्रीत चालला होता अगदीं !—

**मन्याः**—( खोंचकपणें ) मग काय बिघडलं त्यांत !—

**नवा आवाजः**—तसं नव्हे ! इतक्या हाकां मारल्या...शुक् शुक् केलं...कसल्या गप्पा चालल्या होत्या तुमच्या....अं ऽ ?—

**मन्याः**— (डिंवचून) तुमच्या कसल्या चालल्या होत्या गप्पा ?...अं ऽ?

**नवा आवाजः**— आमच्या ? तुमच्या बद्दलच्याच ! !- नाही ग ?...

( त्याचें हास्य...मागूनहि मंजुळ हास्य )



**मन्याः**—मग हें पहा !— आमच्यहि तुमच्याबद्दलच्याच चालल्या होत्या गप्पा !– पुढं काय म्हणणं आहे !...

**आवाजः**— ( आश्चर्यानें ) पुढं काय म्हणणं असणार ?...ते तुमच्या बरोबरचे कुठं आहेत ?- त्यांच्याशी मला बोलायचंय्......

**मन्याः**—हे पहा...काय बोलायचं असेल ते माझ्याशीं बोला प्रथम !... नि अगदीं सरळ बोला...आडून आडून बोलण्याचं कारण नाही !— आम्हीं कांहीं चोर नव्हत कीं मवालीहि नव्हत...

**आवाजः**--( आश्चर्यानें ) अहो !...अहो...पण असं रागारागानें काय बोलतां हां ??...कांहींतरी गोंधळ झालेला दिसतोय् तुमचा ?—

**मन्याः**--( दमांत घेत ) मग ? आम्हाला हांक मारून बोलावलंत कां तें सांगा सरळ !...असे आडून आडून टोमणे कशाला मारताहां !-

**आवाजः**--( गोंधळून, ) टोमणे ?—म्हणजे मला नाही समजलं !— तुमच्या बरोबर ते भालचंद्रपंतच आहेत ना !...त्यांना भेटावं म्हणून तर मी हांक मारली !--पण तुम्हीच पुढें होऊन त्यांची भेट करून देत नाही माझ्याशीं !...नी पुन्हा रागावताहां उगीच माझ्यावर—काय आहे काय हा गोंधळ नी घोटाळा ?...

**मन्याः**--म्हणजे तुमची नी आमच्या संपादकांची ओळख आहे ??...

**आवाजः**--वाः ! म्हणजे काय ?--काहो संपादक ? असे मागें मागें कां उभे तुम्ही ?—माझी ओळख विसरलांत कीं काय ?—

**संपादकः**--( पुढें होऊन ) अंऽ ?--कोण ?—ओ होऽ !...बाबुराव बोरवाडकर ?...वाः, तुम्ही हा क्लीन शेव्ह केव्हां केला ? नी गोंव्याहून केव्हां आलां ?...पत्र नाहीं कांहीं नाही !—

**बाबुरावः**—( हसून ) आजच सकाळच्या बोटीनें !--एकाएकीच ठरवलं नी हिला घेऊन आलों !-नाताळ आहे ना, म्हणून !-लग्नाला आलां नाहींतच आमच्या, तेव्हां मुद्दाम उद्यां सकाळीं तुमच्याकडे येणार होतों हिला घेऊन!...आणि त्याबद्दलच बोलत होतो आम्ही ! तोंच समोर तुम्ही स्वतः...

**संपादकः**—( हंसून )...भले !...योगायोगच हा !

**बाबुरावः**——हो, तर काय ?...कारण तुमच्या इथल्या या ब्लॅकआउट-मध्यें मी कांहीं तुम्हाला ओळखलं नसतं;...पण हीच थोडं पुढें आल्यावर म्हणाली...‘ते पहा तुमचे मित्र चालले आहेत !’...म्हणून हांका मारल्या मी !...तों तुम्ही मारे आपल्याच रंगांत...ओ देत नाही की मागें वळून पहात नाहीं...

**संपादकः**——छान् छान् ! म्हणजे पण बरीच स्मरणशक्ति दिसतेय तुमच्या मिसेसची !...कारण तुमच्या लग्नापूर्वी आपल्याबरोबर यांना पहायला म्हणून तुम्ही घेऊन गेलां होतां मला...त्या एका भेटीवरून यांनीं ब्लॅक आउटमध्यें सुद्धां ओळखलं अं मला ?–शाबास...

( सगळे हसतात )

**मन्याः**——अन् एक्स्क्यूज हं मिस्टर बाबुराव ! आमचा तर दुसराच एक गैरसमज झाला होता ! नी म्हणून मी जरा कठोर बोललों तुमच्याशी सुरवातीला.. काय संपादक...?–( संपादक व मन्या हसतात )

**बाबुरावः**—म्हणजे ?...असं झालं होतं काय ?—

**मन्याः**—एक लहानसा ब्रम्हघोटाळा !...नाहींरे संपादक ?...

( दोघे पुन्हां हसतात )

**संपादकः**——अहो अशी गंमत झाली, बाबुराव,...कीं...

**मन्याः**——थांबा थांबा ! संपादक महाशय !–मला एकदम एक स्फूर्ती झालीय्...सांगून च टाकतो!–हीच सारी कल्पना देऊन तुझ्या त्या ‘मीनाक्षी’ कवीला ‘तो-ती’वर कविता करायला सांग...निदान ती तरी पसंत पडेल मला वाटतं तुला !...

( सारे हसतात. रस्त्याची गजबज हळूहळू विरते. )

चिमूट पाचवी

—कथा—

# सरडा

वास्तविक, साता उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं सफल संपूर्ण करणें जरा कठीणच !–पण तसा प्रयत्न करणें निदान माणसाच्या हातचें आहे. तेव्हां म्हटलं सांगावी गोष्ट !–

तसं म्हटलं तर व्यक्तीच्या संपूर्ण नांवाचीं नुसतीं साधीं आद्याक्षरें नेहमींच त्याच्या स्वभावाची द्योतक असतात, असा माझा कांहीं अनुभव नाहीं !–

पण त्याचं नांव मात्र सदाशिव रघुनाथ डावरे असं आहे!–

आणि दिसायला उमदा, वागायला प्रेमळ अन् बोलायला मोकळा, फटकळ...म्हणून तो आम्हा सर्वांनाच प्रिय आहे-पण या त्याच्या स्वभाव-विशेषांमुळेंच तर त्याचे आचार, त्याचे विचार, त्याचीं मतें, साऱ्यांत अगदीं क्षणोक्षणीं फरक पडत आला आहे आतांपर्यंत !

त्याच्या स्वभावाला मुळीं हाडच सांपडत नाहीं....अगदीं सगळा मऊ मऊ मांसाचा गोळाच जणूं !–

तरीहि त्याच्यावर आम्हा सर्वांचं प्रेमच अधिक !...कशामुळें का होईना, त्याचा आम्हा कोणाला प्रथम राग आला तरी नंतर मात्र त्याची आम्हाला अगदीं मनापासून कींवच येते !–

अशा हेलावलेल्या मनःस्थितींत, मग तो जसें साध्या मराठींत बोलतां बोलतां, एकदम बऱ्या इंग्रजींत कांहींतरी फाड्फाड् बोलतो,... तसेंच आम्हीहि त्याला मुद्दामच सांगतों,..." यू सीऽ, सद्याऽऽ!–यू आर जस्ट् अ रेग्युलर इरेग्युलॅरिटी इन् कार्नेट ! !..."

× × × ×

भाई सदू स्वतःला एक मोठा जहाल नवमतवादी म्हणवतो !... 'सगळ्यांना अनिर्बंध स्वातंत्र्य असावं !...केवळ अंध गतानुगतिकत्व म्हणजे मानवाचा मृत्यूच होय !... ' असल्या आपल्या आवडत्या अष्टकोनी तत्वाचें जोरकस समर्थन करतांना तो हात पुढेंमागें जोरानें हलवून केशवसुतांप्रमाणें म्हणतो, .." जुनें जाउद्या मरणा लागुनि !...मोडुनि किंवा फोडुनि टाका ! !...सावध ऐका पुढल्या हांका ! !..."

पण भाई सदूच्या हृदयाची एखादी कसली मोठीशी हांक आमच्या जड कानांना ( नी अंध दृष्टीला ? ) तरी कधीं आढळली नाही !–त्याच्या त्याला तरी ह्या 'पुढल्या हांका' ऐकूं येत असतील असं आम्हाला खात्रीपूर्वक सांगतां येणार नाही !

त्यामुळेंच एकदां आम्हा सर्वांच्या मर्यादित स्फूर्तीची धांव, त्याच्या लाडक्या ' जी. बी. एस्. 'च्या धर्तीवर त्याला ' स. र. डा. ' म्हणण्याइतकी गेली !...पण गेल्या तीनचार वर्षांत त्यामुळेंच, असल्या प्रत्येक वेळीं, एरवीं कर्तव्यकठोरपणें जगाकडे पहाणाऱ्या त्या स्पष्टवक्त्या प्राण्याला, जगांत ' नाजुक भावना ' नांवाची एक चीज असल्याचें आढळलें !–तो त्यावरूनच आम्हाला अगदीं तोंडावर–' सहानुभूतिशून्य फत्तर ' म्हणूं लागला. आणि शेवटीं कांहींकांही वेळां तर रागानें त्यानें आमच्याशी महिना महिना बोलणेंहि टाकून दिलें ! !–

तेव्हां आम्ही वेळींच आमच्या कानाला खडा लावून घेतला. पुढें तर त्याच्या नांवानें तसल्या हांका मारण्याचे वर्तमानकाळांतील सारे मोकेहि आम्ही जाणून बुजून दवडले !–



पण त्यामुळें तो उलट 'राजा, चिमणी आणि दिडकी' सारखें करूं लागला...

× × × ×

कारण पहा, आर्ट स्कूलांतून तो बाहेर पडला तेव्हां आपला तो एक अगदीं उमदा पोरगा होता—पण हळूं हळूं त्याला जगाचें वारें लागलें. बघतांबघतां वर्षभरांतच, त्यानें आपल्याविषयीं भलत्याच कल्पना करून घेतल्या.

वास्तविक, आजच्या जमान्यांतील कमर्शियल आर्ट तेवढी त्याला बरी साधे; पण हळूं हळूं आपल्या आळेक्यांत येणाऱ्या साऱ्या तुरळक शिष्यांना त्यानें लँडस्केप, पॉर्ट्रेट, कॉंपोझिशन आदि सर्व प्रकारच्या अव्वल कौशल्याचे, सढळ हातानें, बेडर मनानें, व व्यापक पद्धतीनें धडे द्यावयास सुरवात केली !–आणि पुढल्या दीड वर्षाच्या आंत त्यानें आम्ही नको नको म्हणत असतां, दुसऱ्यांना आदर्श पद्धतीनें शिकविण्यासाठीं मोठ्या महत्वाकांक्षेनें स्वतःचा ' स्पार्क स्टूडियो'हि काढलान् !–

त्यानें अशी सर्व तयारी करून 'स्पार्क स्टूडिओ 'च्या रूपानें आपल्या महत्वाकांक्षांच्या ठिणग्या टाकायला सुरवात केली होती; परंतु त्याच्या धंद्याची ज्योत कांही अजून नीट तेवत नव्हती !...

तेव्हां त्यानें आपल्या स्टूडियोंत निरुद्योगी बसल्या बसल्या वाङ्मयांत शिरकाव करून घेतला !–प्रत्यक्ष कलेची जमेल तेवढी थोडीफार सेवा करावी व इतरांच्या केलेला कांटेकोर कठोर कसोटी मात्र भरपूर लावावी या दृष्टीनें त्यानें एक नवाच जोरकस प्रयत्न सुरूं केला !–

भडक रंगांची संवय असल्यामुळें भडक शब्द वापरणें त्याला हातचा मळ होता–आणि त्यामुळेंच त्याची वेड्या जगांतील जहाल साहित्यिकांत दहां म्हणता गणना होऊं लागली !–

अशावेळीं जाणते थोडी कुरकुर करीत !—पण त्यावर तो म्हणे—
" अहो, आपण नेहमी कोणत्याही जगाचे दोन ध्रुव दाखवीत असावेत !

अगदीं आपोआप...मधल्या जगाची--अस्पष्ट कां होईना—रूपेरषा—त्या अगम्य जगाची मनोमय कल्पना...साऱ्यांना होतेच होते!...बरं, या दोन टोकें पद्धतीच्या वाङ्मयसेवेमधून, मधलं आपल्याला वाटतं तें व्यापक स्वरूपाचं जग लोकांनां नुसतंच शून्यकार वाटलं तरी आपलं काय बिघडलं?—आपल्या स्पार्क स्टूडियोची तरी व्यापक जाहिरात फुकट होते हेंच काय कमी आहे?"

आणि मग त्याच्या जात्या सिध्या स्वभावाला धोरणीपणाची घडी बसली. त्याचा तडफदार नवमतवाद व्यक्तिगत मर्यादांच्या पलीकडे धांवूं शकेना!—त्याचा ध्येयवाद चुना लावून पिकवलेल्या केळ्यांप्रमाणें बेचव होऊं लागला!—त्याची कला पाट्या रंगवणाऱ्या पेन्टरच्या धर्तीवर जाऊं लागली!...

पण त्याच्याथला आतां एक भयंकर पालट म्हणायचा म्हणजे तो अगदीं अनपेक्षितपणें अगदीं अलीकडेच नरम पडला आहे. अगदीं नबळा झाला आहे!--त्याच्या एकंदर स्वभावांतच, यापूर्वी कधींहि न दिसलेली अगदीं भीषण शांतता हल्लीं दिसूं लागली आहे!--

'असं का?' याबद्दल आम्हीं मित्रमंडळींनी एका बैठकींत संयुक्त विचार केला; त्यांत अनेक मतमतांतरें झालीं...प्रत्येक जण आपापलें समर्थन करू लागला...त्यादिवशीं एक विरुद्ध दोन असल्या वादाची वावटळ दिवसभर उठली होती!—

आमच्यापैकीं कोणी म्हणाले,...त्याचं लग्न म्हणजेच त्यांच्या आयुष्यांतील मोठं थोरलं युगान्तर होतं!--उलट कोणी त्या विधानाला स्पष्ट विरोध करून म्हणाले...त्याला हळूं हळूं येत गेलेल्या जगाच्या धडामोडींच्या चौफेर अनुभवांमुळें आचार आणि विचार, तत्व नि तपशील, आप आणि पर यांतील प्रत्यक्ष जीवनांत आढळणारा भेद त्याला चांगला समजत गेला!...म्हणूनच हें त्याचें आजचें संक्रमण दिसत आहे एवढंच!--

पण आमच्यांतील कित्येक मानसशास्त्रज्ञ म्हणाले, त्या नवमतवादी कलावंताच्या कलवारुणीचा धुंदी आणणारा कैफ हळूं हळूं ओसरला,



उतरला आणि तो आतां अगदीं नैसर्गिक नियमांप्रमाणेंच नैसर्गिक रीतीनें सिधा साधा माणूस बनत चालला आहे!--कांहीं प्रमाणांत याचें श्रेय शांतारामबापूंच्या 'माणूस'मधील शेवटीं शेवटीं डोळ्यांत पाणी आणणाऱ्या (!) चित्रपटकलेला आहे.

आणि सद्याच्या त्या परिवर्तनातील असली अनेक मुळें शोधून काढली गेल्यामुळें त्या दिवशीं दिवसभर ती हुल्लड चाललीच होती!--

पण कांहीं कां असेना त्याच्याबाबतींत आम्हा सर्वांचा शेवटीं एकच अगदी खात्रीपूर्वक निर्णय ठरला कीं, हिरव्या दुधावरचा उगीच फसफसून वर चढून आलेला फेंस, आतां आपोआपच अगदीं आंतल्या आंत जिरला आहे!--तेव्हां यापुढें आणखी थोडा कढ आल्यावर तरी गोड स्निग्ध सकस साय वर धरावयास कांहींच हरकत नाहीं!-

त्या पूर्वीच्या फेसांत अनेक लहान मोठे बुडबुडे होते. ते सर्व फुटून आतां नाहीसे झाले आहेत. तरी पण त्यांतील दोन मोठमोठे तरी अजूनहि साऱ्या रंगीनेरंगी रंगांसकट माझ्या मनःचक्षूंसमोर उभे रहातात! आणि मग खूप गंमत वाटते मनाशीं!—

सद्याचें संपूर्ण चरित्र लिहावयाची कांहीं त्याच्या आयुष्यांतील ही वेळ नव्हे!— त्याचें तसले खरें उज्वल आदर्श चरित्र अजून त्याला यापुढेंच प्रत्यक्ष जगून बनवायचें आहे! — आणि तें तो आपल्या आयुष्यांत खात्रीनें घडवून आणील अशी आम्हाला पूर्ण खात्री वाटते!—

हा फक्त त्याच्या त्या चरित्राचा उपोद्घात् आहे!—

× × ×

चार वर्षांपूर्वीची गोष्ट!--संध्याकाळीं सहजच सद्याच्या खोलीची जाता जातां कडी वाजवून उघडें दार मी लोटलें नी नांवानें एक ललकारी ठोकून टेबलाजवळच्या खुर्चीवर बस्तान ठोकलें.

पार्टिशन करून केलेल्या मोरीच्या बाथरूममध्यें खरी नळीच्या शॉवरखालीं स्वारी भसाड्या आवाजांत गानगुंजन करीत होती!--

माझ्या समोर पेपरवेटखाली सुंदर अक्षरांत कांहींसें लिहिलेला कागद होता; बसल्या बसल्या चाळा म्हणून तो उचलून मी वाचूं लागलों !--

आणि केवढं आश्चर्य वाटलं मला !—ती सदूच्या व माझ्या माहितींतील सात आठ मुलींच्या नांवाची यादी होती. आणि प्रत्येकीपुढें तिच्या नांवाच्या गोत्राची नोंद होती !--

सदूनेंहि तेवढ्यांत माझ्या चोरीचा कयास बांधला; कारण खडकन् पार्टिशनची कडी उघडून घाईघाईनें टॉवेल कमरेभोंवतीं गुंडाळत तो एकदम उघडाच धांवत बाहेर आला !--आणि मोठ्यानें माझ्यावर डेंकून त्यानें तो कागद माझ्या हातून हिसकाविण्याचा प्रयत्नहि केला.

हिसका हिसकींत कागदाचे दोन तुकडे झाले. वरल्या माझ्या हातांत आलेल्या तुकड्यावर लिहिले होते—" मनू सुलाखे गोत्र..."

मी तिरक्या डोळ्यांनी सद्याकडे पाहून हसलों; तो लाजला—नी मोठ्यानें आरडला "कांहीं लाजारे, हजामांनों !...दुसऱ्याच्या खाजगी..."

"तुम्हां प्रांजल जीवन जगणाऱ्या नवमतवाद्यांना आणि खाजगी ?" मी मध्येंच त्याला अडवून म्हणालों, " कपिला षष्ठीच आली म्हणायची ही !—पण कायरे सदू, आम्हा बुसरट सनातन्यांप्रमाणें तुमचं आंतबाहेर तर कांही नसतं म्हणतोस ना तूं ?...मग ही काय भानगड आहे ? या मनूचं नांव न् गोत्र कशाला घटवतो आहेस कागदावर ?–"

वर्मी घाव बसून तो पुन्हां लाजला. निमूट सदरा चढवलान् आणि आपल्या लांब सडक कुरळ्या केसांतून फणी फिरवीत माझ्याकडे तिरक्या घाबरल्या डोळ्यानें पाहून मग सलगीच्या स्वरांत तो मला हळूच म्हणाला, " चारगटपणा कमी करणार असशील तर एक नवी बातमी सांगणार आहे तुला आज, नान्याऽ ! "—आणि मग क्षणभर बाजूस मान वळवून, किंचित् लाजतच तो मला अगदी कुजबुज्या शब्दांत म्हणाला, " मी लव्हमॅरेज करवण्याच्या विचारांत आहे, नान्या !—त्यांत तुझी मदत पाहिजे आहे मला !—"



" आणि एका लग्नाला इतक्या मुलींची यादी ?—" मी मोठ्यानें हसलों. टोले लगावण्याला बरी संधी आहे या दृष्टीनें मी पुढें म्हणालों. " खरंऽच...विसरलोंच मी...तुझं ठाम मतंच आहे मुळीं नाहीं कां!—कीं....लग्नं ही जमवायचीं नसतात...स्वतःच दिलजमाईनें ठरवायचीं असतात ...तो स्त्रीपुरुषांचा खुषीचा न् प्रेमाचा वैयक्तिक करार आहे... जातपात...गणगोत्र...वयकाल, गरीब श्रीमंत...असला गाढवपणाच्या मर्यादा घालणें...हा निव्वळ आफ्रिकन् रानटीपणा आहे!... प्रेम हा दैवी अमृताचा नैसर्गीक झरा आहे. बंधनाच्या कक्षे पलीकडील स्वयंप्रकाशित स्वर्गीय मंदिरांत...."

"चूप...जास्त बोलशील तर थोतरींत खाशील..." माझा बोलण्याच्या अवेशांत वर वर चढणारा हात धांवत येऊन खसकन् खालीं ओढीत सद्या कडाडला—

पण मग लागलीच त्यानें थोडे नरमाईनें घेतले नि तो माझ्या दोन्ही खांद्यावर मोठ्या स्नेहाने दोन्ही हात ठेऊन लाडुकपणें म्हणाला, " नान्या,...जरा तरी सीरिअस होशील कारे कधी लाइफमध्यें ?...'

मी चेहऱ्यावर गंभीर्य आणून देवासारखा निमूट बसलों !—सदू त्यामुळें जरासाच घुटमळला....मी तेवढ्यांत हुंकार देत म्हणालों, " हुं....ऐकतोय्....आतां अगदीं तोंडाला कुलुपच घातलं बघ—"

" मघापासून सांगतोय् काय मी नान्याऽ ?—" सदू किंचित् थांबून मग मला लाडांत येऊन म्हणाला—" माझं नि मनूचं लव्ह मॅरेज घाटत आहे...आज उद्यां नक्की होईल .."

असल्या शब्दांनी माझं उसनं गंभीर्य पुन्हां फसफसलं !—मी मोठ्यामोठ्यानें हसत जाग्यावरून उठलों व म्हणालों, " लव्ह मॅरेज आणि घाटणें...आकलेऽऽना अघटित घटनाऽऽऽतव दयाऽऽघनाऽ ! सद्या—सद्या—तीं तुझी मतें...तें तुझें लव्ह ॲट फर्स्ट..."

पण सदूला रागारागानें अंगावर कपडे चढवताना पाहून मी माझें बोलणें अर्धवटच सोडून पुन्हां गप्प बसलों !...सदूहि फुगून येरझारा घालूं लागला...

मी शेवटीं समेट घडवायचं ठरवून म्हटलं, “ मग आतां कुठं पेंड खातं आहे तुझं घोडं ?...तुझ्या किंवा तिच्या वडिलाआईची कां संमती मिळत नाहीं आहे ?...गोत्राची भानगड म्हणावी तर पोटजातींचाहि प्रश्न दिसत नाहीं !...मग अडचण कसली ?—बोल बोल...ना !... मित्रा बोल....”

पण मीच बोल बोल बोलत होतों...तो अगदीं निमूट ऐकत उभा होता.

वास्तविक त्यानें ह्या वेळपर्यंत, त्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें हुंड्याच्या म्हणा...दोन मेंढरें धरून आणून त्यांचा ‘ शरीरसंबंध ’ लावण्याच्या म्हणा, किंवा एकंदरच हिंदी विजोड जोडण्यांच्या रानटी प्रवाहपतित संसार पद्धतीवर तरी म्हणा...एकदोन व्याख्यानें झोडायचीं ! बंगाली कुमारिकेच्या आत्मयज्ञाचं करूण शब्दचित्र रंगवायचं...आणि त्यावरूनच शेवटीं हुंडा न घेण्याच्या पत्रकावर—आपल्याप्रमाणें पहिली नाही तरी निदान नंतरची तरी—सही करण्याच्या आवश्यकतेची यथार्थता पटवायची !—

पण आज तसं कांहींच झालं नाही; कांही वेळ तसाच भीषण शांततेंत गेल्यावर सदूच पुन्हां म्हणाला, “तुला नीट ऐकायचं बोलायचं असेल तर सांगतों, नान्याऽ !—”

मी त्याच्याकडे टवकारून पाहिलं; त्याच्या आज नूर साफ बदलला होता.

त्याच्या कलानें घेण्यासाठीं मी जरा संभावितपणानें म्हटलें, “असा चिडूं नकोस, गड्या !—त्या मनू सुलाखेचं काय म्हणतो आहेस ?—तुमचा संबंध कसा आला ?—अन् प्रेम कसं जमलं ?...खरं खरं सांग हं मात्र सारं...”

“ तसा संबंध म्हणजे—” सदू थोडा किरमिजी पडून अडखळला नि मग पुढें म्हणाला, “ माझा संबंध म्हणजे...आमचं अजून विशेष



कांही बोलीभाषण नाहीं झालेलं फारसं...! मोकळी अशी एकदोनदांच ओझरती भेट झाली...पण त्यावेळीं बोलायचं काय हें जरा कोडंच पडे ! तिच्याशीं लग्न मात्र आतां जवळ जवळ जमल्यासारखंच आहे !...एकदां गोत्रबित्र जमलं नि तिच्या माझ्या वडील मंडळींची संमती मिळाली कीं झालं !—”

बोलतां बोलतां तो लाजून थांबला !—पुन्हा त्याचे निमगोरे गाल गुलाबी की काय म्हणतात ना तसे झाले !—आणि मग हळूंच तो खोली-बाहेर खिडकींतून पहात म्हणाला, “ आज आतां तिचे वडीलच येणार आहेत इथं त्याबाबतींत माझ्याशीं बोलायला !—”

“ मग जमलंय् तरी काय लेका?” असें मी बोलणार तें आंतल्या आंत दडपून, मी त्याचा आतांपर्यंत दुर्लक्षिलेल्या खोलीत चौफेर पाहिलें !

माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना !...

आधुनिक नवमतवादाचा जयघोष करणाऱ्या चित्रकाराला शोभेल अशीच त्याची ती खोली नेहमी असे !.... पण आज...? सारा ट्रॅन्स्फर सीन झाला होता !...

दारांतून आंत शिरतांच अगदीं समोर दिसेल असें त्याचें एक आवडतें चित्र असे !... आवेशानें समर्थन करून आम्हां साऱ्यांच्या स्वतंत्र बुद्धीला आव्हान देऊनच नागड्या स्त्रीचें तें चित्र त्यानें तेथें लावलें होतें !...

पण तो तिचा नागडा गोंधळ आज तेथें नव्हता !... ती तोंड घेऊन पळाली होती !...आणि त्या ऐवजी ‘जर्मन श्रीकृष्ण’ तेथें लटकावला होता !...

एवढंच काय, त्याच्या हातची स्त्रीपुरुषांचीं निरनिराळ्या पोझेस मधलीं पोर्ट्रेट्स भिंतीवरुन गुप्त झालीं होतीं !... मधून मधून लँडस्केप्स तेवढे म्हाताऱ्याच्या तुरळक रुपेरी केसांप्रमाणें तेथें चमकत होते. टेबलावर

सद्याचा हसरा फोटो फ्रेममध्यें होता ; परंतु नेहमीं अर्धीअर्धीक भरलेली दिसणारी, सिगारेट-थाटेंक व रक्षा धरणारी, नक्षीदार तबकडी आपला गाशा गुंडाळून पळाली होती.

नेहमींची जागोजाग अपुरीं पडलेली चित्रें तर कोपऱ्यां कोपऱ्यांतून तोंडें लपवून चोरासारखी बसली होती !—सदूला व्यापारी ऑर्डर आलेले भगवान् श्रीकृष्णाचेंच हातांत सुदर्शनचक्र असलेलें चित्र मात्र–अपुरेंच कां होईना–ड्राइंग बोर्डवर मध्यभागीं बसून एखाद्या विघ्नहर्त्याप्रमाणें सदूच्या खोलीचे आज चौफेर रक्षण करीत होतें !—

तो सर्व रागरंग पाहून तर माझें आतांपर्यंतचें सारें गांभीर्य वायां गेलें; प्रयासानें आवरून धरलेलें हसूं फाड्कन् बांध फोडून बाहेर पडलें !–

गोरामोरा चेहरा करून सदूनें माझ्याकडे रागानें पहातांच तर मी जास्तच हसूं लागलों; त्या जवानमर्द हिंमतबहाद्दर नवमतवाद्याची ती हतबल स्थिति पाहून मी म्हणालों, “ हाय हाय !—सद्याऽ सद्याऽ !—कुठं गेली रे तुझी सारीं महान् तत्वें ? ?–तुझ्या स्वभावांत...राहणींत.... बोलण्यांत...वागण्यांत...खोलींत...तुझ्या साऱ्या जगांतच उत्पात झाला म्हणायचं ! !––कां ?––तर म्हणे...एक कोणाची कोण काळी का गोरी पोरगी !...तिचा बाप आज येथें येणार आहे ! !—

“ गाढव !...कोणाची कोण कशी ? ” राग, अजीजी, लाज साऱ्या तुम्ही कल्पना कराल त्या भावना शब्दांत आणण्याचा प्रयत्न करीत सदू म्हणाला, “ मनू सुलाखेचे वडील येणार आहेत !––अन् तिच्याशीं माझं लग्न जवळ जवळ ठरलं आहे !––”

“आणि तेवढ्यासाठीं इतक्या चटकन् तुझ्या इतक्या तत्वांचा सरीस बळी !... सरसकट होळी ? ” मी त्याला दटावलें, आणि मग किंचित गांभीर्याच्या आव अणून मी त्याला हंसतच पुढें म्हणालों, “ एका तत्वनिष्ठ नवमतवाद्याला शोभत नाहीं हें. निदान तें दारासमोरील



नेहमींचं त्या नग्न स्त्रीचं तुझं चित्र ? तें तरी तुझ्या साऱ्या तत्वाचं बोलकं प्रतीकच होतं ना––”

सदूच्या तोंडाला पडलेलें कुलूप उघडें होण्यास किंचीत् अवसर देऊन मी पुढें म्हणालों “ आठवतं सद्या, तें भिंतीवर इथें लटकवितांना तूं म्हणाला होतास–माझ्यावर ओरडून म्हणाला होतास—‘ देव म्हण, निसर्ग म्हण— जें जगांत निर्माण करायला लाजला नाहीं, त्याबद्दल माणसांनीं कसली लाज धरायची ? कलेसाठीं कला !—प्रत्यक्ष जीवनांतील प्रत्यक्ष वाङ्मय ! त्या उज्जळ माध्याच्या रहस्यानेंच माणसाची प्रगति व्हायची ! पण हें तुम्हां कूपमंडूकांना समजणार !’ आठवतं ना ... ? ”

तरी सद्या गप्पच होता. तेव्हां मीच पुढें म्हणालो, “ त्यावर मी तुला अडवून म्हणालों होतों, ‘असेल ! मनुष्य जन्मतः पशू होता असेल!– तरी शेवटीं त्यानेंही लाजून आपल्या भोंवती माणुस्कीचं वस्त्र गुंडाळून घेतलंच ना ? ’ त्यावेळीं तुला कांहीं सुचेना म्हणून माझी गाढवांत गणना करून मोकळा झाला होतास ! मग सद्या, आपण असतों तसं जगाला दाखवायचें असलं तुझं अनादि अनंत व्यापक तत्व आजच कुठं एकदम गडप झालं ?—कीं त्या तत्वांत अनादिकालापासूनच तुझ्या त्या पोरीचा बाप अपवाद आहे म्हणून सांगणार आहेस आतां ? ”

माझ्या त्या फैरीनें सदू सर्द होऊन अधिकच गप्प झाला !––

पण मग पुढें नरमाईनें तो म्हणाला, “ नान्या, या जन्माच्या गांठीं आहेत ! नि व्यक्ति तितक्या प्रकृति ! माझ्या मनाची ही ओढ मी तुला काय सांगणार ?––‘ आंतरः कोपिः हेतु’ जरा सहानुभूतीनें घे !”

माझी सहानुभूती तर केव्हांच पळाली होती; मला खदखदतांना पाहून तो जास्तच चमकला व मजकडे प्रश्नार्थक चेहऱ्यानें भांबावून पाहूं लागला.

× + ×

“ तुझं डोकं बिकं फिरलं––” सद्याला थोड्या वेळानें स्फूर्ति झाली; पण रागानें बोलतां मात्र येईना.

“ तें कांहीं नाहीं ” मी सद्यावर गोलंदाजी सुरू केली, व पुढें त्याचा कटाक्ष झालेल्या नरसोपंती पद्धतीचा अवलंब करून म्हणालों “ तसं म्हटलं तर कारण आहे, नाहींतर नाहीं ! बरं पण कसला हेतु ? कोणाचा कशाबद्दल ? हं कांहीं नाहीं सद्या !––माझं डोकं फिरण्याऐवजीं तूं मात्र तुझी टोपी फिरवली आहेस ! आणि तुझा जहाल नवमतवाद्यांचा कळप सोडून, तूं प्रत्येक क्षणाला अधिकच खोड्यांत पडत चालला आहेस. ”

सद्याला पक्का पकडण्यासाठीं मी थांबलों; पण तरीहि तो निरुत्तरच बसला होता.

* * *

मग एकदम एखाद्या कुशल वकिलाप्रमाणें किंवा शर्लाकहोम्स प्रमाणें त्याच्यापुढें माझें बोट नाचवून त्याला मी दरडावून म्हणालों, “थांब लेका, आतां तुझीं सारीं बिंगेंच मी चव्हाट्यावर आणतों !––आज सकाळीं तूं लवकर उठला होतास !––कबूल ?––सहा वाजून पंधरा... सोळा असतील––मिनिटें झालीं होतीं. समोरच्या दगडाच्या देवळांत घणघण घंटानाद झाला ! कबूल ? तो तुझ्या हातांनी केला होता !— आणखी ऐक !—देवाच्या दारीं क्षणभरी डोळे मिटून तूं— लक्षांत घे सद्या–तूं उभा होतास ! .. एवढेंच नव्हे तर तोंडानें कांहीं तरी पुटपुटत होतास ! आणि स्वतःच्या गालावर चापट्या मारत होतास ! कबूल ? आतां काय पुटपुटत होतास तें सांग लेका ?— आणि जगांत नसलेला देव, त्याचें दार, तुझे डोळे मिटून तिथें उभें रहाणें नी हात जोडणें, या साऱ्या गोष्टी तुझ्या आयुष्यांत आज एकाएकीं कां आल्या?... तेंहि सांग पटकन् ! चल !––युवर एक्सप्लेनेशन वॉंटेड !—”

सद्याला तसें चपापतांना मी जन्मांत कधीं पाहिलें नव्हतें !— कारण मी म्हणत होतों त्यांतील अक्षर नि अक्षर खरं होतं !...सकाळीं दुधाच्या टोपांत तोंड घालणाऱ्या मांजराप्रमाणें आपल्याला कोणी पाहिलं नाहीं असं वाटलं होतं त्याला !––आणि म्हणूनच आतांच्या माझ्या



रोकठोक बोलण्याचा बडगा अनपेक्षितपणें पाठीवर बसतांच त्याला असह्यच झालं होतं.

त्याला बोलण्याची फुरसतच न देतां मी पुढें म्हणालों; “ सद्या, तूं आजपर्यंत नवमतवादी होतास–तेव्हां आजच्या दिवसतरी मला नास्तिक होऊं दे !–– नवमतवादी बच्चा, तुझा आज सकाळचा देव बिव सब झूट होता !–एवढंच काय ? पण ज्या कारणासाठीं तूं त्याच्या दारीं गेला होतास ती तुझ्या लव्ह मॅरेजचीं कल्पनाहि झूट आहे !!...तूं आत्तां मला ज्या लव्ह मॅरेजची गोष्ट सांगितलीस तें तुझं लव्ह मॅरेज मीच जमवलं आहे ! तूं असा दबकूं नकोस ! शाळेचं शिक्षण, दिसायला बरी या तुझ्या ठोकळेबाज कल्पना काय मला माहीत नव्हत्या ?––गणगोत्राच्या भानगडीहि उपस्थित होऊं नयेत, एवढी खबरदारी घेऊन, मी नि त्या तुझ्या मनूच्याच भावानें तुमचें हें लग्न आमच्या मनांत प्रथम ठरवलं !––आणि पुढें तुझ्याशीं बुद्धिबळाचे डाव खेळत आलों...”

“ चूप गाढवा...आतां मात्र खरंच थोबाडींत खाशील ! ” सदूचे मन माझ्या शब्दांनी द्विधा होत होतें. त्याला मी हें खोटेंच सांगत आहे असें वाटून, रागानेंच तो अस्पष्ट म्हणाला, “ गद्ध्या, मनूचा भाऊ गेली तीन चार वर्षें कलकत्त्याला नोकरीला आहे ! आणि त्याची तुझी रे कोठली ओळख ? थापांना तरी कांहीं मर्यादा...”

“ तुझ्यासारखे मोठमोठ्या ग्रंथांचे आधार–निदान नांवें देतां येत नाहींत म्हणून माझ्या खऱ्या गोष्टीही थापा काय रे, सद्या ?” मी त्याच्याकडे रागानें दृष्टि रोखून म्हणालों, “ थांब लेका, आतां तुझी आणखी कसून उलटतपासणीच करणें जरूर दिसतें ! तूं म्हणतोस तो कलकत्त्याचा रमाकांत मनूचा सख्खा भाऊ आहे असें म्हटलें तर त्याला तुझी कबूली आहे !...”

“ आहेच मुळीं तो सख्खा भाऊ ! ” सदू विजयी मुद्रेनें म्हणाला “....मला तेंच म्हणायचं आहे...आणि म्हणूनच मी तुझ्या साऱ्या थापा समजतो !...”

"ठीक तर! आतां थांब. गजा देशपांडे माझा जिवलग मित्र आहे असें म्हटलें तर तें तूं कबूल करशील ?..."

" हो ! तूं आणि तो पुष्कळ वेळां माझ्याकडे माझ्या चित्रकला वर्गांत आलेले आहांत !"

" उत्तम ! आतां त्याची तुझी पहिली भेट लक्षांत आण ! त्याच्या अगदीं दुसऱ्याच दिवसापासून मनू सुलाखेचं नांव तुझ्या वर्गांत दाखल झालें !....कबूल ?... आणि त्यानंतरच तुमचा दोघांचं तूं म्हणतोस तें 'लव्ह' हळुहळु वाढलं ! कबूल ?.. "

सदू चपापला !

पण मग पुन्हा ओरडून म्हणाला, " असेल खरं हें ! पण या गजाचा नू मनूचा काय संबंध ? तो तर तिला ओळखतही नसेल. "

" असा संशय घेऊं नकोस, बेट्या !—अजून तुझं तिच्याशी लग्न व्हायचंय् ! तो संबंधच आतां तुला सांगतो थांब लेका !" माझ्याकडे तो दच-कून पाहण्यापूर्वींच मी त्याला म्हणालों, "मनूचा गजा सख्खा भाऊ नसला तरी माणसाला आईप्रमाणें मावशाही असतात कधीं कधीं !–आणि म्हणूनच मनूचा गजा सख्खा मावसभाऊ ठरतो !—खऱ्या गोष्टींनां असं दचकण्यांत अर्थ नाहीं !— हं आतां ही माझ्या खिशांतून काढलेली गोत्रावळी पहा ! डावरे आणि...सुलाखे यांचीं हीं गोत्रें ! तांबड्या शाईच्या चौकटीनें खुणा करून ठेवली आहेत कीं नाहीं पहा !— अरे, हीं गोत्रं जमलीं नसतीं तर आम्ही दोघांनीं हें तुमचं लग्न जमवलंच नसतं ! कारण तुझ्या नवमत-वादाला पेलणार नाहीं अशी—एक मोठी उडी मारावी लागली असती ना तुला ?--"

सदूचें अगदीं तोंडच बंद झालें.

पण इतक्यांत त्याला काय वाटलें कोणास ठाऊक ! त्यानें झटकन् माझ्या हातून ती लांबलचक गोत्रावळी ओढून घेतली व एकदां दोघांच्या गोत्रांची खात्री करून त्यानें तिचे तुकडे करावयास सुरवात केली...



" अरे अरे !—" असें मी म्हणत आहे तेवढ्यांत, मी माझ्या बहिणीच्या लग्नाच्या खटपटीसाठी मोठ्या प्रयासानें केलेली ती गोत्रावळी, चिंधड्या होऊन खिडकी बाहेर हवेंत पसरत होती. व सदू मोठ्यानें गर्जून मला हंसून म्हणत होता !—"बस्स !...आतां जन्मांत कधीं मला या गोत्रावळीची जरूर पडणार नाहीं ! !..."

" अरे पण गाढवा !..." मी रागानेंच म्हणालों, " तुला नसेल जरूरी–पण मी गरजू आहे. माझी बहीण लग्नाची आहे !...वाः ! हा बरारे नवमतवाद तुमचा !...किती स्वयंकेंद्रित आहेसरे तूं सद्याऽ ? "

पण मी आणखी त्याच्या लव्ह मॅरेजवर कांहीं नवें प्रवचन सुरू करणार,...तोंच दार हळूंच लोटलें गेलें व एक म्हातारे गृहस्थ आंत शिरले.

मी ओळखले तेच मनूचे वडील !

सदू माझ्याकडे साभिप्राय पाहून, 'बोलूं नको' म्हणून डोळ्यानें दबकवीत होता; सूचना घेऊन मी चपला घातल्या व बाहेर पडलों !—

× × ×

माणसाच्या पाठीला पोट लागलेलं असतं ! म्हणूनच त्याला आपलं डोकं गहाण ठेवावं लागतं. 'कांहींच जमलं नाहीं तर मास्तरकी' या कल्पनेला मान देऊन शेवटीं खानदेशांतल्या एका पाणी नसलेल्या गावांत माझ्या अर्जाला बोलावणें आल्यामुळें मी दाखल होऊन रुजूही झालें होतों. नवीन विरुद्ध जुन्या पद्धतीच्या गोंधळांत माझीं हाडें खिळखिळीं झालीं होती !—मुलांना प्रश्न विचारीत शिकवितां शिकवितां माझीं पळें तास, घटका, करतां करतां महिन्यामागून महिनेही निघून गेले होते.

मुंबई व मुंबईचे मित्र यांची या मधल्या अवधींत आठवण पुसट होत आहे, तोंच एके दिवशीं आमच्या पोस्टमननें एक कुंकुमपत्रिका माझ्या हातीं आणून दिली; आणि लग्नाचे दिवस चालू असल्याची मला जाणीव करून दिली.

नाहींतर मला लग्न सराईचं भान राहण्याचं कांहीं कारणच नव्हतं. स्वतःचं लग्न होऊन माझ्या घरांत छोटा वसंत व चिमणी मैना दुडुं दुडुं लागली होती. धाकट्या बहिणीच्या लग्नाची जबाबदारीही चिमणरावांच्या चऱ्हाटांतून धडे घेत, सद्यानें गोत्रावळी फाडल्यानंतरच्या लग्नसराईंतच अंगावेगळी केली होती.

तेव्हां हातीं पडलेली कुंकुमपत्रिका मी घाईघाईनें उघडली, तेव्हां सद्याचीच मला आठवण होत होती.

आणि माझ्या मनाची धांव बरोबर होती. उघडल्याबरोबर सोनेरी अक्षांत इंग्रजी मजकूर होता—

## श्री. स. र. डावरे व कु. मनू सुलाखे यांचें आपल्या विवाहशुभप्रसंगीं प्रेमळ हार्दिक आमंत्रण—

स्वदस्तुरचें तसले त्यांचें आमंत्रण हातांत धरल्या धरल्या मला सदूच्या अनेक वाक्यांची पुन्हां एकदां नव्यानें आठवण झाली. आणि स्वतःशींच मी पुटपुटलों, "बेट्यामध्यें कांहीं तरी हें आहे हं! साऱ्यांना आतां धाब्यावर बसवून म्हटल्याप्रमाणें डॉ. केतकरांनांच आपलें लग्न लावायला तो बोलावणार..."

हो, कारण तो नेहमींच म्हणत असे, " ही जुनी खोडें विनाकारण सोहाळे मांडतात. पैशाचा नाश करतात. मुलींच्या आईबापांना अपमानानें नडवतात व नाडतात. अशावेळीं तरुण मंडळीने बंडच करावयास... ......"वगैरे वगैरे! सारी यादी साऱ्यांना माहित असतेच म्हणा...

तेव्हां अशा स्थितींत सदूनें एवढें धैर्य दाखवावें हें केवढें मोठें समाधान—

पण संध्याकाळीं गजा देशपांडे माझा पत्ता काढीत माझ्या खानदेशी पर्णकुटिकेंत पायधूळ झाडता झाला. आणि—

साराच घोंटाळा झाला! माझा आनंद जिथल्या तिथें जिरला! एक नवी जबाबदारी मात्र म्यां पामर मास्तरवर येऊन पडली.



गजानें मला घाईघाईनें गाडींत कोंबलें! आणि गाडीभर सदूच्या मधल्या काळांतली चर्पटपंजरी सुरू ठेवली.

*　　　*　　　*

मनूच्या वडिलांनी त्या दिवशीं सदूला भेटून बरेंच बोलणें केलें. व शेवटीं त्या नवमतवादी तरुणाच्या मागणीला आपला रुकार देऊन मनूचा साखरपुडा साजरा केला.

सदूला जग जिंकल्यासारखे वाटले त्यावेळीं! स्वर्ग तर अगदीं दोन बोटें उरला होता.

स्वर्ग इतका जवळ आल्यानंतर त्यातल्या स्वर्गीय आनंदसागराच्या प्रचंड लाटांना काय तोटा?... स्वर्ग व जग अशी दोन्ही सदूच्या हातीं आल्यामुळें त्याची आमच्यासारखी 'चावट' मित्रमंडळी अर्थातच त्याच्या मनाच्या पाताळांत दडी मारून बसली!...मी तेथें नव्हतों. पण माझ्याकडे सुरवाती सुरवातीला येणाऱ्या मित्रांच्या पत्रांत मात्र साऱ्यांची तशी तक्रार नेहमी असे.

ते म्हणत, "सदू हल्लीं आम्हा कोणाला ओळखीनासा झाला आहे... तो आणि मनू....मनू आणि तो!..."

त्याच त्याच तक्रारी मी तरी किती म्हणून वाचाव्यात. मी मनाशी मात्र म्हणे, " या बेट्यांना अकला नाहींत!—सदू बडबडतो! पण त्याला ध्येयें आहे—तत्वें आहेत—"

ते म्हणे त्याला डिवचत, "कां सद्या, आतां लग्न केव्हां?" त्यावर तो म्हणे म्हणे—"चोरांनों, तुम्हाला रे काय करायचं? हीं लाडू घालणारीं लग्नें नव्हत!...जग सारे एथून तेथून समारंभप्रिय झालें आहे. पण हा व्यक्तिगत खाजगी प्रश्न! आम्ही करूं तुम्ही म्हणतां तसें लग्न, नाहीं तर जगाच्या अंतापर्यंत"...

पुढें ते तरी काय बिचारे बोलणार? सद्याच्या तोंडावर शक्य नव्हतें म्हणून स्वतःच्याच तोंडावर ते हात ठेऊन गप्प बसत.!!

शेवटीं ते त्याला विचारायचेंहि सोडून देऊं लागले.

पण तेहि सदूला नको असे. आपली असली गोड थट्टा कोणी करूं नये असे कोणाला वाटेल ?...

कारण मी किंवा गजा असा एखादा वित्तं बातमी जाणणारा अपवाद सोडला तरी तें 'लव्ह मॅरेज' होतें. 'सहवासोत्तर'...ठरलेलें सारें !...ती गतानुगतिक आंधळी कोशिंबीर नव्हती !...तेव्हां सदूला...

पण सदूला वाटली नाहीं तरी मनूच्या वडिलांची तरी ती आंधळी-कोशिंबीरच ठरली !....

सदू जगाच्या अंतापर्यंत 'स्वर्गीय-पवित्र-आनंदी' वातावरणांतच वावरूं इच्छित असला, तरी मनूच्या वडिलांना एक लग्नसराई नाही तर पुढली तरी टाळावी अशी इच्छा नव्हती. समारंभप्रिय समाजाला सदू रोज मोजून लाखोली वहात असला तरी मनूचे वडील मुलाबाळांचे धनी होते; आणि व्यवहारी जगाचे जडपायावर उभारलेले सावळे गोंधळ पाहून सदूच्या डोक्याला हजारों आंठ्या पडत असल्या तरी सदूच्या वृद्ध वडिलांच्या डोक्यांत मात्र हजारों आंकडे येऊन जात होते.

शेवटीं सदूची इच्छा असो नसो पुढच्या साऱ्या गोष्टींचे पर्वत उभे राहिले.

ते अर्थात् साधे सुधे नव्हते. ज्वालामुखी होते. त्यामुळें धरणीकंप झाले. आणि सदूच्या स्वतंत्र नवतवादाचा नंगापर्वत हां हां म्हणतां वितळून खुजा होत शेवटीं पूर्ण सपाट झाला !...

* * *

हा धरणीकंपाचा पहिला धक्का दोघा म्हाताऱ्या माणसांच्या मुलाखतींत बसला ! त्यावेळींहि सदू देवाचे उंबरठे झिजवीत होता कीं काय कोणास ठाऊक ?...पण प्रलयकाळच्या वेळींच होईल असा सदूचा चेहरा झाला होता !....प्रथम त्याचा व नंतर मनूच्या वडिलांचाहि ! ! असे गज्या म्हणत होता एवढें खरें !—



दोघांचीं कारणें मात्र भिन्न होतीं !...

सदूच्या वडिलांचे केस पांढरे झाले होते. त्यांनी फ्राईड मार्क्स वगैरे मधून तत्वांचे गठ्ठे मिळवले नव्हते,...तरी त्यांनी आयुष्यभर मिळविलेल्या मूठभर तत्वांवरून, 'रुपयाला चौसष्ट पैसे मिळतात' एवढं त्यांचें प्रांजल मत झालें होतें. सदू आपला एकुलता एक मुलगा आहे व आपण कांहीं सदूसारखे कॉमरेड होण्याइतके अगदींच 'हे' नव्हत याचीहि त्यांनी मनाशी खूणगांठ बांधली होती.

सदूच्या चित्रकलावर्गाचें भाडें व त्याच्या मुंबईतील रहाणीचा बहुतेक खर्च वडिलांकडून मनीऑर्डर आल्यानंतरच चुकता होत असे. त्यामुळें असेल किंवा 'वृद्ध वडिलांची लहानसान मतें त्यांच्या उरेलल्या छोट्या आयुष्यांत कशाला बाजूस सारा ? आपल्या प्रांज्वल तत्वांना आपल्या आयुष्यांत पुढें पुष्कळ वाव देतां येईल !' असा सदूनें पोक्त विचार केला म्हणून म्हणा,...त्यानें मुहूर्तादि किरकोळ (?) बाबती ठरविण्यासाठीं मनूच्या वडिलांना आपल्या खेडेगांवचे बोट दाखविलें.

त्याप्रमाणें अगदीं तक्रारी चेहरा करून मनूचे वडील तिकडे गेले व मग एक यादी घेऊन चार दिवसांनी मनूसह तडक सदूकडेच परतले.

यादीच्या कलमांत ३० तोळे सोनें, पांच विहीणींचा मान, दोन-मांडवांचा घराण्याला साजेसारखा खर्च, रुप्याचें ताम्हणतांब्य', कपडे व इतर कांही किरकोळ तपशील होता.

यादी लहानशीच होती. पण चिंचोळी आणि लांब होती !...

त्या यादीकडे पहातां पहातां सदूला मनूकडे पहाण्याचें भान राहिलें नव्हतें.

पण मग त्यानें हळूंच तिजकडे पाहिलें,...तों तिचे गोल पातळ, जंपर, नागीण वेणी, झूल जाऊन तेथें सकछ रस्ता, लांब हातांचें पोलकें, चक्करडें व मोठ्या कुड्या त्याला दिसल्या !—

मनूचे वडील, 'कांही फेरफार झाला तर सदूकडूनच..'अशा दृष्टीनें

त्याच्याकडे मुग्धपणेंच पहात होते. सदू मनूकडे केविलपणें पहात होता व मनू आपल्या वडिलांकडे पहात होती.

वाङ्मयांत सहसा न आढळणारा हा न्यारा त्रिकोण पूर्ण होत होता.

अशा तऱ्हेनें ही सुरू झालेली अबोल मुलाखत मुग्धपणेंच संपली; व मनूचे वडील आपल्या मुलीसह, यादी खिशांत घालून खिन्न मनानें खालीं पहात कांही न बोलतां खाली उतरले.

वर्षभरांतील त्या गोड गडबडीनें आपल्यावरील खर्चाचा बोजा बराच कमी होईल अशी आतांपर्यंत थोडीफार खटपट केलेल्या त्या कुटुंबवत्सल माणसला मोठी आशा होती.

पण यादी खिशांत घालून सदूच्या तीन जिन्यांच्या पायऱ्या उतरताना, त्यांना एकदम एक नवीनच आठवण झाली! 'सदूच्या खेडेगांवी लग्नासाठीं येण्याजाण्यास, या चढउतरीनंतरही या पायऱ्यांच्या दुपटी इतकी खर्च होईल ती रक्कम' त्या यादींत मिळवावयाचे आपण आतांपर्यंत साफ विसरलोंच होतों.'

× × ×

मारवाड्याच्या हिशोबाच्या वह्या दोन प्रकारच्या असतात म्हणतात. सदूच्या लग्नाच्याही दोन प्रकारच्या कुंकुमपत्रिका छापल्या गेल्या होत्या.

एक मला आलेली सदूच्या व मनूच्या सहीची आधुनिक!...व 'शरीरसंबंधा'दि शब्दांनी भरलेली 'श्री गजाननप्रसन्न' युक्त अशी तांबड्या शाईंतील सदूच्या वडिलांची कुंकू फासलेली गतानुगतिक!...

आणि गजानें असें अचानक येऊन, मला गाडींत कोंबले नसते तर या दुसऱ्या कुंकुमपत्रिकेची मला कल्पनाहि येती ना!...

पण मग हा घोंटाळा कसला उपस्थित झाला होता तुम्ही म्हणाल? ...मलाहि समजत नव्हते. गज्यानें घराबाहेर मला ओढलें तेव्हां.



पण मग तो एवढेंच म्हणाला, "सद्यानें तर शरणचिठ्ठी दिली आहे बापाला! आतांपर्यंत या लव्हमॅरेजचा हिशेब तीन हजारावर गेला आहे! पुढे तरी त्याला दम देऊन तट उभारण्याचें काम तुझें आहे!—मनूच्या वडिलांच्या खिशाला आणखी कातर लागली तर तुला जबाबदार धरीन मी!...आणि तुझ्याकडून भरून घेईन सारे!—"

त्यानें गाडींत सांगितलें म्हणून; नाहीतर मी तरी 'सूंबाल्या'च केला असता!.. आणि नाहीं तरी म्या पामराकडून काय घेणार होता म्हणा तो!...गजाला किंवा मनूच्या बापालाहि तें शक्य झालें नसतें!

अर्थात् तेवढ्या समाधानावरच मी मंडप गांठीपर्यंत व तेथून परतेपर्यंत जगलों!...

लग्नाच्या आदल्या दिवशीं आम्ही सदूच्या खेडेगांवी पोहोचलों. दोन्हीकडचा मी वऱ्हाडी!...पण गजानें मला प्रथम लगाम घातली होती!

मला आलेले पाहून सदूला फारसें समाधान झालेलें मला दिसलें नाही. 'ही ब्यद कशाला आज येथें?' अशा चेहऱ्यानें तो मजकडे पहात होता.

डॉ. केतकरादि मंडळी तेथें दिसेनात. दोन भटजी फिरत होते. मुसलमानांचा ताशा (!) ठो ठो वाजत होता. मधून मधून सनई कुरकुरत होती. मुलांचा व विहिणींचा किलकिलाट त्या दोहोंतूनहि स्पष्ट ऐकूं येत होता.

उष्टीहळद व विड्या तोडणें यापासून सुरवात झाली!...जरूर पडेल तशी मी माझी (पगडी नव्हती) टोपी फिरवीत होतो!...वरपक्ष व वधूपक्ष दोन्ही माझ्यांत समाविष्ट होते. सुपारीचा खेळ मी हट्ट केल्यामुळेच झाला.

भटजीचा आवाज बसला होता; ताशा शेकत होता! त्यामुळें त्याची मंगलाष्टकाला सांथ होत असल्याप्रमाणें मला वाटलें.

मग एकच गोंधळ झाला !....

'वाजवारे वाजवा' या गजरानंतर पानिपताप्रमाणेंच ताशाचा गोंधळ सुरूं झाला. त्यांचे हात दमलेसे पाहून सनईवाल्यांचें 'पेंऽऽएँ !' करून पेपेरें साफ करीत सुरवात केली !....

जेवणावळीच्या वेळीं मनू हातांत निरांजन घेऊन आली. पण घास द्यावयास मनू लाजत होती. आमच्या कांही उत्सांही तरुणांनी वरपक्षांतील ( यावेळीं तरी माझा 'वरपक्ष' होता; पण साऱ्या गोंधळास मीच जबाबदार होतों असा मात्र माझ्यावर नाहक आरोप आहे. ) हट्ट केल्यामुळें व उठून जाण्याचा धाक दिल्यामुळें सदूनेंच मनूला प्रथम घांस दिला.

मग मनूचाहि नाइलाज होता. तिनेंहि लाजत सदूच्या जवळ बसून त्याला घांस दिला !...

आणि कार्यसिद्धीस नेणाऱ्या श्रीसमर्थांच्या कृपेनें पुढलें सर्व सुरळीत पार पडलें !—

मी आंतून प्रयत्न करूनहि, घोड्यावरून वरात न निघतां, खेड्यांत असलेल्या जुन्या फोर्ड गाडींतून एखाद्या नवमतवाद्याप्रमाणें निघाली ! गजानें फूस लावूनहि वरानें जोडयासाठीं हट्ट धरला नाहीं.

सदूच्या त्या तसल्या नवमतवादी हट्टाबद्दल मला व गजाला खूपच संताप आला त्याचा !—

पण सदू खंबीर गडी होता !—तो आपला शब्द फिरवीना ! !

सकाळींच त्या खेडयापासून चार मैलांवर असलेल्या स्टेशनांतून आमची गाडी सुटणार होती. चांदणेंहि होतें. तेव्हां गजानें व मी परतायचें नक्की केलें होतें !

गृहप्रवेशानंतर गांठ मारलेलें तें नूतन जोडपें पाहून मात्र मला खरोखरच गोड गुदगुल्या झाल्या. एखाद्या लघुकथालेखकाला आपण



जुळविलेलें प्रेमाचें सुंदर कथानक शेवटपर्यंत नेल्यामुळें जो आनंद वाटेल तोच माझ्या मनांत त्यावेळी आकंठ भरला होता !—

आणि मधल्या गोष्टी मी त्या गडबडींत क्षणभर विसरलो. सद्याचें इंग्रजी वाक्य मला मराठींत एकदम स्फुरलें, "मानव स्खलनशील आहे !—"

त्यामुळें मनूकडे मी पहातांच ती लाजून खुद्कन् हंसली.

पण सदूकडे पहातांच त्यानें माझी दृष्टी कौशल्यानें चुकवली.

तरी मी पुढें झालों !—आणि त्याला हळूच म्हणालों. "सदू, सकाळच्या गाडीसाठी आतां आम्ही निघतों आहोंत....तुम्हा प्रेमी पांखरांना जुन्या पद्धतीनें सांगायला कशाला पाहिजे म्हणा !...पण रीतीप्रमाणें सारं झालं पाहिजे !...तेव्हां...सदू,...आमच्या मनूला पदरांत घे म्हटलं !..."

मनू खुद्कन् हसून मला म्हणाली, "पुरे चावटपणा ! उद्यां जा नाऽ, नाना !...घाई काय ?—"

सदू बिचारा प्रयासानें फिकें हास्य चेहऱ्यावर आणून मजकडे पहात होता !—

माझ्या अंगांत तेवढयांतच वरपक्षवधूपक्षांचे मिश्र भूत संचारलें. मी हळूच पुढें सरकून सदूच्या कानांत पुटपुटलों..." घेतों रजा !—बरं कां 'स-र-डा' ! "

एखादी गांधील माशी कानाला चावावी त्याप्रमाणें सदू दचकला !—त्या नवमतवाद्याची मान अगदीं सहजासहजीं किंचित् खालीं कलली !...

पण त्याचवेळीं मनूची मान मात्र उंच वर होती !...

आणि म्हणूनच, मी आलों तसा जातानांहि वधूपक्षाचा सनातनी होतो ! !—

चिमूट सहावी

# मनाचें मरण

कुठंतरी मी ही गोष्ट वाचली आहे, कीं मला नुसतं स्वप्नच पडलं होतं तसं सविस्तर कधींतरी, कोणास ठाऊक!...

एका बिलंदर चोरानें कांहीं समाजद्रोही भयंकर गुन्हा केला. 'मरेपर्यंत फांशी'...'मरेपर्यंत विजेची खुर्ची' असाच कांहींसा न्याय-देवतेनें पुकार केलेल्या न्यायाचा आशय होता. देहान्त शासन मात्र ठरलें होतें!...

त्या तुरुंगांतील डॉक्टर नुसता डॉक्टरच नव्हता; मानशास्त्राचा सखोल अभ्यास केलेला एक कल्पक डॉक्टर होता तो! त्याच्या डोक्यांत एक अगदीं अभिनव कल्पना आली. एका मानसशास्त्र प्रयोगानें कैद्याचा देहान्त घडवून आणावा हीच त्याची ती अभिनव कल्पना!...मोठ्या प्रयत्नानें त्यानें सरकारी परवानगी मिळविली!

त्यानें काळोखी खोलीत त्या कैद्याला आणवलें. तेथें तांबडे दिवे मंद मंद प्रकाशत होते!...कोणी कांहीं बोलत नव्हतें. तो दुर्दैवी प्राणी भांबावून घाबरून आपल्या भोंवतालच्या साऱ्यांकडे पहात होता.



तेवढ्यांत डॉक्टर गंभीर चेहऱ्यानें पुढें आले. त्यांनीं त्याच्या खांद्यावर आपला थरथरता हात ठेवला आणि ते हळूंच म्हणाले, "हत-भागी जीवा, आतां मिळाल्या शिक्षेप्रमाणें मरावयास तयार हो!"

तो तसा त्यांच्याकडे बघत आहे तोंच एकामागून एक सारे तांबडे दिवे विझत गेले; शेवटीं एक तांबडा दिवा तेवढाच त्या मोठ्या थोरल्या खोलींत गंभीर मंदपणें प्रकाशत होता!...

डॉक्टरांनीं त्या कैद्याला एका टेबलावर बसवलें व तें हळूहळू पुट-पुटत म्हणाले, "दुर्दैवी प्राण्या!...माझा कांहीं एक इलाज नाहीं!...आतां तुझी शिक्षा तुला भोगलीच पाहिजे! तुझ्या आधीं आज, काल...दोन दिवसांत या दिव्यांप्रमाणेंच कित्येकांच्या जीवन-ज्योती पट, पट, पट करीत गेल्या! आतां हा दिवाहि तुझ्या मृत्यूबरोबरच विझून जाईल!...मग या खोलींत काळोख...काळोख..."

ते एवढे बोलून क्षणभर थांबले!...तो मृत्यूच्या जबड्यांत समजून समजून शिरत असलेला कैदी, त्या काळोखांतील एकुलत्या एका तांबड्या दिव्याकडे, आपल्या मनांतील भयंकर खळबळ आंतल्या आंत दडपून, टव-कारून पहात राहिला...त्यानें दोन तीन मोठे निश्वास सोडले...हळूंच एक भयसूचक चीत्कार केला आणि......

तोंच डॉक्टर त्याचे डोळे बांधून म्हणाले, "थांब...तुझे जरा देखील हाल होणार नाहींत...फाशीनें मनुष्य घुसमटतो!...विजेच्या खुर्चीनें अगदीं जिवंत जळतो...काठीसारखा ताठ होतो......"

कैद्यानें अंगावर शहारे आल्यासारखें केलें!...डॉक्टर पुन्हा क्षणभर थांबून म्हणाले, "दहा मिनिटांत तुझी या जगांतून कमींत कमी त्रासांत सुटका होईल, असा मीं एक साधा प्रयोग ..शास्त्रीय प्रयोग करीत आहे!"

त्या हतभागी जीवाची छाती वरखाली होत होती!

"माणसाच्या पायाच्या घोट्यांत अशी एक अत्यंत लहानशी केसा-

सारखी पण फार महत्वाची रक्तवाहिनी सांपडली आहे !"...डॉक्टर क्षणभर थांबून पुढें म्हणाले, "ती उघडी केली कीं भोंक पडलेल्या मडक्यांतून जसें सगळेच्या सगळें पाणी झिरपून जातें तसें तिच्यांतून मनुष्याच्या अंगांतील सगळें अगदीं थेंब न थेंब रक्त झिरपून जातें !...त्याचें हृदय अगदीं चपटें होतें ! शेवटीं थांबतें...तो दहा मिनिटांच्या आंत गतप्राण होतो !—फांशीचा त्रास नाहीं...विजेचा धक्का नाहीं...फक्त एकदां सुरवातीला चाकूनें ती शीर तोडावी लागते, त्यावेळीं एकदां दुखेल तेवढेंच......"

कैद्याची वाचा तर बंदच झाली होती...डॉक्टरांनीं त्याला झोंपवलें...त्याला फडक्यांनीं टेबलाला बांधलें. व मग ते डोळे बांधलेल्या त्या कैद्याला म्हणाले, "बाय्–बाय्...अनफॉर्च्युनेट सोल !"

आणि त्यानंतर त्यांनीं चाकूनें त्याच्या लुल्या पडलेल्या पायाच्या घोट्याला एक लहानशी जखम केली...तेथें सुई टोंचली...कैदी भयभीत आवाजांत चीत्कारला...त्याबरोबर त्याला किंचित् दडपून ते म्हणाले, "थांब–थांब...संपलं सगळं...आतां कांहीं राहिलं नाहीं तुझं दुःख ! तुझा स्वर्गाचा प्रवास या...अगदीं या क्षणापासून सुरळीत सुरू झाला..."

डॉक्टर किंचित् थांबले व पुढें ते आपल्या हस्तकांना उद्देशून हळू हळू बोलूं लागले,..."ही...ही पाहिलीत ! हं ! हीच, मी म्हणत होतों ती रक्तवाहिनी बरं कां ?...पाहिलीत ना ?...सुरवातीला असं थेंब थेंबच गळणार रक्त !...पाहिलंत...आतां लहानशी धार झाली ना सुरूं...हं घ्या पाहूं तें भांडं इकडे !...काय ?...अबबबब...किती जोरानें वाहूं लागलं हो आतां रक्त...इतक्यांत अर्धे भांडंहि भरून गेलं कीं !...घ्या घ्या तें दुसरं भांडं ! लौकर...लौकर..."

किंचित् काळ खोलींत पुन्हा भीषण शांतता झाली...त्यावेळीं एखादी टांचणी पडली असती तरी आवाज ऐकूं आला असता ! कैद्यांची छाती घणाचे ठोके देत होती !



मग डॉक्टर पुन्हा कैद्याची नाडी आपल्या हातीं धरून घाबरल्या आवाजांत म्हणाले,..."पाहिलंत !...चेहरा कसा अगदीं भेसूर नी फिकट दिसूं लागला...नाडीहि अगदीं जोरावली...सारें शरीर कसं लुलं...अगदीं साफ लुलं पडलं आहे नुसतं !...ही पहा नाडीहि मधून मधून थांबूं लागली आतां याची !...हं...किती मिनिटें झालीं ?...आठ !...झालंच तर मग आतां !...दोन मिनिटांचाच सोबती आहे म्हणायचा !...बरं...घ्या तें चौथं भांडं पुढें...अहो, हळुं हळूं !...सांडवाल !..."

डॉक्टर पुन्हा किंचित्काळ अगदीं गप्प बसले. त्या कैद्यानें कांहीं अस्पष्ट शब्द उच्चारले !...हात पाय हलवण्याचा अगदीं क्षीण प्रयत्न केला......

तोंच डॉक्टर पुन्हा नाडी पहात म्हणाले,..."हें काय ?...नाडी अगदींच लागत नाहीं...हाताला ! छे, मुळींच नाहीं !...श्वास...छे...तोहि ऐकूं येत नाहीं !...कापूस हलत नाहीं !...गेला तर बिचारा !...हो,...आटोपलाच म्हणायचा कारभार त्याचा !...पण मग फांसाच्या किंवा विजेच्या त्रासापेक्षां हें बरं, नव्हे कां ?...आतां पहा !...उरलेला तांबडा दिवा टाका काढून पाहूं प्रथम !...काळोख...काळोख...अगदी अडद अंधार ठेवा चारी बाजूला !!...जीवनज्योत गेली त्याची..."

आणि आश्चर्य म्हणजे असें कीं...त्याच क्षणीं त्या कैद्यानें एकदां अगदीं सूक्ष्म हालचाल केली आणि तो खरोखरच मरून पडला !...

पण त्याहून भयंकर आश्चर्य म्हणजे रक्तवाहिनी कुठलीच उघडली गेली नव्हती !...रक्त जरादेखील वाहिलें नव्हतें...रक्तानें भांडीं तर मुळींच भरली नव्हती...कीं नाडीहि डॉक्टर म्हणत होते त्याप्रमाणें मंदावत गेली नव्हती जरादेखील...

फक्त डॉक्टरांच्या हस्तकांपैकीं एकानें त्यांच्या आगाऊ सूचनेप्रमाणें शुद्ध पाण्याची सतत धार त्या डॉक्टरनी ओरखडलेल्या भागावर हळूहळू

ओतत ठेवली होतीं...कैद्याचे डोळे बांधून ठेवल्यामुळें बंद होते... तोंड बांधलें होतें ...हात पाय पट्ट्यांत अडकले होते...

आणि केवळ त्याचे निरोगी तीक्ष्ण कान तेवढेच डॉक्टरांचें वर्णन व त्यांच्या हस्तकांच्या हालचाली अगदीं इथ्यंभूत ऐकत होते......

अर्थात् दहा मिनटांची अवधी संपत संपत आली, तशी उरलेला तांबडा दिवाहि इतर दिव्याप्रमाणेंच विझण्याची आणि आपली जीवन-ज्योत विझण्याची ती आधीं ठरलेली भयंकर वेळ झाली !...ही कल्पना त्या कैद्याच्या डोक्यांत शिरली !...आणि तो केवळ त्या भयंकर कल्पनेनेंच एकदम हृदयक्रिया बंद होऊन मृत होऊन पडला होता !...

डॉक्टरांनीं प्रकाश दिवे लावले ! आणि समोर पहातात तों त्यांना केवळ निराधार वाटणारी आपली कल्पना पूर्ण यशस्वी झालेली दिसली ! तें पाहून त्यांना तर भयंकर धक्काच बसला !

त्यांना वाटलें, "झटका बसून...माणसें शास्त्रीय प्रयोगाच्या नांवाखालीं कल्पनेनेंच किती लौकर मरतात !...आपण एका माणसाचा अगदी जाणूनबुजून भयंकर खून केला ! हो, आपणच त्याचा खून केला !..."

आणि शेवटचें आश्चर्य म्हणजे ही भेसूर कल्पना त्या प्रेमळ डॉक्टरांच्या मेंदूवर इतक्या धडाक्यानें आपटली कीं...

त्या कैद्याचें प्रेत सरकारी नोकर लोक उचलून नेत असलेलें पाहून डॉक्टरहि बेशुद्ध होऊन धाडकन् जमिनीवर पडले !!

---

चिमुट सातवी

# कल्पनांचे काजवे

सहजासहजीं घडलेल्या गोष्टी !...पण त्या माझ्या आयुष्यांत त्या दिवशीं लागोपाठ घडल्या. त्यामुळेंच त्यानंतर घरीं येऊन इझीचेअरवर बसल्यावर माझ्या तोंडाप्रमाणेंच डोक्यालाहि भयंकर आग लागली. मानवी मनांतील कल्पनांविषयीं हजारों कल्पना डोक्यांत डोकावून गेल्या.

चार मंडळी जमली असतांना माझा तिसरा मित्र मी पेटवलेल्या एकाच काडीवर आपली सिगरेट पेटवूं लागतांच मी खूप धडपड धडपड करून ती विझवली होती. त्यामुळें तो तडफदार तरुण चिडला होता; मला 'बावळट, सनातनी, बुरसट' म्हणाला होता; मी त्यावर क्षणभर विचार केल्यावर मला वाटलं होतं-त्या धडपडीमागें माझ्या त्या मित्राविषयीचा माझा लोभ होता; त्याला धोका पोहोचूं नये ही माझी उत्कट इच्छा होती; माझ्या मनांत लहानपणापासूनच अभावितपणें रुजविल्यामुळें रुजन गेलेल्या 'इज्या-बिज्या-तिज्या,' 'तिखळें मूल,' 'तिसरेपणाची बायको' (रुईचं झाड) वगैरे अनेक समजुतींतलीच ती एक त्यावेळीं न कळत प्रकट झालेली कल्पना होती.-तरी पण त्यानें मात्र मला गाढव ठरविलें होतें.

मित्राच्या घरून बाहेर पडून माझ्या घराकडे परतणार, तों वाटेंत एका वळणावर समोरून येणाऱ्या एका तरुण मुलीला वाट करून देण्यासाठीं मी चारपांच वेळां तिच्याशी आट्यापाट्यांचा खेळ खेळलों होतों. पण तरीहि शेवटीं आम्ही एकमेकावर जोरानें आदळलों ते आदळलोंच. मला संकोच वाटला होता, अपराधी वाटलें होतें. मी 'क्षमा करा' म्हणालो होतो; पण तरीहि ती माझ्याकडे आपले डोळे मोठे करून, ते रागानें वटारून मागें पहात पहातच निघून गेली होती.

तिला मी मुद्दाम धक्का मारण्याइतकें बिचारीकडे सौंदर्यहि नव्हतं, हें विसरून ती एकदम रागावली; ही गोष्ट मात्र त्यावेळीं मी पटकन् विसरलों. मला त्या परिस्थितीबद्दल इतकें वाईट वाटलें तें एका दुसऱ्याच कारणानें...तिच्याबरोबर झालेल्या त्या आट्यापाट्याच्या प्रत्यक्ष खेळामागें व शेवटच्या अपघातामागें, दोघांच्या मनांतील प्रत्यक्ष परिस्थितीविषयींच्या आपापल्या प्रांजल कल्पनांचा आट्यापाट्यांचा खेळ चालला होता व त्यांत झालेल्या अपघातांतूनच तो खरा अपघात झाला होता—पण ती मात्र स्वतः एकट्यालाच प्रामाणिक समजत होती. तिच्या दृष्टीनें मी मवाली ठरलों होतो.

त्या माझ्या विद्वान मित्राच्या विधानांतील व या दुसऱ्या मूर्ख पोरीच्या डोळ्यांतील, अहंगंड, शिष्टपणा, सहानुभूतीचा अभाव, सर्व मला दिसलें म्हणून मी जरा या 'कल्पना व सत्यें' या विषयांत खेळकरपणें अधिक खोलात शिरलों.

आणि मग, आपल्याच कल्पनांत रंगून, मनुष्य पुष्कळदां कष्टी होतो, दुसऱ्याविषयीं गैरसमज करून घेतो, दुःख भोगतो, असें म्हणावयास मला पुष्कळच जागा वाटली. यामुळेंच सत्याकडे त्याचें दुर्लक्ष होतें. किंबहुना सत्य हें सुद्धां प्रत्येकाच्या निरनिराळ्या कल्पनेप्रमाणें कमी जास्त बदलतें स्वरुप धारण करतें, असें मला वाटलें!—



नेहमीचेच आपले अनुभव पहा! काळोखांत दोरी पाहून साप अशी कल्पना करून (त्याला मारण्याऐवजीं) बेशुद्ध पडणारे लोक सुसंस्कृत लोकांतही कितीतरी सांपडतात. बायकोनें मोठ्या आवडीनें आणि प्रयासानें जिन्नस करून अलंकृत केलेलें ताट कसल्या तरी क्षुल्लक कल्पनेनें भिरकावून देणारे तर किती असतील! पण तरीही ती 'पतिव्रता' ते 'नवरदेव' अशी कल्पना करून गुण्यागोविंदानें त्याच्याबरोबर आयुष्यभर जगतांना आपणाला आढळतें. आपल्या श्रीमंतीविषयींची लोकांची कल्पना कायम राहील या कल्पनेनें लग्नाचा मोठा 'बायबार' उडविणारे लोक शेवटीं कल्पनेंतच नव्हे तर प्रत्यक्ष कर्जबाजारी होतात. एखादा जीव जायला निघाला तर तो मरणाच्या कल्पनेनेंच मागें सरतो. मला तर वाटतें हल्लींच्या काळांत पुष्कळशीं माणसें रोगानें मरण्यापेक्षां मरणाच्या कल्पनेनेंच झटपट मरतात.

'मित्रांत मित्र लंगोटी मित्र' ही तरी कल्पना काय आहे?...या कल्पनेवरच दुसरा एक कल्पनावारु उभा करून, मुख्य प्रधान झालेल्या आपल्या लंगोटी मित्राकडे एखादा जन्मदरिद्री गेला तर तो एक दारांत आलेला भिकारी अशी कल्पना करून, त्या साहेबांच्या घरांतील शिपाईच बाहेरच्या बाहेर त्याला हांकलून नाहीं कां लावणार?...एखाद्याच्या घरीं वार लावून शिकलेला पोर पुढें सर्व दृष्टींनीं मोठा झाला आणि तो रस्त्यांतून आपल्या मोटारीतून या बुढ्याच्या पुढून जाऊं लागला तर "तो 'माधुकऱ्या' खालीं उतरून आपल्या पायावर डोकें टेकील" ही त्याची कल्पना आपल्या दृष्टीला हास्यास्पद वाटते; पण त्याप्रमाणें न घडून आल्यामुळें त्याला मात्र कितीतरी दुःख होतें!...तीच गोष्ट एखादा आय. सी. एस्. कलेक्टर 'श्री ग' चा धडा आपल्याकडून शिकला पण आता तो आपल्याला ओळखत नाहीं, अर्थात 'जग फिरलें', अशी कल्पना करून मनाला दुःख वाटून घेणाऱ्या अखंड विद्यादानच करणाऱ्या शाळा-

मास्तराची !...‘ आपल्या भोंवतालचीं राष्ट्रें आपल्याला त्रास देत आहेत, आपले न्याय्य हक्क पायमल्ली करीत आहेत’ या पिसाटपणाच्या मूळ कल्पने-वरच हिटलर देशामागून देश गिळंकृत करीत आहे नाहीं कां !......
“ अस्सल आर्यन ते आपणच ! त्यांच्यासाठींच देवानें जग निर्माण केलें आहे व त्यांचे दास्य करण्यासाठींच इतर आदमी पैदा झाले आहेत” या कल्पनेनेंच हिटलर किती दुःखी झाला आहे बिचारा ! आणि जगालाहि दुःख देत आहे पहा !—उलट, साऱ्या जगांत अहिंसा तेवढी आपल्या एकट्यालाच समजते अशी गांधींची तरी एक कल्पनाच नव्हे काय ?...त्या कल्पनेला पाठिंबा देणारा त्यांचा अंतर्ध्वनी तरी जोरदार कल्पनेशिवाय त्यांना कसा ऐकूं आला असता !... आणि आपण जागतिक लेखक आहोंत अशी कल्पना करून लिहिणारे आणि सुस्कारे सोडणारे मराठी लेखक काय थोडे सांपडतील आपल्यांत !—

अगदीं सामान्य माणसांत सुद्धां या न्याऱ्या मनोभूमिकेचे डॉन क्विक्झो सांपडतात !—“ गेले ते दिवस !” “ कल्कीचे घोडे नाचूं लागले ” असले उद्गार वेळीं अवेळीं पावलोपावलीं काढणारे हे दुर्दैवी प्राणी,...चिंतातुर जंतू ! आयुष्यांतील प्रत्यक्ष सुखांत लोळतानाहि, सुखांत सुख मानण्यापेक्षां काल्प-निक दुःखांतच अधिक सुख मानत,...ते वळवळत असतात !—आकाश कोस-ळून नाहींना पडणार ! समुद्राला आग नाहींना लागणार !—रहातें घर नाहींना अंगावर कोसळणार !—असल्या कल्पना यांच्या डोक्यांत वळवळं लागल्या तर आश्चर्य वाटायला नको !...

असलें कल्पनेंतलें सुखदुःख आपल्याला प्रत्यक्ष सुखदुःखापेक्षां जास्त जोरकस वाटतें. म्हणूनच आपण सामान्य माणसेंहि कमी जास्त प्रमाणांत कलावंत असतो, आपल्याला वाङ्मयाशीं एकरुप होऊन रसग्रहण करतां येतें !... आणि कलावंताला सामान्य माणसाच्याच आयुष्यांत कला आणि वाङ्मय यांना विषय सांपडतात !—



या कल्पनेंतील सुखद कल्पना किती प्रभावी असतात, त्या आप-ल्याला कशा वाहवून नेतात याचीं अनेक उदाहरणें आपल्या नित्याच्या आयुष्यांत आपल्याला आढळतील !...

साधी खाण्याचीच बाब घ्या ना ! सुरत किंवा कृष्णाकांठचीं वांगीं म्हणून उपनगरांतील कोणत्या तरी एका बागेंतील गांवठी वांग्याचीच भाजी आपण जास्त चवीक म्हणून खाल्ली असेल. थोडें खोलांत शिरलें तर ‘ सुरतेची बर्फी ’ ‘ कोल्हापुरी चिवडा ’ ‘ भानवनगरी गाठ्या ’ ‘ सातारी पेढे ’ वगैरे कांहीं मुंबईंत जाहीर होऊन विकले जाणारे जिन्नस क्वचित् मुंबईंत तयार झाल्याचें आपल्याला आढळेल !—‘ व्हिटॅमिन ’च्या तत्वावर ‘ आरोग्य संवर्धक भुवनां ’तील वांग्याच्या कांटेरी देंठांची, मुई-मुगाच्या दाण्याच्या सालांची किंवा फ्लावरच्या पात्याची कोशिंबीरहि आपण रोख पैसे मोजून कितीदां खाल्ली असेल !—‘ फोलपटांचा चिवडा ’ ‘ ताकाची भाजी ’ असले नवलपूर्ण पदार्थ आपल्याला खावयास घालून आपल्या घरांतील साध्वी स्त्रियांनीं आपल्याला कितीदां तरी बनविलें असेल !—पुण्यशील स्त्रियांना पुण्य मिळवून देणारी, बैलाच्या श्रमाशिवाय निर्माण झाल्याची खात्री करून त्यांच्या पतिदेवांनीच आणून दिलेली मुंबईंतील ऋषिपंचमीची भाजी म्हणजे तरी एक कल्पनाच नव्हे कां !... शेजारच्या घरची वानगी म्हणून आलेली वाटीभर भाजी एका मिनिटांत मिटक्या मारीत मारीत फन्ना होऊन जाते. याचा अनुभव कुणाला नाहीं बरं !...

मला तरी वाटतें या व असल्या सुखद गोष्टींत सत्यापेक्षां कल्प-नेलाच जास्त वांव असतो.

आणि मग, ‘ भ्रामक समजुती ’ म्हणून आपण म्हणतों त्या म्हणजे तरी काय !—सुखासाठीं आपण ठरवलेल्या कल्पनाच ना त्या !...

मांजर आडवें गेलें म्हणून परत फिरणाऱ्या माणसाला आपण हंसतों;

पण उलट एखादा प्राणी बिचारा चौघांच्या खांद्यावरून लांब प्रवासाला निघाला असतां वाटेंत भेटला, तर त्याच्या बरोबरच्या मंडळीच्या दुःखा. पेक्षां 'आपलें काम हटकून यशस्वी होणार' या कल्पनेनें दुसरा एखादा मनांतल्या मनांत सहजासहजीं आनंदतोच कीं नाहीं?...(घड्याळाचा शोध जरी अलिकडील असला तरी) घड्याळाच्या ठोक्यावर अगर पडसें आलेल्या किंवा नवीन तपकीर ओढूं लागणाऱ्या माणसाच्याहि) शिंकेच्या आधारावर आपल्या बोलण्यांतील सत्य आपण बोलता बोलतां प्रस्थापित करतों तें कां?...हिंदु माणसातील भ्रष्टांतील भ्रष्ट देखील रस्त्यानें गाय चालली असतां तिला थाप मारील व मग आपल्या छातीला हात लावील. आपल्या त्या हालचालींचें त्याला त्यावेळीं कांहींच तर्कशुद्ध समर्थन करतां येणार नाहीं. कारण त्याच्या मनांत शतकानुशतकें पडून असलेली पावित्र्याची, पुण्याची कल्पना त्याच्या युक्तीवादावर विरजण पाडून ते गमतीचे खेळ त्याच्याकडून तसे करवीत असते.

या झाल्या जुन्या प्रकारच्या भ्रामक समजुती!—

आणि काळ बदलला, समजुती बदलल्या, नव्या शास्त्रीय आल्या तरी मानवी मनाच्या काल्पनिक सुखाच्या कल्पना धिंगाणा घालायच्या रहात आहेत थोडयाच?......चालूं जमान्याप्रमाणें प्रगट होण्याचे मार्ग भिन्न (शास्त्रीय?) असतील, एवढेच काय तें!--

गांवांत सांथ आली, कॉलरा, देवीसारखे रोग फैलावूं लागले कीं आपण प्रथम काय करतो?...'इंजेक्शनें' 'इनॅक्युलेशनें' यांचा सावळा-गोंधळ माजविण्यामागें कांहीं मर्यादेपर्यंत शास्त्रीय बाजू असली तरी तो कल्पनांचाच खेळ नाहीं कां?...मला तर वाटतें, डॉ. चें औषध म्हणजे देखील एक कल्पनाच होय. कारण, आपला विश्वास असलेल्या डॉक्टरा-कडून पाणी व साखर यांच्या मिश्रणानें केलेलें औषध घेऊन बरेच दिवस आजारी असलेले रोगी आठपंधरा दिवसांत साफ बरे झाल्याचे दाखले



माझ्या अगदीं पहाण्यांत आहेत. कडू औषध तरी वांकडें तोंड करून आपण का घेतो?...आणि जिवंत शरीर तरी डॉक्टरकडून आपण कापून घेतो तें कां?—

या नवीन प्रकारच्या लोकभ्रमाचा मोठा उत्तम नमुना आपल्याला हल्लीं घडीघडीं पहावयास मिळतो! एखादा इन्शुरन्स एजंट भेटला तर तो तुम्हांला त्याच्या कंपनीच्या निरनिराळ्या सोयींच्या 'पॉलिस्या' समजावून सांगेल. त्यापेक्षांही जास्त त्याच्या कंपनीच्या घड्याळाच्या काटकसरी योजनेची तुम्हांला तो फुकटांत माहिती देईल व पुढें म्हणेल, "आणा टाकल्याशिवाय हें घडयाळ चालणार नाहीं व त्यामुळेंच तुमची पॉलिसी पुढें चालूं राहील." आपल्याला त्याची ती चर्पटपंजरी अगदी खूप पटली तरी त्या घड्याळाला आपण सकाळी उठल्यावर अगदी देव्हाऱ्यांतील देवासारखा नमस्कार तर करणार नसतो ना?—आणि तें वर्षभर साफ बंद राहिलें तरी आपल्या नित्याच्या व्यवहारांना कांहीं आळा बसणार असतो थोडाच?—तेव्हां ओघानेंच तसली 'कल्पनेची पॉलिसी' मध्येंच बंद पडली तर त्यांत त्या बिचाऱ्या निर्जीव घडयाळाचा काय दोष?...

अलीकडे अलिगड हें गांव तर हिंदुस्थानांत अजरामर होऊं पहात आहे. त्यांत 'करामती आरसे' होतात. 'कवचें' होतात. 'अस्त्रें' होतात. 'वशिकरण यंत्रें' होतात!...एवढेंच काय?...पण 'वाटेल त्या प्रकारची कांच एकाच क्षणांत सुलभतेनें कापणारे' (अकरा आण्याच्या टपालहांशिलांत तीनशें फुकट वस्तूही घरपोंच मोफत आणून देणारे) 'कांच कापण्याचें पेनही' तेथें तयार होतें!!...कांहीं व्यापारी मंडळी तर एका मलमाच्या डबीसाठीं एक रिस्टवॉच बक्षिस देतात. या जाहिराती पुष्कळ असतात व या जाहिराती लेखकांच्या पुस्तकाच्या जाहिरातीप्रमाणें फुकट छापल्या जात नाहींत. ओघानेंच, जाहिरातींत जाड टाइपांत हमी दिल्याप्रमाणें, केवळ पैसे परतच घेणाऱ्या गिऱ्हाइकांची संख्या हिंदुस्थानांत फारशी नसावी असा उघड निर्णय निघतो!

मग कल्पनेचें यशस्वी गंडे घालणारे व घालून घेणारे लोक किती आहेत याची आतां कल्पनाच करा बरं!—

पण मग, आजच्या काळांत तर आपल्याला कल्पनेचा आश्रय घेतल्याशिवाय सुखानें जगतांच येणार नाहीं. नळावर आंघोळ करून संध्या करणारा, आपण नदीवर उभे राहून संध्या करीत आहोंत अशी कल्पना करूनच समाधान मानून घेऊं शकतो. मुंबईत सायकलवर बसणाऱ्या माणसाला आपण घोड्यावर स्वार झालों असल्याची कल्पना करावी लागते. तो प्रत्यक्ष घोड्यावर बसून जाऊं लागला, तर त्याला उंटावरचा शहाणा म्हणतील. मोटारी या आजच्या जगांतलि शृंगारलेले रथ आहेत. आगगाडीला 'अग्निरथ' म्हणणाऱ्या कल्पक प्राण्याच्या डोक्यांत हीच कल्पना होती. सिनेमाच्या वेळीं चार आण्याच्या तिकिटासाठीं होणारी झटापट हीच आमची हिंदुस्थानी लढाई! हातावर तारांचे ओरखडे आले कीं आपण जखमी वीर आहोंत अशी कल्पना नेहमी करावी. होळींत शेणामातीचे गोळे फेकताना बाँब गोळ्यांची आठवण करावी! दुसऱ्याचा पास वापरतांना किंवा 'विदाऊट तिकिट' लहान लहान प्रवास करतांना आपण शिवाजीमहाराजांचा चढाऊ गनिमी कावा अवलंबित असल्याची कल्पना करावी. केशवकुमारांचे 'मनाचे श्लोक' वाचून आपल्याला 'फिफ्थ-कॉलम ॲक्टिव्हिटी'चे चांगले धडे मिळतील! मुंबईतलि आपल्या चाळींतील खुराड्याच्या पुढल्या खोलीला आपण दिवाणखाना कल्पावा; स्वयंपाकघराला आपण बहुरुपी रंगमहाल म्हणावें. कोणतीही टोलेजंग इमारत दिसली किंवा भुर्रकन् वेगानें धांवणारी एखादी सुंदर मोटार दिसली कीं ती आपलीच आहे, ते ते लोक सध्यां त्या वापरीत आहेत व आपण त्यांच्याकडे आपल्या सोयीसाठींच त्या दिल्या आहेत अशी कल्पना करावी. नाहींतर जन्मांत आपल्याला त्यांचा लाभ कल्पनेंतसुद्धां होणार नाहीं!—

आणि सामान्य लोकांना असल्या अफाट असामान्य कल्पना आवडतात म्हणूनच कवी लोकांचें फावतें. 'मी सकाळीं उठलों' एवढीच गोष्ट, 'पृथ्वी चंद्र सूर्य ताऱ्यांना पुष्कळ प्रकारानें लोळवून व आळवून सांगणारे कवी अगर लेखक, साध्या परिचित कल्पना, भावना, प्रसंग,...साध्या व परिचित भाषेत मांडणाऱ्या कलावंतांपेक्षां मध्यम वाचकाला जास्त प्रिय होतात याचेंही कारण हेंच!



या थोटक्या जगांत आतां सारें थोटकेंच होऊं लागलें आहे. काठीनें तलवारीची जागा घेतली आहे. कालांतरानें काठीची लांबी सुद्धां लहान लहान होत शेवटीं हातातील पेटता चिरुट म्हणजेच काठी व ओघानेच ती तलवार अशी कल्पना करीत सुखानें जाणारे प्राणी पुढें मागें दिसूं लागतील असें म्हणावयास कसलीच हरकत नाहीं.

कल्पनेनें वस्तुस्थितींत सुख निर्माण करण्याचीं आणखीही कित्येक उदाहरणें देतां येतील.

पण आपल्या भोंवतालच्या वस्तुस्थितींतच कल्पना किती आहेत?... आपल्या मनांतील अनेक सुखद ग्रह म्हणजे कल्पनाच होत!—

प्रेम म्हणजे काय?......प्रेमाविषयाविषयीं केलेल्या (पण प्रत्यक्ष अस्तित्वांत नसलेल्या) साऱ्या सुखद कल्पनांच्या संमेलनाची कल्पना म्हणजेच प्रेम नव्हे कां?...किंवा त्याहूनही उत्कट व चिरस्थायी प्रेम असलें तर त्याचा अर्थ आपल्या प्रेमविषयाच्या तोडीचें जगांत तसं दुसरें काहींच नाहीं अगर प्रेमविषय आपणाला केव्हातरी एकदम पारखा होईल, ही कल्पनाच नव्हे कां?...

सहानुभूति म्हणजे तरी काय?...सुखी अगर दुःखी असलेल्या दुसऱ्या माणसाच्या ठिकाणीं आपण तितक्याच उत्कटतेनें असल्याची कल्पना. 'देव पाप करील' असें म्हणणारा मुलगा, "आपल्याला समजत नाहीं व आईबाप आणि भोंवतालची मंडळी यांना जें पटत नाहीं, तेंच पाप!" अशी कल्पना करीत असतो; पण 'मोठीं माणसें' तरी कोठें

याला अपवाद असतात? आपल्या भोंवतालच्या चारचौघांच्या विरुद्ध जें असेल त्यालाच ती पाप म्हणतात. पुण्याची अगर स्वर्गाची कल्पना जगांत नसती तर साऱ्या आयुष्यभर दुःखानें गांजलेले लोक, त्यांना हल्लीं कल्पनेनें वाटणाऱ्या पापाचे डोंगरच्या डोंगरहि उभे करण्यास कमी करते ना!–एखाद्या प्रिय माणसाच्या मृत्युचें दुःख म्हणजे काय?...आपल्याला तो पुन्हा कधीही भेटणार नाहीं हीच कल्पना! तो चार आठ वर्षें त्याच्या सुखाकरितां कां होईना–परदेशांत जाऊन राहिला तर त्याचें नाहीं आपल्याला दुःख होत.

कोणीसें म्हटलें आहे, माणसाचें मन म्हणजे एक मोठी रंगभूमी आहे. त्यांत प्रत्येक क्षणाला एकेक याप्रमाणें लाखों पात्रें अवतीर्ण होतात, आपलें काम वठवितात व कायमचीं नाहीशीं होतात, आणि अगदी आजच्या घटकेची 'थीअरी' (अर्थात कल्पना!) आपल्याला सांगते कीं एकाच माणसांत दोन माणसें वावरत असतात. त्यांतील एक प्रत्यक्ष जगाच्या लाखों बंधनांनीं आणि नियमांनी जखडलेला असतो. दुसरा अगदी अनियंत्रित असतो. त्याच्यावर त्या व्यक्तीचाही ताबा चालत नाहीं. त्याला या बाहेरील जगानें बंधवून ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तें शक्य नसतें. त्यामुळें केवळ स्वप्नसृष्टींतच दुसऱ्या अनियंत्रित व्यक्तीमुळें सवाई बंधनानें जखडलेली ती पहिली व्यक्ति जगांत जगूं शकते. समाधान मानूं शकते.

लेखक कद्रु असतात. कुरूप असतात. दुबळे असतात. भुकेकंगाल असतात. पण तरी देखील ते वाङ्मयांतील प्रतिसृष्टी निर्माण करतात!–या कल्पनाच त्यांना प्रत्यक्ष न मिळणारें समाधान सुख मिळवून देतात. त्यावरच ते जगूं शकतात!—

एवढें असलें तरी दुसऱ्याच क्षणीं प्रत्यक्ष जगांत वावरतांना त्यांना क्षुद्र बाबतींतही दुःखद कल्पना भंडावून सोडल्यावांचून रहात नाहीं!—



आतां हें माझेंच पहा ना!–वरचीं वाक्यें मीं लिहिलीं; आणि एक उसासा टाकल्यानंतर पटकन् वाटलें, 'छान्!–येथेंच लिहून संपवावें!'—

पण मग त्या पुढली एक दुःखद कल्पना मला याक्षणीं भंडावून सोडीत आहे.

आतांच कोट टोपी घालून मला बाहेर जावयाचें आहे. पण माझें धोतर अगदीं गुडघ्यावरच फाटलें आहे. आमच्या हजाम धोब्यानें इस्त्रीच्या करामतीनें माझ्या कोटाचा बाहेरचा डावा खिसा अर्धा अधिक लोंबकळत ठेवला आहे, व रोलकॉलवर रूळ फिरवितांना तिच्या दशा काढून तिची दशा केली आहे! लिहितां लिहितां सदऱ्याचें मधलें एक बटन ठणकन् कुठें उडालें आहे कुणास ठाऊक!...खूप शोधलें पण कांहीं सांपडत नाहीं. टोपीला तर पन्नास पोचे आले आहेत....

मला नक्की वाटतें कीं या असल्या अवतारांत मी बाहेर पडलों तर लोक माझ्याकडे पाहून फिदीफिदी हसतील–आतां लोकांमध्येंच तुमचीहि गणना होते म्हणून तुम्हांला अगदी खाजगी प्रश्न विचारतों. "तुम्ही खरोखरच माझ्या या पोषाखाच्या साऱ्या तपशीलाकडे मला वाटत आहे तसें टवकारून पहाणार आहांत कां?"...

कीं ही देखील माझी नुसती कल्पनाच?...आणि त्या कल्पनेवर विसंबून मी तुमच्याविषयीं उगीच माझी भलतीच कल्पना करून घेत आहे??......

चिमुट आठवी

# मी व कांहीं नाणीं

व्हिक्टोरिया राणीला आमचे लोक इतक्या लौकर कसे विसरले याचा मी काल विचार करीत होतों. त्यांत माझ्या दोन प्रकारच्या मूर्ख-पणाची भर पडली होती......

त्याक्षणीं माझे आंतले दोन्ही खिसे रोख नाण्यांनीं भरले होते. आणि त्यांत चार पांच तरी व्हिक्टोरिया होत्या.

सुरवात मोठी गमतीनेंच झाली होती!—

एक आणा सुटा व बऱ्याच नोटा खिशांत घेऊन मी ठाकुरद्वारला घाई घाईनें ट्राममध्यें सहा नंबर पाहून—शिरलों. गर्दी मी म्हणत होतो. पण मी चामडयांत मढवलेल्या दाराच्या दोन सांखळयांतून मान वांकवून शिरलों. मागल्या बाजूच्या उभ्या गर्दीत इतरांच्या हालचालींप्रमाणें पुढें मागें होत मी बंद यंत्राजवळची ड्रायव्हरच्या पायाखालची चालू घंटा खणखणवीत होतों! तोंपर्यंत मागच्याच बाकावर जागा झाली नी मी आंत जाऊन बसलों.



मॅजेस्टिक सिनेमाजवळ गर्दी उतरून गेल्यावर कट्कट् करीत कंड-क्टर माझ्या अंगावरून जाऊं लागला. त्यानें न विचारतांच मी खिशांत हात घालीत म्हणालें, "दादर"!...तो किंचित् थांबून म्हणाला, "किधर बैठे साब, आप?"...त्याची माझी ओळख नव्हती; त्यानें मला बस-तांनाहि पाहिलें नव्हतें. त्यामुळें मी गोंधळलों तरी त्याच्या प्रश्नाचा रोख पटकन् लक्ष्यांत न येतां मी सत्यवक्तेपणानें म्हणालों, "ठाकुरद्वार!"

तो हात पुढे करून म्हणाला "देढ आना:"

मोठी पंचाइत आली...दहा दहाच्या नोटा बाहेर काढत मी म्हणालो, 'छूटाऽऽ'...आणि त्यानें वाक्य पुरें केलें— 'नहीं'......

दीड दोन मिनिटांत शेजाऱ्याला माझ्या गोंधळी हालचालींची दया आली...त्यानें पांचा पांचाच्या दोन नोटा पुढे केल्या. कंडक्टरनें तरी पुन्हा माझ्या तोंडाकडे पाहिलें:—तेवढ्यांत दुसऱ्या एकानें त्यांतली एक नोट घेऊन तीन रुपये नी रुपयाच्या दोन नोटा माझ्या हातीं दिल्या.

तेव्हां मग कुठें मला दीड आण्याचे तिकिट नी साडे चौदा आणे परत मिळाले!—

सहा मिनिटें या गोंधळांत गेली होती. चर्नीरोड जंक्शनजवळ तो पांच रुपये सुटे देणारा उतरला तेव्हां मोठ्या कृतज्ञतेनें मी त्याच्याकडे पाहिलें. आणि त्याच विचाराने हसत हसत बारक्या खिशांतील सगळीं नाणीं बाहेर काढून मी मोजूं लागलों.

केवढा धक्का बसला मला :—

त्या नाण्यांत दोन व्हिक्टोरिया होत्या. त्यांतील एक तर अगदीं काळी कुळकुळीत.

झालें! दादरला उतरतांच मला नवाच चाळा लागला. तीन दुकानांत मी चहा घेतला. व काळी व्हिक्टोरिया पुढें केली. पण तिन्ही

ठिकाणीं माझ्याबद्दल व राणीबद्दल अनादर व्यक्त केला गेला. मी चिडलो होतो.... आम्ही नाणी घरीं तयार करत नसण्याचें प्रवचन करून पाहिलें... पण त्यांना त्या माहितीची मुळींच गरज नसल्याचें आढळलें.

खरें काम बाजूला टाकून मी मोठ्या चुरशीनें निरनिराळ्या मालाच्या दुकानांत निरनिराळ्या प्रकारचे माल खरेदी केले. आणि प्रत्येक ठिकाणीं बाकीचे रुपये जात जात माझ्या नवीन नोटा मात्र मोडल्या काळ्या व्हिक्टोरियाची दाद कोणीच घेईना....

शेवटीं, 'आपलें कांही तरी चुकत तर नाहीं ना?' असा विचार माझ्या डोक्यांत शिरायला माझा रोख नाण्यांनीं खचून भरलेला आंतला जड खिसाच कारण झाला!... नाहीतर त्या दिवशीं नादारीचा अर्जच करावा लागला असता!...

आपलें काय चुकत आहे हें यावेळीं नीट लक्षपूर्वक पहावें या स्तुत्य हेतुनेच मी पुन्हां एका नव्या दुकानांत शिरलों. सव्वा रुपयाचें एक मला नको असलेलें पेन विकत घेऊन मी पैसे द्यायला बाहेर काढले. चार आणे सुटे व ती बंद काळी व्हिक्टोरिया समोरील काउंटरवर ठेऊन मी पटकन् म्हणाल्याचें मला आढळलें, "बघा हो मिस्टर, हा रुपया चालेल कां?... दहा-बारा लोकांनीं उगीच परत केला म्हणून विचारलं! मूर्ख बेटे, आम्ही काय घरीं करतों?..."

तो दुकानदार हसला! पण त्यानेंहि तो रुपाया पुन्हां माझ्यापुढे करीत म्हटले, "तें खरं हो!... पण मग दुसरा असेल तोच द्याना साहेब! उगीच काउंटरवर मग गोंधळ होतो कधींतरी..."

आणि मग मलाहि त्याच्या आदबशीर शब्दांमुळें त्याचें मन मोडावेसें वाटेना... दुसरा एक अडतीस सालचा रुपाया त्याला देऊन मी मुकाट्यानेंच बाहेर पडलों.

माझी 'घोषणा पद्धति' माझ्या लक्षात येतांच मला क्षणभर



...मकल्यासारखं झालं... मला वाटलं 'मुकाट्यानें करावयाचं ते करणारे ...ष्कळ असतात!' आणि शेजारच्या हॉटेलांत नळीनें नारिंगी पीत पीत ...ी खिशांतलीं सगळीं नाणी बाहेर काढून पाहूं लागलों... तपासणीमुळें ...ी आणखीच गोंधळलो.

खोट्याबद्दल प्रामाणिकपणें खरा पुकार करत मी त्या संध्याकाळीं ...ा पांच दहाच्या मिळून तीनचार नोटा मोडल्या होत्या, त्यांच्या ...कंदर गल्लयांत आतां ती एकटीच काळी व्हिक्टोरिया नव्हती. तिच्या ...डीला निमूटपणें आणखी तिघीं बया येऊन राहिल्या होत्या. एका ...धेलीला राजाच्या मुकुटाशेजारीं खड्डा पडला होता. एका चवलीच्या ...ोळ्या कडेला करकोचे नव्हते. आणि चार पांच आणेल्या चोळपट्टून ...ल्या पत्र्याच्या तुकड्यांसारख्या झाल्या होत्या!

ज्या मला एका नाण्याची व्यवस्था दीड तास धडपडून करतां ...ली नाही त्याच माझ्याकडे तेवढ्याच वेळांत दुसऱ्यांनीं सात आठ ...णीं न बोलता माहेरच्या पाठवणीला पाठावेलीं होतीं! माझ्या प्रामाणिक-...ाचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग होईल ही कल्पना असती ...र मी सुरवातीलाच दीड आण्याचें प्रामाणिक 'ठाकुरद्वार-दादर ट्राम-...किट' काढण्याऐवजी सुटी आणेलीच पुढे करून गिरगांवांत "दादर" ...से मोघम म्हणालों असतों.

पण नोट मोडून दादरचें तिकिट मी प्रामाणिकपणें काढण्यांत, या ...ातलें ठाण्याचें तिकिट काढल्यासारखे झालें होतें!... आणि म्हणूनच ...्या, नकट्या, पेंकाट आलेल्या, व्यंगें असलेल्या नाण्यांचें मी ब्रिटिश ...ूझिअम झालों होतों!...

---

चिमूट नववी

# खिसा खालीं !

आणखी कांहीं तरी नाविन्यपूर्ण व चातुर्याचें लिहावें या हेतूनें बैठक मारली; पण छेः ! जंगजंग पछाडलें तरी तसें कांहीं लिहायची स्फूर्तीच नाहीं होत यावेळीं !

फक्त एक गोष्ट मला आठवते आहे... अगदीं तीव्रपणें भासत आहे या क्षणीं !...आणि ती म्हणजे टंचाई !...हो...अगदीं खिसा खालीं !

मला वाटतें, बसतां बसतां मी पायजम्याच्या खिशात हात घातले ( शिंप्याला नेहमीं मी दोन खिसे करण्याची ताकीद देतो ), म्हणूनच तो विषय माझ्या मनांत आला !...

मी बहुतेक नेहमींच तसा खिशांत हात घालून बसतो म्हणा. माझी कांहीं विक्षिप्त स्नेही मंडळी जवळ असली तर मात्र मी तें टाळतों. कारण या गोष्टीचा सारी मंडळी काय बाऊ करते नुसता ! एकेकाचं हें भलं लेक्चर !

आणि त्यांच्या म्हणण्याचं तात्पर्य तरी काय !... तर तें म्हणे



असभ्य दिसतें !... अरे पण कां !... तें मला तरी डोकें खाजवूनही समजत नाहीं !... आपले हात दुसऱ्याच्या खिशांत घालणें हें एकवळ असभ्यपणाचें मानलें जाईल ( हो, विशेषतः दुसऱ्या लोकांकडून तरी ! ) पण असंच आहे, तसंच आहे, म्हणून नाकें मुरडणाऱ्या माझ्या शिष्ट स्नेहीमंडळीनो, अरे, आपण आपल्याच खिशांत हात घातला तरीही आपण असभ्यच गणले जाऊं म्हणतां ? जुलूमच आहे !

पण असेलहि कदाचित् त्यांचें खरें !... खिशांत हात घालण्या-बद्दल अव्वाच्या सव्वा कुरकुरणारीं माणसें मी पुष्कळ पाहिलीं आहेत. पण एक गोष्ट मात्र !— त्यांतलें बहुतेक म्हातारबुवा असतात ! म्हणजे असा एक सावधगीरीचा सामान्य नियम धरून चालावयास तरी कांहीं हरकत नाहीं !... आम्हां तरुण मंडळींना तर खिशांत हात घालून चालण्याशिवाय अगदीं चैनच पडणार नाहीं बघा !... सर्कशींतल्या विदुषकानें आपली लंबी टोपी जणूं विसरूनच यावें, तसें अगदीं चुकल्या चुकल्यासारखें वाटेल !—

पण तेंच एका खिशांत आण्यापैशांचा खुर्दा असावा, दुसऱ्या खिशांत ( कधींहि न वापरायच्या ) किल्ल्यांचा घोंस असावा आणि आमचे हात विजारीच्या खिशांत असावेत—मग अगदीं एखाद्या तडफदार खिश्चन टायपिस्ट बाईलाहि बोलतांना तोंड द्यावयास आम्ही तयार होऊं.

पण खिशांत दुसरें कांहींच नसलें तर नुसता हात घालून तरी काय करायचें ?...हो, खरंच ! हा एक जरा बिकटच प्रश्न आहे !

कांहीं वर्षे झालीं त्या गोष्टीला. त्यावेळीं पुष्कळदां माझें सारेंच भांडवल जेमतेम हातातोंडाच्या मारामारीपर्यंत येऊन पोहोंचे ! अशा वेळीं एक आणा एखाद्या दुकानांत टाकून त्याची मी मुद्दाम खुळखुळी मोड घ्यावी. कारण पहा, बंदी अधेलीच खिशांत असल्यावर वाटते तितकी टंचाई सात आण्याचा खुर्दा जरी खिशांत असला तरी भासत

नाहीं !... मोठे लोक ज्याच्याकडे तुच्छतेनें पाहतात, असा एकादा द्रव्यहीन पोरका पोरगाच जर मी असतो, तर मी खिशांतला एक आणा मोडून चार पैसे मिळाले नाहींत तर निदान दोन ढब्बू तरी हस्तगत केले असते !

पण 'पैशाची टंचाई' या विषयावर मीहि अगदीं अधिकारवाणीनें बोलूं शकतों बरं का !... कारण मी एक मराठी लेखक आहें. हिंदुस्तानातला मास्तर आहें. याशिवाय आणखी कोणत्या प्रकारें माझी या बाबतींतील योग्यता सिद्ध करण्याची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं !...

वर्तमानपत्राच्या धंद्याशीं संबंध असलेला एक सद्‌गृहस्थ... पुन्हां शाळा-मास्तर... एवढा बचावाचा दुहेरी पुरावा पुष्कळ झाला मला वाटतं ! वीस रुपये महिन्याच्या बजेटावर मी मुंबईत पूर्वी जगलों आहे. नुसत्या बुरणुसावरहि पंधरा पंधरा दिवस मला शीरसलामत घालवता आले आहेत.

पण मला आतां वाटतें, घरखर्चात खरी काटकसर कशी करावी याचा चांगला धडा मिळवायला, आपला आंतला खिसा खालीं—खरोखरच अगदीं रिकामा व्हायला पाहिजे.

एक प्रयोग म्हणून जरा वीस पंचवीस रुपयांतच सारें महिन्याचें भागवावयाचें एकदां ठरवा, आणि मग पहा कपडे आणि करमणूकीचे कार्यक्रम आपल्याला कितीसे झेपतील ते ! गर्दीच्या दुकानांत तीन दिडक्यां-ऐवजीं आणा टाकून तुम्ही जाणार नाहीं... बस् तर सोडाच ! पण ट्रॅम-कडेहि न पहातां एक आण्यासाठीं ऑफिसमधून, तुम्ही गिरगांवपर्यंत चालत जाल. इराण्याकडील थंडा नारिंग कधींतरी विशेष प्रसंगींच चाखण्यासारखें असतें असें तुमच्या दूरदृष्टीला वाटूं लागेल,— आणि इस्त्रीशिवाय सदरा घालतां येतो असा तुम्हाला नवा शोध लागेल !



तुम्हाला धूम्रपानाची सवय असली तर पहिल्या तारखेला 'प्लेअर' घाबरत घाबरत ओढाल. दुसऱ्या दिवशीं 'गिनीगोल्ड'ची क्वॉलिटी 'प्लेअर' पेक्षां चांगली असते असें तुम्हांला वाटेल व नंतर दिडकीला दहावाल्या हिरव्या धाग्याच्या विड्याच 'खोकल्याला साफ' असतात असें ठरवून प्रथम प्रथम आपल्या खोलीच्या दाराची कडी लावायचें न विसरतां ओढूं लागाल !... शेवटीं पान तंबाखू व गारगोटी चकमकीचे तयार केलेले डबे बायकांच्या पर्स प्रमाणें हातांत घेऊन फिरूं लागलां नाहींत म्हणजे मिळविली मी म्हणेन !

कुमारांनों, लग्न होण्यापूर्वी तरी याचा एकदा अनुभव घ्याच बुवा ! त्यांत मागाहून मौज वाटेल तुम्हांला ! आणि माझ्या वयस्क मित्रानों, कॉलेजांत पाठविण्यापूर्वी तुमच्या मुलाला घेऊं द्याना एकदा असला अनुभव ! मग वर्षासाठीं आठशें-हजार रुपये तुम्ही पाठवूनही पैशासाठीं चालणारी सर्वसाधारण कुरकुर तो करणार नाहीं !...

मला वाटतें, आमच्या वरच्या वर्गांतील अगदीं बऱ्याच मंडळींनां याचा फार उपयोग होईल. हे कोमल जातीचे मवाळ पांढरपेशे अमुक तऱ्हेच्या बारक्या तांदळांचा भात असल्याविना ताटाला हात लावणार नाहींत. वरण-भाताच्या साध्या बेताला ते नाकेंच मुरडतील ! फार काय ? चार दिवसांच्या उथळ मॅट्रीक परीक्षेसाठीं मुंबईस जाणारा याचा मुलगा थेट सरदारगृहांत जाऊन उतरेल !

पण यांत आश्चर्य वाटायला नको कांहीं ! अनेक वेळां असलीं माणसें आपल्यांतच सापडतील. कदाचित् ते तुम्हीआम्हीच असूं शकूं ! मला वाटतें, अशा व्यक्तींचें वाङ्मयांतील स्थान, कुशल वर्णन करणाऱ्या, गुलगुलीत शब्द वापरणाऱ्या भपकेबाज लेखकांच्या किंवा स्त्री लेखिकांच्या कादंबऱ्यांतूनच जास्त फिट्ट बसेल ! हॉटेलींतल्या पदार्थांच्या यादीला चिकटून असलेल्या त्यांच्या समोरील किंमतीच्या आंकड्याकडे या

प्राण्यांपैकीं एकाद्याचेंहि लक्ष जात असेलसें मला वाटत नाहीं !

अशा वेळीं, एक अगदीं वेडपट कल्पना माझ्या डोक्यांत चमकून जाते! यांच्यापैकीं एखाद्याला अलगद उचलावें अन् लॅमिंग्टन रोडवरील कुळकर्ण्यांच्या किंवा लक्ष्मीविलास हॉटेलमध्यें नेऊन त्याच्या घशाखालीं "एक मूद भात–एक चपाती–भाजी–आमटी–चटणी"ची दोन आणे प्लेट बळजबरीनें उतरवावी. असल्या प्रकाराचा त्यांना असा अकस्मात् मिळालेला अपरिचित अनुभव त्यांच्या आठवणींत राहून, मग त्यापुढें तरी, समोर आलेल्या प्रत्येक गोष्टीकडे पाहून नाक मुरडण्याची त्यांची हिणकस खोड निघून जाईल !...

याच महाभागांपैकीं, दुसरी एक बडी जात आहे. त्यांच्या नुसत्या दर्शनानेंच भिकाऱ्यांना कोण आनंद होतो! उघडच आहे. आपल्याजवळ असलेली सारी चिल्लर ते सढळ हातानें त्यांना वाटत फिरतात! ही गोष्ट अगदीं शंभर टक्के खरी! पण मग स्वतांचें मोठें कर्ज फेडण्याचा प्रश्न आला कीं......जाऊं द्या !–त्याची उगीच वाच्यता कशाला आपल्याला ?

यांचे तिसरे कांहीं जातभाई बड्या धेंडांच्या घोळक्यांत, त्यांच्या मागें मागें फिरतात. 'मॅनर' 'एटिकेट' असले शब्द तोंडपाठ करतात. हे प्राणी रीगलला गेले तरी सव्वा रुपयाचें तिकीट काढतील; इंटरव्हलमध्यें इराण्याचें तीन पैशाचें लेमन, 'फाऊंटनवर' साडेतीन आण्यांला घेतील आणि वेटरच्या 'डिश'मध्यें बंदी अधेली टाकून परत आपल्या खुर्चीकडे दिमाखानें वळतील! आणखी तीन दिवसांनंतर मात्र चार आण्यांसाठीं किती लोकांना त्रास देणार असतील कोणास ठाऊक !

मला वाटतें असल्या सद्गृहस्थांनाही माझा वरला उपाय, कदाचित ताळ्यावर आणूं शकेल !–

"मी नेहमी वेटरला एक अधेली देतों. त्यापेशां त्याला कमी देणेंच शक्य नसतें." असें बापाच्या मोटारींतून फिरणाऱ्या एका कॉलेजिएटाबरो-



बर त्याच्या आग्रहावरून मी 'मॉगिनी'त त्या दिवशीं बसलों असतां तो मला म्हणाला, "आठ आण्यांत एक दिडकीहि कमी करतां येणार नाहीं, एखाद्या सभ्य माणसाला !–" "अगदीं खरेंच तें !" असें मीहि त्याला मनांतील राग तसाच दडपून वरवर हंसत म्हणालों त्यावेळीं !

पण त्याच वेळीं मी मनांत एकदम ठरविलें कीं, या बेट्याला एक दिवस फसवायचं, आणि ग्रँटरोडजवळ माझ्या माहितीचें एक गोंयकर खिश्चनचें हॉटेल आहे, त्यांत न्यायचंच !... तिथला 'बॉय्' काम करतांना एका लांड्या पांढऱ्या सदऱ्यानिशीच असतो. पण त्याचा तो सदरा अर्थात् महिन्याची शेवटची तारीख जसजशी जवळ येत जाते, तसतसा आपला पूर्वरंग पालटत असतो. शेवटीं तर तो अगदीं अल्पाकाच्या कोटासारखा दिसूं लागतो. तो चांगलाच ओळखीचा आहे माझ्या ! जर माझ्या या 'गर्भश्रीमंत' दोस्तानें तेथें गेल्यावर त्याला रंगांत येऊन नेहमीप्रमाणें एक आण्याहून जास्त कांहीं दिलें, तर तो पोऱ्या तेथल्या तेथें, त्या अनपेक्षित देणगीबद्दल त्याच्याबद्दलचा आपला आदर दाखविण्यासाठीं हात पुढें करील व त्या 'बड्या साहेबांचा' हात 'शेकहँड' साठीं पटकन् उचलूं लागेल !... आणि हा आमचा दोस्त... पण मला त्या साऱ्या पुढल्या प्रकाराची कल्पना करत बसण्यांतच मौज वाटत आहे !

या बडे बापके बेट्यांना एवढें साधें कळत नाहीं कीं, "बोटभर मजकुराचें कार्ड = बापाकडून येणारी लठ्ठ मनिऑर्डर" हें समीकरण जन्मभर खरें ठरत नाहीं. एवढंच नव्हे तर तें कधीं तरी खरें ठरतें असें म्हणावयाचे दिवसही आतां हळुहळू जगांतून कायमचे चालले आहेत !

पैशाच्या टंचाईविषयीं पुष्कळ गमतीदार गोष्टी आपण ऐकतों अगर वाचतों खऱ्या !... पण कांहीं असलें तरी स्वतःला पैशाची टंचाई भासणें हें मात्र गमतीदार नव्हे खास ! पै–पैशासाठीं हमरीतुमरीपर्यंत

भांडायची पाळी येणें, स्वतःच्या खोलीतील भांडीं–कपडे दार लावून मोरी-वर धुवायचें नशिबीं आल्यामुळें लोकांनीं वर आणखी गरीब कवडी-चुंबक ठरविणें, भिकार व मळके कपडे अंगावर घालणें, स्वतांचा खरा पत्ता देण्याला सुद्धां लाज वाटणें, या गोष्टी कांहीं गमतीच्या नव्हेत खास!

छे! गरीबीमध्यें गरिबाला तरी गमतीदार वाटण्यासारखें कांहींच नसतें! भावनाप्रधान माणसाला तर पृथ्वीवरील नरकच वाटतो तो!– प्रत्यक्ष यमपुरींतल्या यातना सोसण्याचीहि हिंमत अंगीं असलेल्या मोठ-मोठ्या धीरगंभीर माणसांचीं हृदयें!– तीं देखील, गरिबींतील लहानसहान दुःखविवंचनेमुळें दडपून गेलेलीं आपल्याला पहावयास मिळतात तें उगीच नाहीं.

प्रत्यक्ष गैरसोयी सोसणें कठीण असतें अशांतला प्रश्न नव्हे हा!– तसल्या धकाधकीच्या मामल्यांतूनच जायचें म्हटलें तर मला वाटतें, कोणी विशेष काळजी करता ना! विजारीला कप्पी होती म्हणून रॉबिन्सन क्रूसोला कसली काळजी वाटली?... (पण तो विजार तरी घालीत होता का?... आठवत नाहीं बुवा!) बुटांतून पाय बाहेर सरकले म्हणून तो कुठें त्याची पर्वा करीत होता? साध्या कापडाचीच छत्री होती तरी त्याला ती पावसापासून सांभाळीत होतीच ना? त्याचा गबाळेपणा त्याला कधींच त्रासदायक झाला नाहीं!... कारण स्पष्टच आहे, त्याच्याकडे पाहून त्याला कुत्सितपणें फिदिफिदी हंसणारे, त्याचे कोणी 'मित्र' तेथें त्याच्या भोंवतीं नव्हते!...

वास्तविक 'गरिबींत असणें' ही एक खरोखर क्षुल्लक गोष्ट आहे. पण आपण गरीब आहों असें लोकांत जाहीर होणें हेंच माणसाच्या मनाला जास्त जाचक होतें!... थंडी लागते म्हणून झपझप पावलें टाकण्यापेक्षां आपल्याला इतरांप्रमाणें उबदार कपडा घालावयास नाहीं ही लाजच त्या माणसाची चालतांना तारांबळ उडवते! "ओव्हरकोट वापरणें एकंदरींत



आरोग्यकारकच नव्हे म्हणतात!..." किंवा "छत्री घेऊन न जाण्या-मधलें माझें तत्त्व तुम्हाला नाहीं समजणार, महाशय!" असलीं त्यांचीं विधानें लोकांना खोटीं वाटल्यावांचून रहाणार नाहींत हें तेही समजून असतात. 'कसं काय राव? ठीक चाललं आहे ना? सिगारेट घ्या ...' असें म्हणून आपली नेहमीची 'गिनीगोल्ड' बाहेरच्या खिशांत तशीच दडपून आंतल्या खिशांतील (आठवडा आठवडा अनेक वेळां झालेला मोह आवरून संभाळलेलें) 'प्लेअर' पाकीट आपण पुढें करतों तें असल्याच धडपडीनें! हें सर्व करतांना न कळत आपला चेहरा लाल होतो, तें आपण खोटें बोलत आहों, लबाड वागत आहों, या पूर्ण जाणीवेमुळेंच!... दर्दी माणूस या खाणाखुणा, तीं 'चोराची पावलें' लागलींच उमगेल!–

'गरिबी हा कांहीं गुन्हा नव्हे' असं म्हणणें तर अगदींच सोपें आहे. म्हणूनच किंबहुना तें केवळ निष्ठुर हिणविणें ठरतें! कारण म्हटल्या-प्रमाणेंच खरें असतें तर माणसांना त्याबद्दल लाज वाटतीच ना!... कांहीं म्हटलें तरी ती एक मोठी घोडचूक आहे ही गोष्ट मात्र खरी.... आणि त्या दृष्टीनेंच तिला शिक्षा होते. गरीब माणसांचा सर्व जगभर तिटकाराच करतात. श्रीमंत, मध्यम, मुत्सद्दी, शिपाई, सर्व या बाबतींत सारखेच!... शेंबड्या पोरांना शाळेंतील कित्त्यांत वाटतील तीं सुभाषितें शिकवावींत!... दाखवायचे दांत निराळे आणि खायचे निराळे!...

कारण मत म्हटलें कीं तेथें दंभ आलाच! उत्तम सुटाबुटाचा पोषाख केलेल्या एकाद्या अस्सल मवाल्याच्या हातांत हात घालून, जो सद्गृहस्थ गिरगांवच्या मोठ्या रस्त्यांतून मैल मैल चालेल, तोच वडि-लांच्या एकाद्या कोंकणच्या प्रेमळ, खेडवळ, मित्राशीं चार शब्द बोलायला शेजारच्या गल्लींत चोराप्रमाणें इकडे तिकडे पहातच शिरेल.

पण मग ही परिस्थिती तो गबाळ्या स्वतःहि पूर्णपणें–किंबहुना सर्वांत जास्त–जाणून असतो. आणि म्हणूनच 'आपल्या गरिबीचें उगीच

असलें प्रदर्शन तरी नको' या हेतूनेंच, असली ओळख टाळण्यासाठीं, वेळ पडल्यास मैलमैलाच्या वळणाचे धक्के खावयासही तो तयार होईल !......

ज्यांनीं असल्याच एकाद्या गबाळ गरिबाला त्याच्या रेन श्रीमंतींत पूर्वी पाहिलें असेल, त्यांनीं त्याला चुकविण्यासाठीं त्याला पाहतांच आपलें तोंड दुसऱ्या बाजूस फिरविण्याचें मुळींच कारण नाहीं. तो बिचारा स्वतःच त्यांना टाळावयास त्यांच्यापेक्षां हजारपट जास्त उत्सुक असतो. त्यांच्याकडून त्याला होणाऱ्या मदतीविषयीं म्हणाल तर त्यांनीं कोणी त्याला आपणहून मदत देऊं करणें ही गोष्टच त्याला मुदलांत नको असते. त्याची सर्वांत कोणती मोठी इच्छा असेल तर ती हीच कीं–'सर्वांनीं त्याला एकदम विसरावें !'

आणि या शेवटच्या बाबतींत मात्र तो बहुतेक इच्छा असो नसो पूर्णपणें यशस्वी होतो !...

काळ हा सर्व रोगांचा वैद्य आहे म्हणतात. 'पैशाची टंचाई' हा रोग कांहीं त्याला अपवाद नाहीं ! त्याच्याच सहाय्यानें इतर बाबींप्रमाणें ही 'पैशाची टंचाई' देखील माणसाच्या हळुहळू अंगवळणीं पडते ! या धकाधकींतून वर्षानुवर्षें शीरसलामत गेलेला मुरब्बी आणि आपल्या खाजगी दुःखाची लाज झाकूं पहाणारा किंवा आपली ओळख लपविणारा बिचारा या प्रान्तांतील नवखा !...दोघांतील फरक कसा पटकन् लक्ष्यांत येतो !...

मारवाड्याकडे घड्याळ गहाण टाकायचा प्रसंग या बाबतींत चांगलाच निकष ठरतो ! कोणा एका कवीनें म्हटलेंच आहे, मला वाटतें, कीं, "गहाण टाकण्यांतील सफाई ही देखील एक कला आहे. केवळ योगायोग नव्हे तो !" शिंप्याच्या दुकानांत कपडे करावयास टाकण्यासाठीं जसा एकादा न डगमगतां जाईल, तसेंच–त्यापेक्षां जास्तच बेदरकारपणें आपण 'जय गोपाळ' म्हणत काका मारवाड्याच्या दुकानीं जायचें असतें !–



मग मेहताजीहि या बसा म्हणत आहेत, तेवढ्यांत काकाजी मारवाडी, थोड्याशा बेफिकीरीनेंच 'नेहमींचे असेल गिऱ्हाईक तर पाहूं या' असें कांहींतरी कुरकुरत पुटपुटत, दौत–लेखणी कागद–खतावणी पुढें काढतो. आणि मग तो सारा सोहाळा त्यापुढें विशेष कांहीं त्रासदायक ठरत नाहीं !–

पण तेंच तें नवखें चुकलें वासरूं पहा !... त्याला बापड्याला स्वतःचीच खात्री दिसत नाहीं ! तो काकाजीच्या दुकानावरून आतां इतक्या येराझारा घालणार कीं, जवळपासचे फिरते मवाली त्याच्याकडे अगदी आपुलकीनें पाहूं लागतील ! पाहाऱ्यावर असलेल्या पोलीसाच्या मनांत तर त्याच्याविषयी भलताच संशय येऊं लागेल. मग शेवटी तेथें जमलेल्या नेहमीच्या सरावाच्या मंडळींतीलच आपण एक आहों असें भासविण्याचा तो प्रयत्न करूं लागेल. आणि त्यावेळीं आपण कांहीं तरी खरेदी करावयास आलों आहों, असें लोकांना भासवावें हीच त्याची इच्छा असेल !–

तो वीर शेवटीं धीर करून आंत शिरेल !...पण आंत शिरल्यावर-सुद्धां तो इतक्या हळू बोलेल कीं, त्याचें म्हणणें मेहताजी किंवा काकाजी-पैकीं कोणालाच प्रथम ऐकूं जाणार नाहीं. अर्थात् त्याला जिवावर उदार होऊन पुन्हां सर्व बोलून दाखवावें लागेल. या मागाहूनच्या त्याच्या उडत्या बोलण्यांतून, 'मित्र' 'पैसे काढणें' असले अस्पष्ट शब्द येतील; तेव्हां त्याला दुसऱ्याच ठिकाणचा पत्ता सांगितला जाईल. 'अरे आपलें सारेंच चुकलें कीं काय ?' या कल्पनेनें तो त्याच्या समजुतीनें 'चुकीच्या' ठरणाऱ्या दुकानांतून बाहेर पडेल. तेव्हांचा त्याचा आधींच संकटांनीं ग्रस्त झालेला तो चेहरा ! त्याला मनांत त्यावेळीं नक्की वाटत असेल कीं, सारें जग आपल्याकडे डोळे मिचकावून पहात आहे, फिदी फिदी हसत आहे !

तो जेव्हां दोनदां घोंटाळून पुन्हां योग्य ठिकाणीं पोहोंचेल तेव्हां तो भांबावून आपलें नांवगांवच विसरेल. त्याचा सारा गोंधळलेला चेहरा पाहून त्यावेळीं कोणी जरा जोरदार शब्दांत "हें (घड्याळ) तुला कसं मिळालं बोल!" म्हणून ठांसून विचारलें तर त्याचीच बोबडी वळेल. तो सगळेंच असंबद्ध बोलेल. 'त्याच दिवशीं आपण ते अमक्या ठिकाणाहून चोरून आणलें' असें त्या गडबडींत त्यानें कबूल केलें नाहीं म्हणजेच त्यानें मिळविली म्हणायचें एवढेंच!

आणि अर्थात त्यानंतर त्याला सांगण्यांत येईल "असल्या तऱ्हेच्या भानगडींत आम्हाला पडायचें नाहीं. तुम्ही आपलें जोखीम घेऊन जितक्या लौकर येथून पाय काढाल तेवढें तुम्हाला व आम्हालाहि बरें!.."

सहाजिकच तो आणखी जास्तच भांबावून, त्याबरहुकूम तसेंच सारें करील. आणि आपण ना घरीं ना गहाण दुकानादारीं इतकें दोन तीन मैल लांब एवढ्या लौकर लौकर कसे चालत आलों याचें आश्चर्य वाटेपर्यंत, तो चालत आहे याचीहि त्याला कल्पना येणार नाहीं!....

पण मग—आपण या काकाजी मारवाड्याकडे कर्मधर्मसंयोगानें यशस्वी झालों, तरी देखील, वेळ पहाण्याची मात्र मोठी पंचाईत होते! कारण लोकांच्या घड्याळांत पहावें तर तीं दरवाज्याच्या आंत किंवा खिशांत असतात. (दारावर सार्वजानिकपणें बाहेर लावलेलीं क्वचित्—घड्याळ कंपन्यांवरच..) त्याला एक उपाय आहे मात्र; तो म्हणजे लोकांच्या खिडक्यांवरून येराझारा घालणें. पण मग मवाली म्हणतील ही भीति!...

तें काय असेल तें असो. पण या बाबतींत एक चमत्कार मात्र दृष्टीस पडतो. तुम्ही असें आपलें घड्याळ काका मारवाड्याकडे "नीट करायला टाकल्याला" अर्धा तास झाला असेल नसेल तोंच कोणी तरी एकदा महाभाग रस्त्यांतून चालतां चालतां पट्कन थांबेल व तुम्हालाहि मुद्दाम थांबवून प्रश्न टाकील, "जरा जरा... मिस्टर, वाजले



किती हो आतां?" ... आपल्याजवळ इतके दिवस घड्याळ निकामी पडलें होतें तेव्हां मात्र कोणाला कसली जरूरी भासली नाहीं... आणि आतां आपली टिंगल करण्यासाठींच हें पेंव का फुटलें आहे?— असे तुम्हाला त्याक्षणीं वाटेल!—

आणि ही 'पैशाची टंचाई' तरी किती निरनिराळ्या प्रकारची असते पहा!...

आपल्यापैकीं बहुतेक—सगळेच म्हणाना—नेहमीच पैशाच्या टंचाईत असतात. कारण कांहींना हजार रुपयांची एक वेळां उणीव भासते तर कांहींना एका रुपयाची हजार वेळां!... एकूण हें बहुतेकांना परिचित असतेंच!

आतां 'पैशाची टंचाई' हा शब्दसमूहच ठाऊक नसलेल्या (ईश्वर करो आणि त्यांच्या पांढऱ्या केंसांवर उरल्या-सुरल्या आयुष्यांत तसली आपत्ति न येवो!) माझ्या वृद्ध पेन्शनर मित्रांनीं, काका मारवाड्या-सारख्यांच्या गहाण दुकानीं जाण्याची अधोगती अगदीं निरुपाय. म्हणूनच फार तर अंगिकारा!

पण ज्यांना त्याचा चांगला अनुभव आहे (आणि बऱ्याचश्या चाळीशीपर्यंत पोहोचलेल्या माझ्या वाचक मित्रांना तरी हा आतापर्यंत अनुभव आला असेल यांत मला संशय नाहीं!...) त्यांची स्थिति अनेक वेळा चमत्कारिक होते!— आपल्या स्वप्नांतील स्वर्गामध्यें, कधीहि स्वर्गांत जाण्याची इच्छा न करणारे लोक पाहून आश्चर्यचकित झालेल्या लहानग्या मुलाप्रमाणें त्यावेळीं आपली स्थिति होईल!... निदान 'मित्रा' जवळ हात-उसने घेण्यापेक्षां हा आपला 'पैसे मिळवून टंचाई घालविण्याचा' वर म्हटलेला अगदीं एक स्वतंत्र राजरोस मार्ग आहे असें मला तरी वाटतें!—

आणि "परवांपर्यंत दोन रुपये" मागणाऱ्या किंवा प्रॉमिसरी नोट लिहून देणाऱ्या माझ्या ओळखीच्या माणसांकडे मी याच मार्गाची मुद्दाम शिफारस केल्यावांचून रहात नाहीं.

पण मग सगळ्यांनाच तें पटत नाहीं! एकजण तर मला म्हणाल्याचें आठवतें, "हा तुम्ही सुचविलेला मार्ग मला मुदलींच पटत नाहीं!"

"मला पटत नसला तर तो व्याजांतच!..." असें तो त्याऐवजीं म्हणाला असता तर मी म्हणतो, माझी त्याला हरकत नव्हती!...तो बराचसा सत्याजवळ तरी असता!..,...

कारण शेंकडा पंचवीस आणि तीस टक्के म्हणजे अचाटच काम तें!... फक्त व्याज भरत ठेऊनहि होणाऱ्या टंचाईचा अगदीं अखंड झराच!

---

(इंग्रजी लेखाचें स्वैर रुपांतर)

चिमूट दहावी

# 'सुख-रूप बाळ-बाळंतीण'

मानवी घरकुल हें एक उद्यान आहे. त्यागप्रेमाच्या लहान लहान झऱ्यांवर वाढणाऱ्या–तगणाऱ्या त्या बागेंत मनोरम नि सुखनिधान अशीं मुलें नसलीं तर शोभा कोठून आढळायची त्यांत? फुलें नसलीं तर बाग कसली असें आपण नेहमी म्हणतों!–तशीच मुलें नाहींत तर घर कसलें अशी आपली साहजिकच भावना असते.

एवढ्या तरी कारणामुळें आपल्याला फुलें म्हणतांच मुलांचे प्रफुल्ल चेहेरे दिसूं लागतात!–आणि मुलं म्हटलं कीं आपल्याला फुलें आठवतात हेंहि तितकंच खरं!–आपला चेहेरा अगदीं फुलांसारखा विकसित होतो. पण—

पण–माझ्या अनुभवाप्रमाणें म्हणायचं तर कांहींच्या चेहऱ्यावर या नैसर्गिक भावना आपल्याला दिसणार नाहीं. उलट त्यांच्या कपाळाला त्रस्त मनाच्या आंठ्या पडल्याचें आढळेल!—

असल्या दोन्हीं दृश्यांमागें भावना असतात...

मुलांवरून मनांत डोकावणाऱ्या फुलांच्या कल्पनेवरून किंवा कपाळावर 'झळकणाऱ्या'–किंचित काळ स्थिर होणाऱ्या–आंठ्यांच्या जाळ्यावरून माणसामाणसांतील एक फरक खात्रीपूर्वक ठरवता येईल. फुलांच्या सुवासाकडे मनाचा तत्काल कल झुकणाऱ्या मंडळींना मुलांविषयींच्या साऱ्याच सुखद आठवणी असतील. प्रेमळ नातलगांचा मोठा गोतावळा त्यांच्या मागें असेल, ते स्वतःहि कदाचित चार गुणी कच्याबच्यांचे धनी असेंतील. पण उलट हे दुसरे कपाळाला आंठ्या पाडणारे लोक मात्र मोठे घातुक असतात पहा!—

एक तर हे लग्न न झालेले बेछूट ब्रह्मचारी किंवा बोलके नामधारी नवमतवादी असतील. किंवा सुरवातीस मुलांची आशा करूनहि शेवटीं दुर्दैवानें अपत्यविहीनताच पदरीं आल्यानंतर, प्रतिक्रिया म्हणून कडवटपणें वागणारे मत्सरग्रस्त असतील. किंवा दोन आकड्यांची संख्या करणारीं मुलें लागोपाठ पदरीं पडून, शेवटीं बिछान्याला खिळलेल्या फिक्क्या चेहऱ्याच्या बायकोची नाखुषीनें सुश्रूषा करतां करतां, पुढल्या सनइ–चौघड्याची कल्पनाहि करणारे ते हिंदू गृहस्थाश्रमी वीर असतील...किंवा...

पण मग यापेक्षांहि एक भयंकर जात असते ती निराळ्याच लोकांची!–हे प्राणी प्रत्यक्ष सृष्टींत कोणीहि असले तरी शब्दसृष्टींचे ईश्वर असतात. आणि आपल्या काव्यांत ते मुलांना फुलें म्हणतात; पण आपल्या प्रत्यक्ष मुलांना पाहून मात्र कपाळाला भयंकर आठ्या घालतात!...दुसरे सर्व प्रकार पुरवले!—पण या भयंकर प्रकारच्या लोकांपासून माणसानें चार पावलें दूर रहावें सावध असावें हें बरें!—

कारण असं!–'वत्सल रसा'विषयीं संस्कृत प्राकृत मतभेद बाजूला ठेवला तरी मानवी मनांत वात्सल्य हें नैसर्गिक आहे याबद्दल कोणाचे दुमत होणार नाहीं!–निदान नाझरेथच्या जीझसपासून तो आजतागायत ही भावना मानवी हृदयाच्या हालचालींची–त्या जातीच्या सातत्याचीच–



पाया ठरलेली आहे. मुलांच्या जातीच्या सांखळीनेंच मनुष्यजात पुढे चालत आली आहे.

जन्माला आल्यानंतर लागलीच उडया मारूं लागणारें, दाणे टिपूं पहाणारें पशूचें पिल्लूं असतें थोडेंच, मानवी बालक म्हणजे? गाईच्या वासराप्रमाणें त्याला जन्माला आल्याबरोबरच वारा पिऊन भडकतां येत नाहीं. बिचाऱ्याच्या तोंडाला आईनें स्तन लावला तरच ते लुचूं लागते. ते सुद्धां प्रथम शिकावें लागतें त्याला!–या आत्यंतिक हतबलतेंतच चिकित्सक मनाला त्याच्या व एकंदर मानवजातीच्या पुढील पराक्रमाचा सांठा सांपडतो!–त्यांच्या त्या पहिल्या हालचालींत किती हतबलता असते?–आणि मला वाटतं म्हणूनच...निसर्गानें मानवी मनांत हें उत्कट, आदर्श वात्सल्य निर्माण केलं असावं!—

या वात्सल्याच्या खेळाच्या जोरावरच.... पावित्र्य, निर्मलता, निर्विकारता वगैरे गोष्टी बालकावर (काव्योद्यानांत फिरत असतां) आरोपून, फूल हें शाब्दिक प्रतीक स्वतःला मोठेपणा आणण्यासाठीं तयार करणारी, हीं वर म्हटलेलीं दांभिक कविब्रुवमंडळी, अशी प्रत्यक्ष सृष्टींत मात्र कपाळाला आंठ्या घालताना पाहून त्यांना समाजकंटकांत ढकलण्याची मला कां इच्छा होऊ नये बरं?—

पण या वात्सल्याबद्दल विचार करूं लागल्यापासून माझा अनेकदां एक मनोरंजक गोंधळ उडालेला आहे. वात्सल्य नैसर्गिक असलें तरी तें मानवी मनांत वास करीत असल्याचें प्रथम केव्हां प्रकट होते!– खरंच केव्हां?–

बाहुलीला 'उगी उगी' म्हणणाऱ्या पोरकट चाळ्यांत अनुकरणाचाच अधिक अंश असेल. पण... एखादा कॉलेजांतील उमदा तरुण शेजाऱ्यांच्या मुलांना खाऊचे पुडे, चॉकलेटच्या डब्या देताना अगर बरोबर मिरवत चौपाटीवर जाताना पाहिला असेल तुम्ही!– तिथं, मला वाटतं, हेंच

वात्सल्य सुप्तावस्थेंत खेळतांना दिसतें. समोरच्या मालनताईला मिरवण्यासाठीं 'मला मला' म्हणत भांडणारी एखादी परकरी पोर किंवा आपल्या सावत्र आईच्या छोट्या छबड्याला लाडीकपणें खेळवतां खेळवतां त्याचा मुका घेण्याऐवजी चुकून अंगांत आल्याप्रमाणें त्याच्या कोमल गालाला चटकन् चावणारी एखादी नुकतीच साडींत शिरणारी पोरसवदा बाला तुमच्या दृष्टिपथांत आली असेल !– तर मग तेथेंहि तुम्हाला या वात्सल्याच्याच पहिल्या पावलांची पटकन् ओळख पटेल !

पण यापेक्षां अधिक स्पष्ट कल्पना येण्यासाठीं आपल्याला एखाद्या नवोढा मुलीच्या घरांतच शिरावयास पाहिजे...

माझ्या एका बालमैत्रिणीचें घाईघाईनें लग्न ठरलें–झालेंहि. एकंदरींत चांगल्या ठिकाणीं गेली. त्यानंतर मी एकदा सहज प्रसंग आला म्हणून तिच्या घरीं गेलों.

त्या जोडप्याच्या घरांतल्या खासगी खोलींत मी एकदम शिरलों व तिच्या नवऱ्याच्या टेबलाजवळच्या खुर्चीवर बसलों. भिंतीला टेंकून नि पाय जवळ करून ती जमिनीवरच कांही तरी शिवत बसली होती. मी आल्याचें पाहून ती तोंडभर हसली खरी; पण जाग्यावरून कांहीं उठली नाहीं. आम्ही इकडच्या तिकडच्या गप्पा करत असतांना ती मधूनच एकदम लाजे, हसे, ...खालीं पहात बोलतां बोलतां गप्प होई. चेहरा खुललेला,...हास्य गद्गदून येत असलेलें... त्यामुळें मीहि गमतींत तिला म्हणालो "कां ग?–सागरावर इतका फेस कां फसफसतो आहे आज?"– त्यावर ती आणखी एकदां खुदकन् हसली...तिचा चेहरा–विशेषतः तिचे डोळे–विशेषच चमकत होते तेव्हां—

मग ती पटकन् हसून म्हणाली–अडखळतच म्हणाली,–"अरे, तुला माहीत नाहीं?–आज संध्याकाळी मी जेवणार आहे माझ्या मैत्रिणींबरोबर !"—



'सूर्य पश्चिमेला उगवणार आहे आज !' अशा नवलाईच्या थाटांत 'आज मी जेवणार आहें' असें ती काय सांगत होती तें मला प्रथम कांहीं समजेना.

तेवढ्यांत ती सामान गोळा करून हंसत जागेवरून उभी राहीली आणि तिच्याकडे किंचित् निरखून पहातांच माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. तिनें 'डोहाळे' हा शब्द मोठ्या खुबीनें नि वधगिरीनें लपविला होता. आणि मग मला त्या घरांतील समारंभाची तयारी समजली. तसेंच बाईसाहेब लहानपणींप्रमाणें कात्रीनें उगीचच कापडाचे तुकडे करीत नाही आहेत किंवा तो लाकडी बाहुलीसाठींहि फ्रॉक नव्हे– तर घरांत... किंबहुना जगांतच–नव्यानें अवतीर्ण होणाऱ्या एका अज्ञात जिवंत बाहुल्यासाठीं चालवलेलें ते झबलें आहे. इत्यादि साऱ्या गोष्टी माझ्या त्या वेळच्या अनभिज्ञ डोक्यावर धडाधड येऊन आदळल्या.

पुढलीं दोन मिनिटें आम्ही दोघेंहि पोट भरून हंसत होतों.

पडसें खोकल्यालासुद्धां घाबरून डॉक्टरकडे धांवावयाच्या आजच्या काळांत हा डोहाळ्याचा नैसर्गिक गोड बोवाळ डॉक्टरच्या औषधांत विरघळून जातो.

पण हे डोहाळे कोणाला झालेले नाहींत ?–– कौसल्येपासून तो पाठीमागच्या रामागड्याच्या बायकोपर्यंत... किंवा दारीं भीक मागणाऱ्या भिकारणीपर्यंतहि !–

पण तें सारें आपापल्या कुवतीप्रमाणें, परिस्थितीप्रमाणें !– नेपोलियनच्या आईला गालिच्यावर निजावेसें वाटेल, जिजाईला घोडदौड करण्याची हौस पुरवावीशी वाटेल, तर आमच्या कॅप्टन लिमयांच्या एकाद्या लहानपणीसुद्धां पैसे खाण्याची संवय असलेल्या भावी इंजिनियर नायकाच्या आईला माती खावीशी वाटेल !... पण मग नेपोलियन कार्लोसारख्या शूर कर्तृत्ववान इनामदाराचा मुलगा होता ! शिवाजीला शहाजी राजांच्या

वैभवाचा पाठिंबा होता, तसेच आमचे खंडोपंतहि म्हणे गर्भश्रीमंत होते. हें आपण लक्ष्यांत घेतलें पाहिजे !

नाहींतर दुसऱ्या एखादीला गालीच्यावर झोंपण्याची इच्छा होऊनहि तिचा उपयोग काय ? तिच्या नशीबीं आलेल्या इतर सहा सात मुलांच्या अंगावर साध्या फाटक्या गोधड्याहि घालण्याचें तिला बनत नाहीं हें तिला ठाऊक असतें !– समजा एखादीला घोडदौड करण्याचे डोहाळे लागले तरी तिच्या कारकून नवऱ्याची रोज ऑफिसमध्यें साहेब गाढवावरून वरात काढतो हें तिच्या चांगलेंच ध्यानीं असतें, आणि तिसरीला हळूच माती खावी अशी इच्छा असूनहि ( मुंबईत जखडलेल्या तिच्या आयुष्यांत कामकरी बाल्यानें कृपावंत होऊन लांबून कोठून तरी आणली नाहीं तर ) फुटपाथ डामरीरस्त्यावर तिला पुरेशी मातीही मिळणार नाहीं !– अशी तिला पूर्ण खात्री असते.

तात्पर्य, असल्या या डोहाळ्यावर जाण्यांत मुळींच अर्थ नाहीं !– बाळबाळंतिणीच्या परिस्थितीवर तें बरेंचसें अवलंबून असतें !– म्हणूनच मी म्हणतों वात्सल्याचा झरा असल्या बाह्य दृश्यांवर अवलंबून नसतो !– तो हृदयांत खोल दडलेला असतो !––

या बाळबाळंतीण या शब्दावरून मला या बालकांचा ‘ जन्म ’ दिवस आठवला. कोण घालमेल चाललेली असते साऱ्यांची त्या दिवशीं !... शेवटीं साऱ्यांच्या जिवाची धडपड करवून ही स्वारी जगांत पाऊल टाकते. व आपण आल्याची–चांगलें जिवंतहि असल्याची–‘ कँहँ ’ म्हणून ललकारी देते. पुन्हा नवीन घालमेल सुरू होते. तेथून स्त्री-पुरुषांच्या समान हक्काचें भांडण सुरू होतें, पण क्षीण होऊन आपल्याजवळ पडलेल्या आपल्या मातेप्रमाणेंच त्या बिचाऱ्या नवोदीत बालिकेचेंहि कांहीं चालत नाहीं. पण तेंच तें ‘ तो ’ असेल तर त्याच्या बापाचा आजोबाहि श्रीपाद कृष्णांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ पणत ’ लावल्यावाचून रहात नाहीं, मग त्याच्या



आजोबा–बापांचा ‘ बेचाळीस कुळांच्या उद्धारा ’ चा आनंद तर काय वर्णावा ?

पण ‘ तें ’ कोणीहि असो–‘ तो ’ की ‘ ती ’–आपण आपली समान-बुद्धि जागृत ठेऊंया. आणि तीच मातेची दृष्टी असते !

पांचवी–सातवी–बारसें या प्रसंगांपासूनच ती या हतबल प्राण्याच्या हक्कांचा कैवार घेत असते. पुढें तें आपल्याला ओळखूं लागल्याचा दिवस तिच्या आयुष्यांत अभिमानाचा, अगदीं सोन्याच्या अक्षरांत लिहून ठेवण्या-सारखा असतो. त्यानंतर कांहीं दिवसांनीं ‘ इकडे पाहिलेत का ?... हांक मारतोय गुलाम तुम्हाला !’ या लाडिक प्रश्नोत्तारांतील तिच्या आनंदाचा साठा व निर्मळ कौतुक कोणाच्या दृष्टींतून सुटेल ? आणि यानंतर तो डुलतो वळतो, पुढे सरतो, ढोंपरावर बसत बसतो, डुलतो, रांगतो, भिंतीला धरून उभा रहातो, ‘ चाल चाल ’ करत चालतो, व झिंगल्यासारखा चालतो... ‘ आई ’ ‘ बाबा ’ असे शब्द बोलतो— असले एक ना दोन अनेक रिपोर्ट रोजच्या खाजगी घरगुती बुलेटिनमधून बाहेर पडतात.

तिऱ्हाईत मनुष्य कदाचित्, रस्त्यांत जातां येतां हातीं येणाऱ्या सिनेमाच्या किंवा ‘ मदनमस्तपाका ’च्या जाहिरातीप्रमाणें क्षणभर हातीं घेऊन तीं बुलेटिनें रस्त्यांत भिरकावून देऊन पुढें चालूं लागेल !— पण घरांतील माणसें–विशेषतः ही माता–गांधींच्या ‘ यंग इंडिया ’ प्रमाणें किंवा मुनशींच्या ‘ सोशल वेल्फेअर ’ प्रमाणें त्या साऱ्यांची काळजीपूर्वक फाईल करील व फावल्या वेळांत तीं पुन्हां पुन्हां कुतूहलपूर्वक चाळील.

आणि या माता आपल्या लहानग्यांशीं किती लाडिकपणें खेळकरपणें वागतील ? याला पहिलें मूलच अपवाद नसते. साऱ्यांच्या बाबतींतच हा ‘ जी. आर. ’ या त्यांच्या वागणूकींत त्यांचा नैसर्गिक विनय प्रेमळपणा सारं प्रामुख्यानें वावरत असतें. तिच्याइतकी सहानुभूती त्या नवख्या प्राण्याला कोणीच दाखवत नाहीं. त्याच्या साध्या रडयांतूनहि ती अर्थ काढील. त्याच्या अर्थशून्य बडबडीला अर्थ देईल. तो बोबडें बोलला तर

आपण बोबडे बोलून त्याचे लाड पुरवील. ' आता बालाला आपन मांदीवल घालूं,... आतां बालाला आपन अंगी घालूं, आतां बालाला आपन ती ऽऽ च्या कलू ... ममं कलू, अन मग जो जो कलू... भुल जायच ना आपल्याला?' ती बडबड मागें उभे राहून आपण ऐकूं लागलों तर तिला मूर्खांत काढूं.

पण या मातेच्या बडबडीतच केवढा मोठा अर्थ असतो! तसा अर्थ असतो म्हणूनच विद्वताजड पंडितमान्यांच्या तोंडी रुळणारी भाषा देखील या मातेच्या केवळ उत्कट भावनांत उगम पावणाऱ्या, वरवर अर्थशून्य भासणाऱ्या बडबडीनें साफ बदलून जाते.

"सुख-रूप बाळ-बाळंतिण!" खरंच तें! पण मग हीच लाडुकपणें खेळकरपणें, उत्साहानें बालकाशी वागणारी नवीन माता इतरांशी कशी निराळीच वागते, पाहिलें आहेत कां? आपल्याबरोबर बालिश खेळ खेळलेल्या या बाल-मैत्रिणी नुसत्या माता झाल्या कीं अगदीं आजीबाईप्रमाणें पोक्त बनतात. परवां परवांपर्यंत ' चिमणीच्या दांता 'नें पेरुचे खाकडे, चिंचा, उसाचे रवके आपल्याबरोबर खाणाऱ्या या पोरी, आपल्या मुलाच्या आई झाल्या कीं आपल्यालाही अगदी पोरासारख्या वागवूं लागतात. चार शहाणपणाच्या गोष्टी शिकवूं लागतात. या मैत्रिणींची असली अस्थानीं वाटणारी 'आईगिरी' आपल्याला प्रथम क्षणभर रागच आणते. पण मग विचार करावयासहि लावते. त्यांचा बालिश खेळकरपणा इतक्या लौकर लोपून जातो तरी कसा याचें आपल्याला आश्चर्य वाटतें. कधीं कधीं मला तर वाटते, माता ही स्त्रीयांची नैसर्गिक भूमिकाच आहे.

पण समान हक्कवाल्या विदूषी कदाचित् मला दूषण देतील असे बोलल्याबद्दल! व रागानें मजवर डोळे वटारतील!... तेव्हां हें स्त्रियांच्या मनाच्या आश्चर्यकारक स्थित्यंतराचें कोडें मला अजूनहि उलगडता आलेले नाहीं असेंच आपलें म्हणतो.

---

चिमूट अकरावी

# चुटपुट लावणारीं बाळें

स्नेह्यासोयऱ्यांना एकमेकांची अनेक लहानमोठीं पत्रें जातात; पण—मला वाटतं त्यांत— "सौ... काल पहाटे प्रसूत झाली. मुलगा झाला; बाळ-बाळंतीण निरोगी सुखरूप आहेत." अशाप्रकारचें पत्र, लिहिणाऱ्या इतकेंच वाचणाऱ्यालाहि अतिशय आनंदी करतें. जगाच्या अफाट पसाऱ्यांतील आपल्या चिमुकल्या कोंपऱ्यांत एक नवीन जीव अवतरला आहे ही कल्पनाच अतिशय रमणीय नव्हे काय?—

पण लिहिणाऱ्याला व वाचणाऱ्यालाहि आनंद देणारीं असलीं पत्रें एक तर अशाच प्रकारें लिहिलीं जातात किंवा मुळीं लिहिलींच जात नाहीं!

कारण ज्या घटनेवर तीं आधारलीं जातात ती घटनाच अशी दोन परस्पर विरोधी टोंकांना झुकणारी असते. नव्या जीवाचा जगात अवतार होतांना जगांत आधींच असलेल्या प्रिय जीवाचा अवतार समाप्त होण्याचीहि भीती असते. असल्या असलेल्या व्यक्तीच्या आयुष्याआड येणाऱ्या प्राण्याची अर्थात् कोणीहि गय करीत नाहीं ' आडवं आलं तर '...

अशा वेळीं असली आनंदाची पत्रें वरच्यावर विरून जातात. आनंदहि विरतो; दुःख मात्र दुणावतें.

आणि आई जिवन्त असली तर तिचें त्या वेळचें दुःख, मुग्ध पण अगदीं दारुण असतें.

हें तिचें दुःख याहून शतपटीनें दारुण करणारी घटना मात्र निराळी व अधिक निष्ठुर असते. सुखरुप जन्माला येऊन, हा जीव आपले कोवळे इवलाले तांबुस हात हालवीत, भुरभुर उडणाऱ्या केसांखालच्या लाल गळणाऱ्या कमलासारख्या मुखमंडळांतून वात्सल्यमधु झिरपत, फेंगड्या पावलानें जगांतील आपली वाढती प्रगती करित असतां, चार दोन दिवसांच्या आजाराशेवटीं तो मऊ मलमलीत गुरफटून निष्ठुर दगडांत निजविला जाण्याचीच ती दुःखद घटना !—

मातेच्या प्रेमळ डोळ्यांना तें पहाण्याची पाळी आली म्हणजे तर तिला वेड्यासारखें होऊन जातें! तिला कांहीं काळ जीव नकोसा होतो !– मग त्यानंतर त्याच्या पाठीवर तिला कितीहि गोड मुलें लाभलीं तरी त्या गेलेल्याची दुःखद आठवण तिचें मातृहृदय कधींहि विसरणार नाहीं.

आणि त्याचवेळीं त्याच्याबरोबर जन्मलेलीं शेजारचीं मुलें दिवसेंदिवस वाढत्या वयांत तिच्यासमोर बागडतांना दिसलीं तर मग आपल्या गेलेल्या बालकाच्या कल्पनेंतील मूर्तीची वाढ मात्र कायम खुंटण्याची तीव्रतम व दुःखद जाणीव होऊन ती अधिकाधिकच रंजीस होते !

" कर्त्यासवर्त्या मुलाचा चिरवियोग भोगावयाचें नशीबीं येण्यापेक्षां तो लहानपणींच आपल्याला सोडून गेलेला पुरविला ! " असले उद्गार ऐकूं आले तर ते फार तर बापाचे समजावेत !– आईचे खासच नव्हेत !—-

कारण, मुलाला एकदां आपल्या पोटांत वागवूं लागल्यानंतर त्यानें आपल्या आधीं हें जग सोडून जावें ही गोष्ट मातेच्या मनाला कल्पनेंत देखील कधीं सहन होईलसें मला वाटत नाहीं.



पण मग असल्या या अघटित दुर्दैवी घटना घडतात तरी कां ?— त्यामागें असलीच कसली दैवी योजना, तर त्या योजक शक्तीच्या सद्हेतुबद्दल मन साशंक होऊन आपल्याला सुन्न वाटल्यावांचून मात्र रहात नाहीं !—

एक प्रसंग आठवतो आहे मला !– माझ्या एका मित्राचा सहा वर्षांचा चलाख बुद्धिमान छोकरा बाहेरून येणाऱ्या आपल्या मामाला घरीं आणावयास एकटाच स्टेशनवर गेला. " माझ्याकडे पैसे नाहींत हो ! प्लॅटफॉर्म तिकीट न काढतां आंत जाऊं ना मी ? " असें दारावरील तिकीट कलेक्टरला विचारण्याइतकी त्याच्या अंगी धिटाई होती. हा छोटा वीर प्रामाणिक घोषणा करून, तसा पुढें सरसावत आहेसें पाहून त्यानेंहि जरा कौतुकानें " मला तूं काय देशील पण त्याबद्दल ? " हा प्रश्न त्याला विचारतांच " माझ्या मुंजीला तुम्हाला जेवायला बोलावीन " असें ऐटींत आश्वासून तो स्टेशनांत शिरला.

घरीं गेल्यावर माभाच्या वृत्तांतावरून मुलाचें कौतुक करीत माझा मित्र त्याला म्हणाला, " गुलामा, साऱ्यांना मुंजीला बोलावतोस. फार पाहुणे जेवायला जमतील हो ! " तो बालवीर त्यावर हंसून म्हणाला, " नाहीं जमलें तर आपण नुसती पानसुपारी वाटूं, बाबा !–"

या प्रश्नोत्तरांवर सारी मंडळी आनंदानें हंसली...रंगली, त्याच्या भवितव्याची उज्वल कल्पनाचित्रें त्यांनीं रंगविलीं ! पण त्यांना काय माहीत कीं आणखी घटका पळानंतरच हा कोंवळा पोर एका मोठ्या लॅरीच्या भक्षस्थानीं पडणार होता ? साऱ्या दुःखाचा कडेलोट झाला तो, हॉस्पिटलमध्यें ऑपरेशननंतर इतर बडबडींत त्यानें 'माझी एक वहाण पायांतून आली पण दुसरी मोटारीखालीं पडली असेल ती घेऊन या !' असें मरणापूर्वी पांच मिनीटें सांगितलें तेव्हां !

पण असल्या या दुःखद घटनांची अगम्य कोडीं सोडवण्यापेक्षां

आपण मुलांच्या सहवासाच्या गोड बाजूंकडेच दृष्टी फिरवूंया.

हीं मुलें 'धुळीनें अंग माखवून' आपल्या आईबापांच्या घराला शोभा आणतात. त्यांच्याशिवाय घराला शोभा नाहीं असें कालीदास म्हणून गेला. तें आजहि आपणाला पटतें. पण तीं शेजाऱ्या पाजाऱ्यांच्याहि आनंदाचीं स्थानें होतात. "मुलांवरून भांडणें" होणें हा मुलांचा दोष नसून आईबापांचा कमकुवतपणा असतो; आपल्या मनांतील इतर बाबींतील किल्मिषें हीं वडील माणसें अशीं या प्रसंगावर लादून त्यांना तोंड फोडतात!— मोठमोठया लढायांनाहि तात्कालिक पोलंडें लागतातच ना?— त्यांतलेंच हेंहि एक!—

त्यांचें तें गोड हास्य, त्यांची दुडदुडी चाल, त्यांच्या लाडीक खोडी, त्यांची बालीश बडबड... मोठमोठया 'लढायां' ना कारण होतील?— नांव नका घेऊं!—

पण हीं मुलें नेहमीच बालीश बडबड करतात असें मात्र मानण्याला मी कबूल होणार नाहीं. त्यांचे खेळ, हालचाली, बडबडी हेतुशून्य असतात. क्षणिक आनंद प्रत्यक्ष प्रसंग येवढ्यानेंच नेहमीं मर्यादित असतात. असें माझ्या अनुभवावरून तरी मला सांगतां येत नाहीं!—

माझा चार साडेचार वर्षांचा भाचा व मी एकदां बैलगाडींत बसून चाललों होतों. नुकतीच विकत घेतलेली पांच शेर साखरेची पुडी त्याच्याजवळ देऊन मी स्वतः बैल-गाडी हांकीत होतों. थोडया वेळानें मी हळूच मागें वळून पहातों—तों स्वारीनें साखरेच्या पुडीला गवताच्या काडीनें एक बारकें भोंक पाडलें आहे; त्यांतून रस्त्यावर दोन दोन कण साखर गळत आहे व तिकडे तो निरखून पहात आहे.

मी किंचित रागानेंच म्हटलें, "हें रे काय हें पुरषा! मूर्खा, साखर खालीं सांडते आहे. दिसत नाहीं का तुला?..."

पण त्यानें मजकडे एकदां वळून पाहिलें नि पूर्वीइतक्याच शांतपणें



खालीं पडणाऱ्या साखरेकडे पहात कुजबुजत गंभीर शब्दांनीं तो म्हणाला, हं, हं! थांबा मामा! पडूं दे! पडूं दे!!—रस्त्यावर खूप मुंग्या असतील ना! त्यांना होईल ती साखर खायला!......"

प्रथम क्षणभर माझा माझ्या कानावर विश्वास बसेना. पण मग हंसावें कीं रागवावें तेंहि मला समजेना. शेवटीं त्या छोट्या जैन महात्म्याकडून मी साखरेची पुडी गपचूप माझ्या ताब्यांत घेतली व रुमालांत बांधून माझ्याजवळ ठेवून दिली.

खरंच, हीं मुलें कधीं कधीं अशीं अतिमानुषपणें बोलतात, त्यावेळीं विस्मयकारक कोडें पडतें.

माझ्या एका स्नेह्याकडे गेलों असतां त्याच्यां सहा वर्षांच्या मुलानें मला 'खिडकींत गप्पा मारावयास' बोलावलें. त्यांच्या गांवीं नुकतीच वीज घेत होते. खांब रोवण्याचें काम चाललें होतें. खांबातून वीज जात नाहीं तर त्याला बांधलेल्या तारांतून असें त्यानें मला पुन्हा पुन्हा 'समजावून' सांगितलें. गणेश चतुर्थीला येणारी वीज दिवाळी होऊन गेली तरी येत नाहीं हा कालावधी मला नीट हिशेब करून पटवला. त्यानें या बाबतींत गणपतीला गाऱ्हाणें घातलें होतें; पण मनाप्रमाणें कांहीं जमलें नाहीं, या प्रसंगावरून त्यानें देवावरील आपली डळमळती श्रद्धाच जणुं स्पष्टपणें माझ्यापुढें मांडली. व शेवटीं तो मला म्हणाला, "ही मुनूसीपाल्टीच अगदीं आळशी बगा! देव तरी काय करणार? या लोकांच्या मनांत येईल तेव्हांच सारें होणार!"

या त्याच्या अर्ध्या तासांतील संवादांतून वाहिलेल्या साऱ्या ज्ञानगंगेनें मी अतिशयच चमकलों. त्याच्या बापानें त्याला संथा दिली असेल या संशयी मनानें मी माझ्या त्या स्नेह्याला प्रश्नहि विचारला. त्याच्या नकारात्मक उद्गारांनीं माझें समाधान झालें नाहीं कीं त्याच्यावर विश्वासहि बसला नाहीं!

पण शेवटीं जातांना जेव्हां तो छोटा विद्वान मला दारापर्यंत पोहोंचवयास आला तेव्हां मी त्याला म्हणालों, "अरे इतक्या आपण गप्पा मारल्या, पण तुझें नांव नाहीं लबाडा सांगितलेंस मला!...." "नाहींच सांगणार नांव!" असें त्याचें त्यावर आलेलें उत्तर ऐकतांच मी चपापून पुढल्या उत्तरासाठीं कान टवकारीत विचारलें "कां रे?" तो माझा हात धरून लडिवाळपणें माझ्याबरोबर चालत हंसत हंसत म्हणाला, "हें पहा, माझें नांव समजलें नाहीं तुम्हाला तर तें समजण्यासाठीं तरी परत याल की नाहीं तुम्ही आमच्याकडे?.... आतांच सांगितलें तर नाहीं येणार तुम्ही पुन्हा आमच्याकडे?...."

मी एकदम धक्का बसल्यासारखें होऊन पुढें कांहींएक न बोलतांच पुढें चालूं लागलों. माझे मधले सारे संशय रसातळाला गेले. पण ही त्या बालकाच्या बुद्धिची, शद्बकोशाची, अनुभवाची साऱ्याच गोष्टींची वाढ मला असामान्य, अगदीं अतिमानुष वाटली.

असलीं विचारी मुलें क्वचितच सांपडतील; तरीपण खेळकरपणा हा मात्र मुलांचा जन्मसिद्ध हक्क!– 'तीं खेळतात कां?' त्यांची येथें उपपत्ति लावून, ऐतिहासिककालच्या जाणीवेचा मानवी मनातील अवशेष कीं भावी आयुष्याची पूर्वतयारी असल्या खोल पाण्यांत आपण न शिरलेलें बरें. त्याला हॉल किंवा ग्रूससारखे अधिकारी शास्त्रज्ञ समर्थ आहेत. ह्या खेळाचें वेड मात्र त्यांना स्वतःलाच असतें असें नव्हे तर तें त्यांचें खेळाचें वेड ते मोठ्या माणसांनाहि लावतात एवढें खरें!–

घोडा घोडा, बुडकुल्यांचा संसार, लपंडाव, या त्यांच्या खेळांचा कित्येकांना तिटकारा येतो! ते खेळ उधळून त्यांच्या भावना ते विनाकारण दुखवतात. पण आपण अगदीं नैसर्गिकपणें नकळत, त्यांच्याशीं समरस झालों तर आपण त्यांच्याबरोबर जमिनीवर लोळत आहों, त्यांच्याशीं गोट्या खेळत आहों, किंवा 'दाटुमाटूचा' खोटा खाऊं अगर भटोभटोच्या



फणसाचे गरे मुठींत घेऊन खात आहों, त्याची चारखंडें गुराऐवजीं आपल्याच वाट्याला येत आहेत, वगैरे गोष्टींचेंहि भानहि रहात नाहीं.

असल्या खेळकर मुलांचा आपल्या आयुष्यांतून होणारा घोर पालट त्यांचा छोटामोठा वियोग!... मोठा जाचणी लावणारा प्रसंगच असतो तो! एक वातावरण सोडून त्याच निर्मल मनानें तीं दुसऱ्या वातावरणांत खेळूं-बागडूं-वाढूंहि लागतात!– पण पुन्हा कधीं त्यांना पहाण्याचा आपल्याला प्रसंग, योग येणार असला तरी तीं त्याच बाळस्थितींत आपणाला दिसणें क्वचित्! ही जाणीव सर्वांत जास्त दुःखद असते!

आणि म्हणूनच त्यांचे साधे सुधे शब्दहि जीवनांत आनंदाचे क्षण आणतात!... या खेळकर मुलांशीं आपणहि हातांतील काम टाकून समरस होऊन खेळतों, हंसतों, बागडतों!... आपल्या जिवाचीं लहान मोठीं दुःखें विसरतों.

पण आपण पॅटमोर कवीप्रमाणें आपल्याच विचारी मनःस्थितींत असलों तर?

तर मात्र तो त्याच्या मुलावर जसा रागावला... तसेंच त्यांच्यावर रागावतो. तो मुलगा जसा दुःखी झाला, मातृविहीन म्हणून स्वतःशींच रडरड रडला, आपल्या खेळाचा सारा पसारा भंवतीं पसरून त्यांतच आपलें मन रंजविण्याचा त्यानें जसा प्रयत्न केला व शेवटीं दमून भागून त्या पसाऱ्यांतच जसा झोपीं गेला, तशींच इतर मुलेंहि करतात. मग पॅटमोर जसा आपल्या वैयक्तिक दुःखें संकटें अडचणी यांतून भानावर आल्यावर, 'आपण आज आपल्या मुलाशीं फार कठोर वागलों' या जाणीवेनें त्याच्या खोलींत जाऊन पश्चात्तप्त मनानें देवाची करुणा भाकतो, कीं "देवा, आम्ही तुझीं बालकें, यांच्यासारख्याच चुका करतों. त्यांच्याहूनहि घोर असे तुझे अपराध करतों व मन रंजविण्यासाठीं या भोवतालच्या पसाऱ्यांत गुंतून शेवटीं असें झोपीं जातो. तेव्हां तूं आमच्यावर दया करतोस. पण आम्ही या मुलाशीं वागतांना मात्र"...

पॅटमोरसारखेंच कधीं कधीं आपल्यालाहि वाटतें.

अशीं हीं फुलें मुलें !... आपल्याला आनंद देतात तशींच ज्ञान देतात. म्हणूनच हीं आपल्या गृहोद्यानांतील फुलें, हीं बालसुमनें, हो, हीं सुमनें... कुस्करूं नका ही सुमनें ! खरेंच–

Scorn not the litt le ones !... you oft will find
They reach the goal, when great ones lag behind.

पण दुर्दैवी चार्ल्स लॅंब !...बापड्याची ही आशा अर्धवट राहिली !... आणि म्हणून त्यानें 'कल्पना–बालकें' खेळविलीं !–

---

चिमूट बारावी

# ० तून १००

" हं !... हांस पाहूं ऽ... हांस ! हांस !– अरे गुलामा, आमच्या सरनां ठोसा दाखवतोस काय ?... "

" तुमच्या पुढली पिढी वेडया ही, आनंद !– अरे, मास्तरांना ती ठोसेच दाखवणार अशी !– पूर्वींचीं गुरुकुलं नि ' गुरुर्देवो ' हें वातावरण गेलं आतां !... "

तो खरोखरच बोळकें उघडून लाळ गळणारें हास्य करीत आपलीं मनगटें चावूं लागला !– आणि आपल्या बापाकडे नि देव मास्तरांकडे पहात पडल्या पडल्या पायाची सायकल फिरवीत राहिला.

" पुरे बरं कां कौतुक, सर, बाळाचं !... चहा निवेल मग..."

" मंदा... मोठा चलाख आहे ग तुझा हा चिमुरडा !– ठोसे दाखवत होता नुक्ता मला !... तुझा कैवार घेऊन मागला सूड तर उगवीत नव्हता ना माझ्यावर ?––"

" इश्श... चला ना सर !– मघां म्हणत होता सव्वा सातला

शिकवणीसाठीं घरीं हजर रहायचंय ठाकुरद्वारला! नि इथं खारलाच आतां सव्वा सहा होऊन गेले आहेत!..."

"पण यानं वेड लावलंन् ना मधें... तुमच्या दोघांचा लाघवी मुलगा तो!... गोड ओढ लावत होता मनाला माझ्या..."

झालरीचा रुमाल घालून दिवाणखान्यामधलें टीपॉय मंदानें सजवलें होतें. त्यावर चहाचे ट्रे व फराळाच्या बशांचें तबक ठेवतांना तिनें हळूच मागें वळून कौतुकानें देव मास्तरांकडे पण विशेषतः आपल्या नवऱ्याकडे पाहिलें.

देव मास्तर दोघांकडेहि पाहून हळूंच हंसले आणि टीपाय्‌सभोवतीं मांडलेल्या खुर्च्यांपैकीं एकीवर बसले.

"किती किती प्रकार केले आहेस ग हे मंदा?" आनंदहि बसत लाडुक शब्द उद्गारला.

मास्तर त्या जोडप्याची नेत्रपल्लवी पाहून पुन्हा गालांतल्या गालांत हंसले.

प्रफुल्लित चेहऱ्यानें मंदा मुकाट्यानें एकेका पदार्थांच्या बशा मास्तरापुढें व आनंदापुढें करीत होती. आणि देव मास्तर साऱ्यांचा आस्वाद अगदीं मिटक्या मारीत घेत होते.

तेवढ्यांत आनंद बायकोकडे पाहत पुन्हां म्हणाला, "सर, आहे कीं नाहीं सुग्रण माझी बायको?"

"पुरे तुमचं कौतुक! चहा घ्या अगोदर." किटलींतून चहा ओतून चमचानें ढवळीत मंदा आनंदाला लटक्या रागानें म्हणाली.

दोघांचे ते प्रेमळ चाळे पहात चहा घेतां घेतां मास्तर हंसले. तोच कपांतले एकदोन घोंट घेत आनंद पुन्हां म्हणाला, "हा चहा पहा, सर अगदीं शंभरापैकीं शंभर मार्क!—"

त्या शब्दांनीं मात्र देव मास्तरांच्या चेहऱ्यावर मुग्ध स्मिताच्या खळ्या झळकल्या. त्यांनीं मंदाकडे हळूंच पहातांच, त्यांच्या त्या सूक्ष्म हास्यानेंही मंदा चमकली.



आणि मुकाट्यानें चाललेल्या त्यांच्या असल्या हालचाली पाहून आनंद शेवटीं दोघांकडे आळीपाळीनें पहात भांबावल्या शब्दांत निष्पापपणें म्हणाला, "सर, हंसलांत हो कां?...नि मंदा अशी चपापलीशी?"

"कांहीं नाहीं रे!..." चहाचा कप खालीं ठेवीत देवमास्तर किंचित् खोचक पण निर्मळ हास्य करीत म्हणाले, "अरे, मंदाला इतके मार्क कधींच दिले नव्हते आम्हीं, ती शाळेंत असतांना!—तेव्हां तुझ्या मार्क देण्याच्या नाविन्यामुळें ती चपापली असेल झालं!—हो ना ग मंदा?..."

मंदा हंसली; पण त्यांत तिच्या मनांतला खूप गोंधळ दिसत होता.

तेवढ्यांत मास्तर पटकन् उठले नि मनगटावरील घड्याळाकडे पहात घाईनें म्हणाले, "अरेच्या, पावणे सात झाले कीं!...या प्रेमळ जोडप्याच्या नि त्यांच्या पहिल्यावहिल्या गोड फुलाच्या सहवासांत वेळ कसा गेला समजलं सुद्धां नाहीं!...बरं...मंडळी...मला रजा घेतलीच पाहिजे तुमची!"

मास्तरांनीं आपली टोपी चढवली!—चपला पायांत घातल्या नि ते त्या पाळण्यांतील छकुल्याचे पुन्हां एकदां गाल कुसकुरून जिना उतरूं लागले.

मंदा व आनंद दोघें फाटकापर्यंत देवमास्तरांना पुढें झालीं. मोटारीचा दरवाजा आनंदनें उघडला, तसा ड्रायव्हर पुढें बसून मोटार जागच्या जागीं आवाज न करतां सुरूं झाली.

मोटारींत पटकन् बसल्यामुळें स्प्रिंगच्या गादीवर मास्तर दोनतीनदां वरखालीं झाले नि त्या आनंदी जोडप्याकडे पहात हात वर करतां करतां सुरू झाली सुद्धां...

० ० ०

—२—

देव मास्तर म्हणजे कोणी केंस पिकलेले, दांत पडलेले एखादे जरठ नव्हते!—सातआठ वर्षं नोकरी केलेला एखादा धंदेवाईक बी. टी. मास्तर

जितक्या वयाचा असेल तितकेंच त्यांचें वय होतें !—

तरुणांच्या नि वाढत्या वयाच्या मुला–मुलींच्या भावभावना, मनाला बोंचणारीं शल्यें, मुग्ध दुःखें, मास्तरांना आपल्या नैसर्गिक सहानुभूतीमुळेंच चांगलीं कळत. आणि म्हणूनच ते शाळेंतल्या मुलामुलींचे आवडते मास्तर झाले होते !—

त्यांचा आवडता विषय म्हणजे भाषा ! शाळेच्या सोयी संभाळण्यासाठीं, त्यांनीं आतांपर्यंत संस्कृत, मराठी, इंग्रजी, इतिहास यांपैकीं सर्व विषय सान्या वर्गांना आलटून पालटून शिकविले होते ! आणि शेवटीं शाळेच्या चालकांच्या संमतीनें, लहान मुलांचें 'प्रत्यक्ष' इंग्रजी व मोठ्यांचें प्रत्यक्षाप्रत्यक्ष मराठी-संस्कृत या विषयावर त्यांची शिक्षकाची भूमिका स्थिर झाली होती !

त्यांतच शाळेंतील एक विद्यार्थिनी म्हणून मंदा त्यांच्या आयुष्यांत अवतरली; नि श्रीमंत घरच्या, सामान्य बुद्धीच्या पण गोड स्वभावाच्या आनंदानें त्यांना चारपांच वर्षांपूर्वीं ट्यूटर नेमलें होतें.

पण त्याच निरनिराळ्या संबंधांत निगडित झालेल्या मंदा-आनंदाच्या जोड संसारांत दीडदोन तास घालवून व त्यांच्या चिमुकल्याचें कौतुक करून, त्यांच्याच मोटारीतून देव मास्तर तसे गिरगांवकडे आज जात होते.

सव्वा वर्षापूर्वीं त्यांना याची जरा देखील कल्पनाहि नव्हती ! आणि म्हणूनच देव मास्तर मोटारींत बसल्या बसल्या तसे स्मित करीत होते.

पण त्यापेक्षां त्यांना गंमत वाटत होती ती पंधरा मिनिटापूर्वीं चहा घेतांना मंदानें शंभरापैकीं शंभर मार्क मिळविले त्याची !

हो, त्यावरूनच त्यांना शाळेंत गाजलेल्या मागल्या एका प्रसंगाची एकदम आठवण झाली !

० ० ०



—३—

तिमाही, सहामाही, नऊमाही परीक्षांचीं सत्रें म्हणजे मास्तरांच्या मिनिटामिनिटाला जीव जाण्याची पाळी ! त्यांतून भाषाविषयाचे परीक्षक म्हणजे तर हालांची अगदीं परमावधिच !

सर्व मुलें आपल्याकडे असलेल्या झाडून साऱ्या अकलेची, परीक्षेच्या औट घटकेच्या काळांत आणि पेपराच्या छोट्याशा लंबचौकोनी जगांत मोठ्या अहमहमिकेनें, मनमुराद प्रदर्शनें करून ठेवणार; पण मग त्यांची वर्गवारी करतांना परीक्षकाच्या एवढ्याशा मेंदूंतील तुटपुंज्या अकलेचे मात्र प्रत्येक पेपरागणिक लचके निघतात !

शेवटीं वांट्याला आलेल्या साऱ्या जाडजूड बंडलांची वासलात लागल्यावर, त्याची अक्कल उरतच नाहीं; मात्र अंगावरून एखादें गंडांतर गेल्याप्रमाणें अगदीं हायसें तेवढें वाटतें ! वर्गाच्या पुढील अभ्यासाच्या रहाटगाडग्यामध्यें तो पुन्हां सांपडल्यामुळें शिक्षकाला स्वतःला शक्य नसतें, पण त्याच्या मेंदूला मात्र दोन दिवस कांहीं एक न करतां अगदीं शांत उताणें पडून रहावेसें वाटतें.

त्यादिवशीं देव मास्तरांची तरी अगदीं हुबेहुब तशीच स्थिति झाली होती.

त्यांत पुन्हां सगळीं बंडलें हमालाप्रमाणें काखोटीला मारून ते शाळेंत शिरल्यापासूनच मुला–मुलींचे घोळके त्यांच्या भोंवतीभोंवती फिरूं लागले होते.

आज निदान प्रत्येकाची अक्कल प्रत्येकाच्या पदरांत टाकण्यास व त्यांचीं तोंडें बंद करण्यास तरी आपण समर्थ आहोंत, या कल्पनेनें त्यांनीं सारीं बंडलें, आपल्या छोट्याशा खणांत मावत नसतांही बळजबरीनें कोंबलीं; आणि मुलांना ते हंसतहंसतच म्हणाले, "चलारे पळा पोरानों, तासाप्रमाणें पेपर देईन सर्वांना !—जा—! त्या वेळीं कळतील सर्वांच्या अक्कलेचे तुटलेले तारे !—"

० ० ०

-४-

शेवटीं देव मास्तरांचा सहावीवरील सहावा मराठी तास आला.

तें बंडल घेऊन धिम्या चालीनें आंत शिरतांना पाहून वर्गांतील सर्व मुलांच्या चेहऱ्यावर उत्सुकता ओतप्रत झळकून गेली.

पुढेंच बसलेल्या मुलींच्या बाकांकडून मंद सळसळाट व कुजबुज ऐकूं आली.

दोन दोन वर्षें वारी करीत असलेली मागल्या बांकावरील मुलें, मध्येंच एखादा शब्द पुटपुटून वर्गांतील शांततेला अधिकच गांभीर्य आणीत होतीं !--

देव मास्तरांनीं खुर्ची थोडी मागें कलवली. पेपरांचें बंडल सोडलें, व सर्व वर्गामधून एकदां दृष्टि फिरवून आपल्या नेहमींच्याच सस्मित मुखानें नि खेळकरपणें ते म्हणाले, "हं! तुम्हां सर्वांच्या एकत्र अकलेचें हें पुडकें! नुकतेंच तें मी सोडलें आहे तुमच्यापुढें! पण मग एक हं मात्र! मास्तर म्हणजे कांहीं यंत्र समजूं नका!-आणि त्याच्या हातांतील लठ्ठ तांबडी पन्सिल ही कांहीं अचूक वजन करणारा तराजू नसते!-मास्तरांनीं तपासून आणलेला एक एक पेपर म्हणजे फार तर एक आरसा म्हणायला हरकत नाहीं! त्यांत निदान अगदीं हुबेहुब नसलें तरी आपलें साधारण प्रतिबिंब दिसायला तर मुळींच हरकत नसते, प्रत्येकाला! तेव्हां तुमचे हे दिव्य आरसे आतां तुमच्या हातीं देतों मी!"

० ० ०

-५-

तवढ्यांतच पुढें बसलेल्या मुलींमध्यें किंचित् काळ वादळ उत्पन्न झालें!

एक मुलगी झटकन् उठून उभी राहिली! काळी सावळीच होती! पण पोशाखांतील मोहक टापटीप व वेषभूषेचें वेंचक कौशल्य यामुळें कोणाच्याही दृष्टीला क्षणभर तेथें थबकावेंसें वाटलें असतें.



तिला मध्येंच एकदम उभें राहिलेलें पाहून, देव तिकडे पहात सौजन्यानें म्हणाले, "काय पाहिजे आहे तुम्हांला हसबनीस ?"

"सर, मार्क मोठ्यानें वाचून दाखवूं नका!" किंचित् हुकमी आवाजांतच नि तोऱ्याने ती मास्तरांना म्हणाली.

"कां बरं?" मास्तर तरीहि सौम्यपणें हंसत म्हणाले, "हें पुडकें सर्व वर्गाच्याच मालकीचें आहे, माझ्या मतें!-तेव्हां मार्कच नाहीं-तर मी आंतला मजकूर सुद्धां मोठ्यानें वाचून दाखवूं शकतों! अहो, अकलेचें प्रदर्शन अनेक प्रकारचें असतें!...आणि आपल्या बरोबरीच्या व्यक्तींची अकल समजून घेण्याचा प्रत्येकाला अधिकार असते !..."

"बस ग मंदाकिनी" असें कोणातरी मुलीनें हळूंच सुचविल्यामुळें किंचित् गाल फुगवून, रागानेंच मास्तरांकडे पहात हसबनीस खालीं बसली.

कांहीं मुलें मास्तरांचे उद्गार ऐकून सौम्यपणें हंसली; नि कांहींना कारण नसतांना डांग्या खोकला झाला!...

तेवढ्यांतच मास्तरांनीं एकामागून एक नंबरांप्रमाणें हातीं येणारा पेपर देण्यास सुरवात केली.

कांहींचे पेपर नुसते मार्क सांगून परत करायचे; कांहींच्या पेपरांतला एखादा सुंदर तुकडा वाचून दाखवायचा, कांहींच्या सगळ्या पेपराची स्तुती करायची असें चाललें होतें त्यांचें.

शेवटीं हसबनीसांचा पेपर आला.

देव मास्तर क्षणभरच हंसले. तेव्हां वर्गांत कुजबुज झाली.

त्यांनीं तो पेपर हातांत घेतला, हळूंच पहिल्या दोन तीन बाकांकडे दृष्टी फिरवली नि मग हंसत हंसत तो पेपर हातांत चाळवीत ते म्हणाले, "कांहीं पेपरांनीं माझी फार फार करमणूक केला बुवा!- त्यांतल्या एका

प्रश्नावर किंबहुना एकेका वाक्यावर पंधरा पंधरा मिनिटें हांसण्यातच निघून गेलीं माझीं!... नि म्हणूनच तुम्हाला पेपर द्यायला दोनतीन दिवस उशीर झाला मला!..."

बोलतां बोलतां मास्तर क्षणभर थांबले; तेवढ्यांतच काहीं ठिकाणाहून टांस लागल्याचे, खोकल्याचे नि कुजबुजण्याचे आवाज ऐकूं आले.

मास्तर आज विशेष खोंचक बोलण्याचेंच ठरवून आले होते.

कारण ते पटकन् पुढें बोलूं लागले, "उदाहरणार्थ, हा पेपर पहा... वरवर चाळला तर तीनचार पानें लिहिलेलीं दिसतात!...अक्षर न समजण्याइतकें वाईट आहे, म्हणून तर मी कुतूहलानें संशोधक बनलों!... मातेचे हाल मुलगा करतो म्हणतात....पण मातृभाषेचे इतके हाल दुसऱ्या कोणीच केले नसतील! तेव्हां तपासतांना प्रस्तुत उदयोन्मुख लेखिकेची किंवा माझी कींव येण्याऐवजीं आपल्या मायबोलीचीच मला अधिक कींव आली!"

पुढल्या बांकावर एक रागीट चेहरा तांबडाबुंद झाला होता. पण तरी मास्तर आज निष्ठुर बनले होते!—त्यांना आपल्या मनांतले विचार सर्वांसमक्ष उघड करून टाकायचे होते!—

देव क्षणभरच थांबून म्हणाले, "पेपर चार वेळां चाळला. तीन वेळां वाचला. दोनतीन वेळां खालीं ठेवला. पण शंभरापैकीं एक मार्क द्यावासा वाटेना! तेव्हां शंभरापैकीं दोन शून्यें तेवढीं दिलीं आहेत...कारण यांतल्या मजकुराचे हे नमुने प्रत्यक्षच पहा!—"

तितक्यांतच हसबनीस तडकन् उठून उभी राहिली. तिचा चेहरा गोरामोरा झाला होता. डोळ्यांत मास्तरांबद्दलचा मनस्वी राग तरंगत होता. ओठ किंचित् थरथरत होते. शेवटीं अडखळतच ती रागानें म्हणाली, "वाचूं नका सर! पेपर फाडून टाका पाहिजे तर!"

त्या उद्गारांनीं, उघडलेलें पेपराचें पान पुन्हां बंद करून देव मास्तर किंचित् थांबले.



त्यांना वाटलें, "कशाला उगीच अतिरेक करा."

आणि त्यांनीं तो पेपर तसाच बाजूला ठेवला; व त्यापुढले पेपर एकामागून एक जरूर तेथें थांबत वाचूनहि टाकले.

० ० ०

—६—

शेवटीं उरलेला हसबनीसांचा पेपर पुन्हां हातांत घेऊन ते म्हणाले, "बरं,हसबनीस, नऊमाही तर आतां संपली. तुमच्या बाकीच्या पेपरांची माहिती नाहीं मला! पण पुढल्या परीक्षेंत असंबद्ध लेखनाचा मराठी विक्रम तरी करूं नका! अं ऽ! त्यासाठीं पदक ठेवलेलं नाहीं कुणी! या,... घेऊन जा तुमचा पेपर..."

पण मंदाकिनी बसल्याबसल्या जास्तच फणफणत होती.

मास्तरांबद्दल आलेला राग तिला आवरतां आवरत नव्हता. तिचे डोळे अगदीं लालबुंद झाले होते.

मास्तरनीं दोनदा आर्जवानें सांगितलें; तरी ती जागेवरून उठली नाहीं.

किंचित् आश्चर्यानें मास्तर पुन्हां म्हणाले, "हं, हं! हसबनीस, घेऊन जा तुमचा पेपर पाहूं! अशा रागावतां कां उगीच!..."

"तुम्हांलाच ठेवा तो पेपर, सर!" एकदम चिडखोर आवाजांत व बेफिकीरपणें मंदाकिनी म्हणाली.

अगदीं कानशिलांत बसल्याप्रमाणेंच मास्तर चपापले! तिच्या त्या उद्गारांतून, त्यांच्याबद्दलच्या तिच्या मनांतल्या उपमर्दकारक भावनेचा त्यांना वास आला.

आतांपर्यंत महिन्यामागून महिने चालत आलेली हसबनीसची बेफिकीरी, वर्गांतील दुर्लक्ष, अभ्यासांतील बेबंदशाही, सर्व देव मास्तरांनीं खेळकर नि गोड पद्धतीनें टोलवीत आणलें होतें!...पण आज नाइलाज म्हणूनच त्यांनीं हा मार्ग अवलंबवून पहाण्याचें ठरविलें होतें.

त्या वेळींहि हसबनीसची इतकी बेपर्वाई पाहून मास्तर मुद्दामच किंचित् आवाज चढवून म्हणाले, "मी काय सांगतों आहे, हसबनीस? कांहीं एक गडबड न करतां पेपर घेऊन जा प्रथम तुमचा!–"

नेहमींच गोड पद्धतीनें वागणाऱ्या मास्तरांच्या आवाजांतील ती कठोरता व स्फोट झाल्याप्रमाणें बाहेर आलेली ती त्यांच्या वृत्तींतील अनपेक्षित हुकमी झांक जाणवून मात्र हसबनीस दचकली आणि पटकन् उठली.

पाय आपटतच ती टेबलापर्यंत आली; आपला पेपर तिनें खसकन् टेबलावरून ओढून घेतला!–आणि पुन्हां तशीच बेफिकीरीनें पावलें आपटत ती आपल्या जागेवर जाऊन धबकन् बसली.

वर्गांत क्षणभर किंचित् गोंधळ झाला!

पण मास्तर आपली शांतता थोडीदेखील ढळूं न देतां तिच्याकडे वळून पुन्हां म्हणाले, "रागावूं नका हसबनीस–यावरून धडा घेऊन पुढें प्रगति करा! याच यत्तेंतलं आतां तुमचं दुसरंहि वर्ष संपलं!–नाहीं? मराठी भाषा – काय कठीण होता पेपर? पण मी वर्गांत बोलतों इथं तेव्हां तुम्हीं नेहमीं स्वतःच शेजारणीशीं किंवा स्वतःच्या मनाशींच बोलत असतां! त्यामुळें पहिल्या बांकावर बसूनही तुम्हांस तें कांहीं ऐकूं येत नाहीं! मग त्याला आतां मी काय करणार सांगा?–त्या मागल्या बांकावर बसूनहि नेवरेकर पहिला आला, आणि तुम्ही दोन वर्षांनंतरहि दोन शून्यें मिळवितां! शून्यें वाढवून मार्क वाढत नाहींत!–तेव्हां......"

तेवढ्यांतच पहिल्या बांकाच्या दिशेनें कागद टारटार फाडल्याचा व बांगड्या खळखळल्याचा आवाज ऐकूं आला.

० ० ०

–७–

वर्गांतील सर्वांनीं तिकडे पाहिलें तों मंदाकिनी हसबनीस पेपरच्या



चिंधड्या पायाखालीं टाकून त्यावर आपल्या चपला रागारागानें ओढत असल्याचें त्यांना दिसलें!

या वेळीं मात्र देव मास्तरांचा चेहरा एकदम गंभीर झाला. त्यांचें नेहमींचें हास्य त्यांना सोडून गेलें! त्यांची रोजची प्रेमळ खेळकर वृत्ति कोठल्या कोठें लुप्त झाली.

ते थरथरत्या ओठानें एकदम खुर्चीवरून उठून मोठ्यानें अडखळत ओरडले, "उभ्या रहा–हसबनीस–!—"

हसबनीसनें एकदां मास्तरांकडे बेफिकीरीनें पाहिलें, व ती तशीच जागेवर बसून राहिली.

मास्तर खुर्चीवरून उठले, स्टेजवरून खालीं उतरले, व पुन्हां तिला रागानें ओरडले, "हसबनीस, आवां बांकावर उभ्या रहा!–"

हसबनीसनें तरीहि कांहीं हालचाल केली नाहीं! मुली तिच्याकडे व देव मास्तरांकडे आश्चर्यानें व घाबऱ्या चेहऱ्यानें आलटून पालटून पाहूं लागल्या.

मास्तर जवळ जवळ रागानें बेफाम होऊनच तिच्या बांकाजवळ झप झप पावलें टाकत पोंचले, व मग मोठ्यानें म्हणाले, "एखादा मुलगा असता तर...? प्रथम उभ्या रहा व वर्गाबाहेर चालत्या व्हा! माझ्या वर्गांत बसण्याची तुमची मुळींच लायकी नाहीं; मी सांगेपर्यंत येऊं नका पुन्हां!"

मास्तरांच्या आवाजांतील जोरदारपणा एकदम जाणवून, हसबनीस शेवटीं यंत्रासारखी पटकन् उभी राहिली!

तिचे डोळे आतां तर पाण्यानें डबडबले होते—

साराच अनपेक्षित प्रकार! सहावींतल्या मुलीला बांकावर उभें रहाण्याची व वर्गाबाहेर जाण्याची शिक्षा! यामुळें साऱ्या मुलांना गोंधळ उडाला होता. आपापसांत कुजबुज करण्याचेंहि त्यांना भान राहिलें नव्हतें.

विशेषतः देव सरचा असला हा नरसिंह अवतार आजपर्यंत कोणीच पाहिला नव्हता.

तोंच, देव मास्तरांकडे एकदां टवकारून पाहून हसबनीस पटकन जागची उठली, दण दण पावलें टाकीत ती मास्तरांच्या अंगावरून दारापर्यंत गेली, व दारांतून मागें वळून रडक्या पिचक्या आवाजांत पण फणकाऱ्यानें त्यांना म्हणाली, "मी हेडसरनांच जाऊन आतां सांगतें पहा!"

त्यावर देव मास्तर कांहींच बोलले नाहींत!—

ती निघून गेल्यावर ते शांतपणें खुर्चीवर बसले. त्यांनीं कपाळावरचा घाम पुसला व घंटेची वाट पहात ते क्षणभर स्वस्थ बसले!—

वर्गांत स्मशानशांतता होती!...

शेवटीं ते एकदम उठत म्हणाले, "मित्रांनों, माझा कोणाचबद्दल अनादर नाहीं! मघा रागावलों खरा मी पण त्यांत कसला स्वार्थ नव्हता!— तुमचंच हित होतं—"

इतकें बोलून मास्तर दारापर्यंत जातात तोंच घंटेचाही टोला पडला.

० ० ०

—८—

"कां देव, आतां ऑफ वाटतं?" जिन्याच्या पायऱ्या मंदमंद उतरत मास्तर खालीं शिक्षकांच्या खोलीकडे येत असतां, त्यांच्या एका सहाध्यापकानें त्यांना विचारलें.

"हं! दोन्ही!" देव मास्तर अगदीं निष्प्राण शब्दांत म्हणाले.

वास्तविक असल्या एका वर्गावरून जातां येतां चारदोन वाक्यांच्या देवाण-घेवाणींत शिक्षकांना नवा हुरूप यावयास वेळ लागत नाहीं—

आणि देव मास्तर तर अशा प्रसंगीं साध्या सोज्वळ विनोदी उद्गारांतच नेहमीं उत्तर द्यावयाचे—"अहो परवांची ती फेनोलेटची कल्पक जाहिरात वाचलीत? म्हणे नेपोलियन म्हणतो—'सैन्यें पोटावर चालतात!'



आणि आपण मास्तर मंडळी? ऑफ पिरीयडवर जगतों न् शिकवतों!"

पण अशा प्रकारें कांहीं तरी विनोद करून हंसण्या-हंसवण्याची देवांची आज मनःस्थिति नव्हती. त्यांच्या डोळ्यांपुढें दहा मिनिटांपूर्वी सहावींत घडलेला तो प्रसंग सारखा उभा रहात होता.

ते शिक्षकांच्या खोलींत शिरले. हातांतील पुस्तकें-कॅटलॉग टेबलावर टाकून ते कोपऱ्यांतील वॉशबेसीनजवळ गेले. पांचसहा वेळां त्यांनीं आपलें तोंड स्वच्छ धुतलें. व मग रुमालानें तें पुसत पुसत त्यांनीं आपल्याभोंवती आपली चष्मा काढल्यामुळें अधू झालेली दृष्टी फिरवली.

आणि आपल्याशिवाय कोणालाच ऑफ नाहीं हें पाहून त्यांना त्यांतल्या त्यांत हायसें वाटलें. त्यांना त्या वेळीं अगदीं शांतता पाहिजे होती.

'हुश्श' करीत बाजूच्या आराखुर्चीवर पाय पसरून बसून देव मास्तर उगीच सीलिंगकडे टक लावून पहात स्थिरपणें पडून राहिले.

० ० ०

—९—

सुरवातीला शिक्षकाचा पेशा त्यांनीं पत्करला; तेव्हांपासूनच्या त्यांच्या गेल्या सातआठ वर्षांच्या आयुष्यांत ते वर्गांत असे कधीं रागावल्याचें त्यांना मुळींच आठवत नव्हतें. लहान मुलांपासून तों अगदीं मोठ्या मुलींपर्यंत साऱ्यांनीं त्यांच्याकडे येऊन, त्यांना अत्यंत मोकळ्या मनानें आपल्या मनांतल्या गुह्य गोष्टी मित्राप्रमाणें सांगाव्यात, अशीच त्यांची त्यांच्याबरोबरची प्रेमळ वागणूक होती...

मग आज ते वर्गांत इतके रागावले कां हसबनीसवर?—

उंटाला म्हणतात, शेवटच्या काडीचा जास्तींत जास्त भार होतो.

देव मास्तरांच्या मनःस्थितीवर हसबनीसनेंहि आज अशाच प्रकारचें दडपण घातलें होतें! आणि त्यामुळेंच मास्तरांचें मन आज एकाएकीं तिच्याविरुद्ध इतकें बिथरलें होतें—

एक विद्यार्थिनी या दृष्टीनें हसबनीसला ते आपल्या मास्तरकीच्या सुरवातीपासून पहात आले होते.

पहिल्या वर्षी पहिला, दुसऱ्या वर्षी पंधरावा व तिसऱ्या वर्षी तिचा पंचविसावा नंबर झाला होता. आणि नंबराबरोबरच तिच्या वयाचीही वाढ होत गेली होती. प्रथम फ्रॉक, नंतर परकर पोलका, व तिसरीच्या दुसऱ्या सहामाहींत ती साडी नेसूं लागली होती.

पहिलीदुसरींत असतांना तिचे बालिश डोळे व निष्पाप हास्य तिच्या सांवळ्या वर्णालाहि शोभून दिसे. ती लाडुकपणा करूं लागली म्हणजे देव मास्तरहि तिला जिभा काढून वांकुल्या दाखवीत. तिच्या डोळ्यांची उघडझांप लौकर लौकर झाली कीं तिच्या शेंपट्यांतील फितेनें ते तिच्या डोळ्याला गुदगुल्या करीत. एकदोनदां तर त्यांनीं लाडुकपणें तिच्या गालावर हळूच चापट्याहि मारल्या होत्या.

० ० ०

–१०–

पण एके दिवशीं मंदा साडी नेसून वर्गांत उशीरांच शिरल्यावर देवमास्तर किंचित् चपापले.

महिन्याभरांत ती गार्टर्स लावूं लागल्यावर देव मास्तर अधिकच भांबावले.

तिसरीच्या नऊमाहीच्या सुरवातीस ती खूपशी पावडर व सेंट लावून आलेली पाहून देव मास्तरांनीं नक्की ठरवलें.... 'मंदा आतां पूर्वीची राहिली नाहीं. तिच्यापासून शक्य तितकें लांब राहिलेलें बरें!'

दुसऱ्या दिवसापासून मास्तरांनीं मंदाला 'अहो' म्हणावयास सुरवात केली.

चौथीमध्यें असताना मंदा एक दिवस देव मास्तरांजवळ इंग्रजी



निबंधवहीतील चुका समजून घ्यायला आली होती. तिचा त्या दिवशींचा नोंकझोंक विशेषच होता. स्नो, पावडर, सेंटचा भपकारा येत होता. मिनिटामिनिटाला ती पदर सांवरीत होती. आपला शेपटा पुढेंमागें चाळवीत होती, रुमाल काढून तोंडावर न आलेला घाम वरच्यावर टिपत होती. तिचे डोळे सारखे तरळतेनें फिरत होते. हास्यांत नाटकीपणा होताच पण त्याहून अधिक म्हणजे पूर्वीचा निर्भयपणा, व निष्पापपणा तिला साफ सोडून गेला होता.—

मास्तरांना त्यावेळीं मनांत वाटलें– "काय पोरींची उफाड्यानें वाढ होते ही? मनःस्थितींत काय झरझर बदल पडतो?"...

वर्गात अभ्यासांतील प्रश्नांना उत्तर देतांनासुद्धा मंदाचे डोळे मास्तरांकडे चोरून चोरून फिरत, खालीं पहात, क्षणांत हंसत, क्षणांत चमकत,...उत्तर मात्र देतां येत नसे. लक्ष ठिकाणावर असणार तेव्हांच ना!

लक्षच काय पण तिचें एकही पुस्तक किंवा वही ठिकाणावर नसे. शेवटीं देव मास्तरांनीं तिला थट्टेनें पण खोंचकपणें एकदां भर वर्गांत सांगितलेंच, "हसबनीस, पुढल्यावेळीं पुस्तक विसरलें ही सबब चालायची नाहीं हं! एक वेळ तुम्ही स्वतःला घरीं विसरलांत आणि पुस्तक तेवढेंच मोटारींतून शाळेंत पाठवून दिलेंत तरी आम्हाला चालेल!"

त्या वर्षी ती चौथींत जेमतेम पास झाली. पांचवींत आल्यापासून तर तिच्या साड्या रोज रंग बदलूं लागल्या. गोल पातळें नि त्यांना जुळून दिसणारे ब्लाऊझ ती मिरवूं लागली... पहिल्या सहामाहीच्या शेवटीं तर ती दुपारच्या सुटींत मोटारींतून घरीं जाई नी परत येई ती एखादें नवें पातळ नेसून...

तो भयंकर पालट मास्तरांना कांहींसा जाचक वाटला; आणि म्हणूनच ते तिच्याशीं अगदीं बेफिकीरीनेंच वागूं लागले, तिच्याकडे अनोळखी नजरेनें नि शुष्क डोळ्यांनीं पाहूं लागले.

० ० ०

-११-

पंधरा दिवसांवर पांचवीची परीक्षा असतांनाचा प्रसंग!–

आपल्या बरोबरीच्या शिक्षकांच्या केवळ गमतीच्या आग्रहानें, देव मास्तरांनीं एक अगदीं अपटुडेट डिझाइनचा लोंकरी सूट शिवला होता. तो चढवून ते शाळेंत पहिल्यानेंच आले. काळजीपूर्वक भांग पाडून त्यांनीं हॅट चढवली होती. आणि त्या दिवशीं मास्तर–मुलें–मुली सर्वांनींच दोन गमतीच्या शब्दांनीं देव मास्तरांची, आगाऊ अपेक्षेप्रमाणें थट्टा केली होती!

दुपारीं एका वर्गावरचा तास संपवूनन देव जिना उतरून खालीं येत होते; आज त्यांची त्यांनाच गंमत वाटत होती. आपल्या बोडक्या वेशभूषेची सहज जाणीव होऊन त्यांनीं हळूच आपल्या भांग पाडलेल्या केसांवरून चालतां चालतां हात फिरवला.

तोंच, समोरून कोणीतरी 'पाहिलं बरं ऽ...' अशा अर्थानें नाजुक खोकल्याचा आवाज कानावर पडला व देव मास्तर भानावर आले! त्यांनीं पाहिलें तो मंदा वर चढून येत होती!–तेवढ्यातेवढ्यांत आणखी कोणी नव्हतें!—

ते निष्पापपणें किंचित् हंसले नि लाजले...तोंच मंदा भरकन् दोन पावलांत त्यांच्याजवळ येऊन थबकली नि त्यांच्या हाताला हळूंच आपला किंचित् स्पर्श करून ती आधिऱ्या शब्दांत उतावीळपणें म्हणाली, "वा:! किती किती सुंदर दिसतां, सर, तुम्ही आज या पोशाखांत?..."

मास्तर केवढयानें चपापले; इंगळी डंसल्याप्रमाणें त्यांनीं मंदाकडे पाहिलें!

त्याच मंदाच्या हाताचा स्पर्श त्यांना पूर्वी कितीदां तरी झाला होता. त्यांच्याशीं ती पूर्वीहि कितीदां तरी लाडुकपणें बोलली होती, गोडव्यानें हंसली होती!–

पण मंदाचा आजचा स्पर्श हा स्त्रीचा स्पर्श होता! तिच्या हास्यांत पूर्वी कधीं न दिसलेली विलासी झांक होती!–तिच्या चंचल अस्थिर डोळ्यांत भयंकर मादकता होती! तिचा चेहरा मनांतील खोल भावना-कल्लोळांनीं अगदीं लालबुंद झाला होता!



आणि त्या अनपेक्षित दृश्यानें नि अनुभवानेंच देव मास्तर इतके जोरानें चपापले होते!...प्रथम क्षणभर ते भांबावले; पण मग आपली कठोर दृष्टि तिच्याकडे रोखली!

पण त्यापूर्वीच मंदानें घाबरल्या चेहऱ्यानें, किंचित् चमकून नि कांहीं तरी चुकलेसें वाटून एकदम तोंड फिरवलें होतें! व ती जिन्याच्या आठदहा पायऱ्या भरभर चढून वरहि गेली होती!–

दुसऱ्याच दिवशीं देव मास्तरांचा सूट त्यांना कल्पनाहि नसतांना त्यांच्या ट्रंकेच्या आश्रयाला गेला.

दोन दिवस त्यांना अगदीं बेचैन वाटलें नि एखाद्या पित्याप्रमाणें किंवा जबाबदारी अंगावर पडलेल्या प्रेमळ भावाप्रमाणें त्यांना सारखें वाटूं लागलें, "आमच्या मंदाचं आतां लग्न केव्हां होणार बरं?–"

० ० ०

त्या दिवशीं घडलेल्या प्रसंगानंतर देव मास्तर मंदाबरोबर वर्गा-शिवाय व अगदीं जरूर असल्याशिवाय एक अक्षरहि बोलले नाहींत.

दिवा-स्वप्नें नि नटणें–मुरडणें...यामुळें मंदाला फारसा वेळ मिळत नसे. तिच्या बोलण्यांत, वागण्यांत...प्रत्येक हालचालींत...आपल्या अधि-काधिक विकसित होणाऱ्या तारुण्याची पूर्ण जाणीव ओतप्रोत भरलेली दिसे. ती दिवसेंदिवस धांदरट, बावरलेली, वारा प्यालेल्या वासरासारखी दिसूं लागली...

आपल्या अभ्यासांतील अज्ञानाची जागा आपल्या तारुण्यानें, मोहक-तेनें भरून निघावी अशी तिची मोठी अपेक्षा!...पण ती मात्र कधींच सफळ झाली नाहीं. त्यामुळेंच तिची गाडी मधून मधून सायडिंग घेत पुढल्या चार वर्षांत सहाव्या स्टेशनाजवळपास घोंटाळत होती!–

नि आज मंदाच्या सहावींतल्या दुसऱ्या वर्षातील नऊमाहीच्या वेळीं, एका पेपरामुळें वर्गांत घडलेला तो प्रसंग!–

० ० ०

–१२–

देव मास्तरांपुढून, खुर्चीवर बसल्याबसल्या मंदाचा हा शाळेंतील धांवता इतिहास, भरभर सरकून गेला. नि त्यांना क्षणभर कोंडल्यासारखें वाटलें–

––आणि मग ते स्वतःशींच म्हणाले, "उगाच रागावलों मी!– मंदाचा तरी दोष काय त्यांत?...तिची वाढच झपाट्यानें झाली आहे!... तिची दृष्टी एखाद्या साध्या सामान्य मुलीची आहे!–मग शिकण्यापेक्षां संसार करण्याची तिची महत्त्वाकांक्षा अधिक जोरदार असतांना...तिला औपरोधिक भाषेनें वर्गांतच उपदेश करून जागे करणारे असे कोण आम्ही? आणि ताळ्यावर आणणें म्हणजे तरी काय सांगणार आम्ही–अभ्यास कर! अभ्यास कर!!...पण पुढें? कशाला? शेवटीं लग्न करायलाच ना!!... श्रीमंत बापाची आईविना मुलगी...मोटारींतून रोज येणार... नटणार...थटणार... विलासी वृत्तीनें जगाकडे व आपल्या तारुण्याकडे बघणार!.... आणि आम्ही तिच्या मनाचा प्रबळ प्रवाह अडवून म्हणणार.... 'अभ्यास कर! मंदा, अभ्यास कर!...' मग का नाहीं चिडणार ती!... माझ्यावर, पेपरावर न् आपल्या मायबोली..."

देव मास्तर असल्या विचारांनीं आपल्याशींच हंसले!– त्यांच्या मनांत पुन्हां पुढें विचार आले, "पण 'माझं लग्न करा' म्हणून कोणाला सांगणार ती? मुलींना शिकविण्याच्या आजच्या फॅशनला पालक बळी पडले असतील! आम्ही सांगणार 'अभ्यास कर!' 'मंदा लग्न कर' म्हणून मात्र कोणीच सांगणार नाहीं तिला!–आणि 'लग्न करतें' म्हणून कोणालाच सांगण्याची तर तिच्याहि भीरू मनाची छाती नाहीं!... तोंड दाबून..."



देव मास्तर पटकन् खुर्चीवरून उठले. त्यांना वाटलें, तिला आपण मघाशीं उगीच दुखविलें; त्या ऐवजीं तिच्या कलानेंच सारें घेतलें पाहिजे होतें.

वर्गांत जाऊन बसायला तिला सांगावें व तिची समजूत करावी या कल्पनेनें तिची चौकशी करायला ते शिक्षकांच्या खोलींतून बाहेर पडले.

० ० ०

–१३–

"हसबनीस मुलींच्या खोलींत रडत बसली आहे!...मघाशीं कोणी दोघी बाया मोटारींतून आल्या आहेत, त्या तिची सारखी समजूत करीत आहेत." रामा शिपायानें त्यांना बातमी दिली.

त्यांना आश्चर्य वाटलें. ते तसेच मुलींच्या खोलीकडे लगबगीनें गेले.

मंदाकिनी खरोखरच रडत होती. दोघी वयस्क बायका तिची समजूत करीत होत्या. वर्ग चालू असल्यामुळें खोलींत आणखी कोणीच नव्हतें.

देव मास्तर दाराशीं पोहोंचले. त्यांना लांबून येतांना पहातांच मंदाकिनी पाठ फिरवून बसली व शाली घेतलेल्या जवळच्या बाया मास्तरांकडे टवकारून पाहूं लागल्या––

मास्तर आंत शिरून मंदाकिनीला उद्देशून हळुवार शब्दांत म्हणाले, "रागावूं नका, हसबनीस!–तुमच्या फायद्यासाठींच बोललों मीं मघां... जा!–वर्गांत जाऊन बसा जा!..."

पण तेवढ्यांत मंदाला जवळ पोटाशीं घेऊन, त्या दोघींपैकीं खूपशी पावडर लावलेली एक सौभाग्यवती कडाडून म्हणाली, "पुरे...मानभावीपणा पुरे बरं कां, मास्तर! तिची समजूत करायला मी तिची मावशी समर्थ आहें, तुम्ही आपल्या कामाला जा!...आम्हाला काय सांगायचंय तें सरळ प्रिन्सिपॉलनां सांगूच आम्ही!...तुम्हीं नको मधें यायला इथं!..."

मास्तरांना मंदाच्या मावशीच्या त्या घमेंडखोर व बेफिकीर उद्गारां-

तील श्रीमंत नि बडेजाव अत्यंत अपमानास्पद व जाचक वाटला. पण त्यानीं मनावर शक्य तितका ताबा मिळवून तोंड फिरवलें !

० ० ०

–१४–

दहा मिनिटांनीं शिपाई आला व देव मास्तरांना म्हणाला, " सर तुम्हाला प्रिन्सिपॉल बोलावताहेत ! "––

देवमास्तरांनीं हातांतील वळलेली 'ब्लॅकलायन्' सिगारेट एक झुरका मारून खालीं टाकली. व ते रुमालानें तोंड पुसून ऑफिसच्या बाजूस वळले...

वाटोळ्या खुर्चीवर बसले होते प्रिन्सिपॉलसाहेब. त्यांच्यापुढें देव उभे रहातांच, ते त्यांना किंचित हंसत म्हणाले, " देव, कधी नाहीं तो काय गोंधळ केलात हो हा आज ? आतां कसं करायचं ?... सहावींतल्या मुलीला बांकावर उभी न् वर्गाबाहेर... "

" मग काय करणार सर ? " देवहि मुद्दामच हंसून मध्येंच म्हणाले, " मुलींसाठीं नसली तरीपण मास्तरांची छडीहि काढून घेतलीच आहे आतां डिपार्टमेंटनं !... आतां मोठा प्रश्नच आहे !... वर्गाबाहेर घालवण्यालाहि मुहूर्त पहायचं ठरवलं म्हणजे..."

" ते कांहीं असो... " प्रिन्सिपॉल थोडे कठोरपणें त्यांना मध्येंच थांबवून म्हणाले, " ही मुलगी डोनरच्या नात्यांतली, आणि असं पहा... तिच्या वडलांपेक्षां तिच्या मावशीचाच तिला लळा जास्त... वडील श्रीमंत व्यापारी आहेत... पण त्यांना वेळ मिळत नाहीं !... स्वतः मावशीच आली होती मघां तक्रार करायला–"

" ती मघांशीं तिची समजूत घालत होती मुलींच्या खोलींत ती पावडर लावलेली प्रौढ बाईच ना तिची मावशी ?" देव मास्तर शांतपणेंच म्हणाले. " वडलांना वेळ नसतो म्हणून संभाळ करायला मुलींना शाळेंत कशाला पाठवायला पाहिजे वर्षांमागून वर्षं !... सर्वांनाच एक सोपा उपाय आहे ?... नाहीं कां ?"



उपाय समजावा म्हणून पुन्हां जरा सौम्य शब्दांतच अधीरतेनें नि त्रासिक चेहऱ्यानें प्रिन्सिपॉल म्हणाले, " कसला उपाय म्हणतां ? "

" तिचा संभाळ करायला नवरा शोधून काढावा चांगलासा... तिचा लळा असलेल्या मावशीनें, नाहीं तर वेळ मिळत नसलेल्या वडलांनीं !" देव पटकन् पुढें म्हणाले, " मावशीनें पाठीवरून हात फिरवून का आतां समजूत होणार आहे तिची ? लग्नाला योग्य जाहली– "

प्रिन्सिपॉल त्या उत्तरानें पटकन् रावावले नि म्हणाले, " नाहीं तेंच कशाला सांगता आहां देव !... आतां झालेलं निस्तरायचं कसं तेवढं सांगा !..."

" पण मी तरी काय सुचवणार आपल्याला ?... रागावूं नका सर ! मला आपलं वाटलं तें सांगितलं !– " देव. शांतपणें म्हणाले, " आपण एका दृष्टीनें पहातां !... ती मावशी दुसऱ्या दृष्टीनें... वडिलांना तर कामधंद्यापुढें दृष्टीच नाहीं !... तिची बिचारीची स्वतःची दृष्टी तर अगदीं चमत्कारीक झाली आहे !... तेव्हां मला शिक्षक म्हणून दिसतंय तें सांगितलं आपलं मी !... "

पण प्रिन्सिपॉलसाहेबांचा चेहरा अधिकच त्रस्त झालेला पाहून देवहि थोडा वेळ गप्प राहिले होते !...

तेवढ्यांत शेवटची घंटा झाल्याचा आवाज ऐकून देव हळूच म्हणाले, " सर रागावूं नका !... आपल्या कोणाच्याच हें हातांतलं नसेल ! तरी एकच आपलं मला वाटतं... मंदा हसबनिसला आतां शाळेंत कांही स्थान नाहीं !... तिचं शाळेबाहेर... समाजांत, गृहिणी म्हणून स्थान आहे !... ही वार्षिक परीक्षा होण्यापूर्वीच तिची एखाद्या वरानें परिक्षा घेणें अधिक बरें !... शाळेंत शून्य मार्क मिळाला,... तरी संसार मात्र

खात्रीनें हा करील ती !... आणि एवढेंच तिला आणि तिच्या पालकांना चांगले समजावें म्हणून तर वर्गाबाहेर काढली आज मी ! ”

प्रिन्सिपॉलनां तें स्पष्टीकरण कांहीं फारसें आवडलें नाहीं. पण त्यांनाहि कांहीं दुसरें सुचत नव्हतें.

तेव्हां ते शेवटीं म्हणाले, “ बरं जा आतां तुम्हीं देव !... मी करीन काय ती त्या मंडळींची समजूत !– ”

० ० ०

१५

देव मास्तर बाहेर पडून शिक्षकांच्या खोलीजवळ आले तोंच त्यांची वाट पहात एक रुबाबदार तरुण आंत बसला आहे व त्याची बेबी ऑस्टिन् बाहेर शाळेजवळ उभी आहे असें शिपायानें पुढें होऊन त्यांना सांगितलें.

ते आंत शिरले तों एका बाजूच्या बांकाकडे त्यांची दृष्टी गेली, ते पटकन् म्हणाले, “ ओहो, आनंद ! वाः ! बरा अगदीं वेळेवर आलास ? ”

आनंद उठून उभा रहात गोंधळून म्हणाला. “ म्हणजे ? ”

आपण आपल्या मनातलंच कांहीं असंबद्ध बोललों हें जाणून देव मास्तर चपापले ! पण लागलीच पुढें स्वतःला सांवरून म्हणाले, “ म्हणजे कांहीं नाहीं ! झालंच काम माझं !– आतां आपण बाहेरच पडूं या... एवढंच ! दुसरं काय ? ”

देव आणि आनंद बाहेरच्या मोठ्या दारांतून रस्त्यावर आले. आनंदानें मोटारचा दरवाजा उघडला. देव आंत बसतांच तो व्हिलजवळ बसला व त्यानें गाडी चालू केली.

तेवढ्यांत देव मास्तरांच्या कानांवर मागून अडखळते शब्द पडले.... “ सऽर सऽर. ”

आणि त्यांनीं पाहिलें तों मंदाच लगबगीनें पुढें येत होती.

पण मोटारीजवळ येतांच ती अतिशय लाजली; व मागें मागें पावलें टाकत ती जागच्या जागीं थबकली.



देव मास्तरांनीं मोटरचा दरवाजा उघडला व ते पुढें होऊन तिला म्हणाले, “ काय म्हणतां हसबनीस ? ”

मंदाचा चेहरा अगदीं काळवंडला होता... रडून रडून डोळे किंचित् सुजले होते. पण त्यांत उर्मटपणा किंवा दुष्टपणा यांचा मागमूसही दिसत नव्हता...

ती अडखळतच त्यांना म्हणाली, “ सर, क्षमा कराल ना मला !... तुमचा अपमान नव्हता करायचा मला... पण मी गोंधळलें...चिडलें... मला काय करावं तेंच समजेना त्या वेळीं ! आणि सर, माझी मावशीच मी नको नको म्हणत असतां गेली प्रिन्सिपॉलकडे तक्रार घेऊन !... माझ्यावर नाहीं ना रागावणार तुम्ही त्याबद्दल ?... ”

तिच्या दृष्टींत, आपल्या उतावळ्या व रागीट वागणुकीचा पश्चाताप इतका भरला होता, कीं देव मास्तरांना क्षणभर पुन्हां एकदां पूर्वीच्या परकऱ्या निष्पाप मंदाचाच समोर भास झाला. त्यामुळें त्यांना तिच्या मनांतील त्या वेळच्या साऱ्या अकथित भावना नि त्यांचा कोंडमारा सूर्यप्रकाशाप्रमाणें स्पष्ट होत होता...

ते मोकळ्या मनानें स्मित करून तिला पटकन् म्हणाले, “ चल वेडी आहेस, मंदा ! तेंच तर सांगायला आलों होतों मी मघां...जा...विसर तें पाहूं सारं ! माझा स्वभाव नाहीं माहीत तुला ? ? ”

मास्तरांच्या त्या शब्दांनीं मंदा मंद हंसली, लाजली आणि मग अगदीं न थांबतां मुलींच्या घोळक्याकडे अक्षरशः पळाली !—

० ० ०

–१६–

मोटारींत शिरतां शिरतां देव मास्तर आश्चर्यानें स्वतःच्या मनाला विचारीत होते...‘आज दुपारीं मी मंदावर रागावलों काय ! अन् आतां अगदीं तीनचार वर्षांनीं तिला एकदम ‘वेडी आहेस तूं, मंदा !’ असं म्हणालों काय ?’

तेवढ्यांतच आनंद मोटारीला वळणावर फिरवीत त्यांना म्हणाला, "सर, कोण हो ही आतांची तुमची प्रशिष्या?...धांवत धांवत तुमच्याकडे आली काय? हळूंच लाजली काय? कुजबुजली...पुटपुटली काय?...आणि मग परकऱ्या पोरीसारखी दबदबा धांवत पुन्हां निघून गेली काय?"

मास्तर दचकून त्याच्याकडे पहात म्हणाले, "ती ना? अरे आमची मंदा हसबनीस ती!...मोठी गोड मुलगी आहे..."

'हसबनीस' हें नांव ऐकतांच आनंद किंचित् चपापला! देव मास्तरांना प्रथम आश्चर्य वाटलें; पण मग त्यावरच धोरण बांधून देव मास्तर त्याला चौकसपणें म्हणाले..."कारे? माहितीची आहे कां तुझ्या ती?

"नाहीं! पहातों आहे आतांच! पण नांव मात्र माहितीचें आहे!–आनंद हंसून म्हणाला.

आणि मग मोटार क्वीन्सरोडकडे लागल्यावर तो म्हणाला, "पण लपवून तरी कशाला ठेवूं, सर?...माझ्याकडे हे हसबनीस चार दिवसांपूर्वी आले होते!...आणि म्हणूनच आज तुमच्याकडे तिची खात्रीलायक चौकशी करायला अन् तुमचा सल्ला विचारायला आलों होतों...."

० ० ०

–१७–

पांच वर्षें मास्तर आनंदाचे ट्यूटर होते. आनंद घरचा सधन नि एकटा हें त्यांना ठाऊक होतं. आनंदाच्या भावी पत्नीची मास्तरांना कल्पना होती! दिसायला नीटनेटकी, इंग्रजी मराठी शिकलेली, आकर्षक, चुणचुणीत, कुलशीलवान्...बस्स, त्याची यादी इथेंच संपे!

तेव्हां ती नवीन बातमी ऐकतांच देव मास्तर आनंदाच्या मोटारींतून त्याच दिवशीं त्याला घेऊन हसबनीसांच्या घरीं गेले! कथानक जुळवण्यासाठीं एखाद्या कादंबरीकारानेंहि एवढी धांवाधांव केली नसेल!

पंधरा दिवसांनीं मार्गशीर्ष महिना होता! त्याच सुमारास शिक्षकांच्या खोलींत बांका–टेबलावरून ज्या सुंदर छपाईच्या कुंकुम–पत्रिका पडल्या



होत्या, त्यांवर बाकीच्या ठरीव मजकुरांत अशा अनुक्रमानें सोनेरी बोल्ड टाईप होते रचलेले—

ANAND
*With*
MANDA

० ० ०

–१८–

आणि आज देव मास्तर आनंद–मंदाच्या घरून त्यांच्या बाळाचें कौतुक करीत परतत होते.

त्यांनीं मंदाचा चेहरा पुन्हां शांत, निष्पाप खेळकर झालेला प्रत्यक्ष पाहिला होता!...

या साऱ्या प्रसंगांचेंच मास्तरांना हसूं येत होतें आनंद–मंदाच्या मोटारींत बसल्या बसल्या!—

० ० ०

–१९–

तासानंतर आनंदाचा ड्रायव्हर परत खारला गेला, तेव्हां त्यानें मंदाकडे एक पाकीट दिलें न् म्हटलें, "बाई, मास्तरसाहेबांनीं चिठी दिली आहे आपल्याला—"

मंदानें किंचित् हास्यमुद्रेनें ती उघडून पाहिली. त्यांत लिहिलें होतें.

"मंदा,

सव्वा वर्षापूर्वी मीं भाकीत केलंच होतं! शंभरापैकीं शाळेत फक्त दोन शून्यंच देतां आलीं मला! पण संसारांत १ वर्ष घालविल्यावर तुला एका योग्य माणसाकडून सर्व कांहीं–१०० पैकीं १०० मिळाले!! आनंद आहे ना?–आशीर्वाद––

...देव मास्तर"

वर्तमानकालीन सामाजिक पार्श्वभूमि! स्वयंपूर्ण पण सूत्रबद्ध कादंबरी-माला ! महाराष्ट्रांतील पहिलाच महत्वाचा प्रयत्न !

रघुवीर सामंतकृत

# उपकारी माणसें

दिवसेंदिवस नष्ट होणाऱ्या एकत्र कुटुंबाचाच घटक असलेल्या, एका ध्येयवादी भावनाशील महाराष्ट्रीय चित्रकार कलावंताचा पूर्वजीवन वृत्तांत !

त्याच्या '**प्रवासांतील सोबती !**' – त्याच्या आयुष्यांत आलेलें '**अभ्र-पटल !**' – त्याला त्यानंतर दिलेली उपकारी माणसांची '**आकाश-गंगा !**'

आभिनव-पण ओळखीचें मनोरंजक विविध वातावरण ! यांत १९३५ सालपर्यंतच्या जवळजवळ ७५ वर्षांचा महाराष्ट्र-समाज-चित्रपट कलात्मक लेखणीनें रेखाटलेला पहावयास मिळेल. त्यांत त्या अनुषंगानें आलेला जुन्यानव्या पिढींतील अव्याहत झगडा, १९३० सालचें राजकीय संक्रमण व तरुण मनाचीं आंदोलनें मराठी वाचकांस अभिनव वाटतील.

प्रसिद्ध — खंड १ **प्रवासांतील सोबती**

[ पृष्ठें २७० डेमी, रु. २। ]

खंड २ **अभ्र-पटल**

[ पृष्ठें २८० डेमी, रु. २। ]

खंड ३ **आकाश-गंगा**

[ पृष्ठें सुमारे ३०० डेमी, रु. २॥ ]

**— पारिजात प्रकाशन —** ७ मॅथ्यू रोड, मुंबई ४